CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, १० मार्च २०२६ । वर्ष ४ रे अंक २ रा । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

### विनम्र अभिवादन



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आज पुण्यतिथी

### विचारपुष्प



आपण ध्येयवादी असल्याचा अहंकार मनात असू नये. अहंकारी व्यक्ती आपल्या मनावर नियंत्रण ठेवू शकत नाही. ध्येयवादासमोर वैयक्तिक अहंकार नाहीसा होतो. ध्येयवाद जितका तीव्र आणि प्रखर असेल अहंकार तितका कमी राहील. अहंकारी व्यक्ती चार लोकांनाही एकत्र करू शकत नाही. जिथे अहंकार असेल तिथे ईश्वराचा वास राहणार नाही.

**- दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# शेअर बाजारात ‘ब्लॅक मंडे’
## तासाभरात १३ लाख कोटी गमावले




◆ **मुंबई, ९ मार्च**
भारतीय शेअर बाजारासाठी सोमवारचा दिवस अत्यंत धक्कादायक ठरला. मार्च २०२५ नंतरची सर्वात मोठी घसरण सोमवारी पाहायला मिळाली. जागतिक बाजारातील तणाव आणि कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीमुळे गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. बाजार उघडताच अवघ्या एका तासापेक्षा कमी कालावधीत गुंतवणूकदारांचे सुमारे १३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले असून सेन्सेक्स आणि निफ्टीला मोठा फटका बसला.

सोमवारी सकाळी बाजार उघडताच मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३.२ टक्क्यांनी, म्हणजे तब्बल २,४९५ अंकांनी, कोसळला. दुसरीकडे निफ्टी ५० मध्येही ३.०७ टक्क्यांची, म्हणजेच ७५२.६५ अंकांची मोठी घसरण नोंदवण्यात आली. या पडझडीमुळे बीएसई सूचिबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ६ मार्च रोजीच्या ४४,९६,८२,६००.८१ कोटी रुपयांवरून घसरून ४३,७०,८२,५६०.०१ कोटी रुपयांवर आले. परिणामी गुंतवणूकदारांनी सुमारे १२.६० लाख कोटी रुपयांची संपत्ती गमावली आहे.

सेन्सेक्समधील इंडिगोचा शेअर ७.३ टक्क्यांपेक्षा अधिक घसरला, तर स्टेट बँक ऑफ इंडिया () च्या शेअरमध्ये ६ टक्क्यांची घसरण झाली. त्यापाठोपाठ मारुती सुझुकी, एशियन पेंट्स, एल अँड टी आणि टाटा स्टील यांच्या शेअर्समध्ये प्रत्येकी सुमारे ५ टक्क्यांची घट झाली.

याशिवाय ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, महिंद्रा अँड महिंद्रा, एचडीएफसी बँक, अदानी पोर्ट्स आणि बजाज फायनान्स या दिग्गज कंपन्यांच्या शेअर्समध्येही ३ ते ४ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली.

बाजार भांडवलाच्या दृष्टीने स्टेट बँक ऑफ इंडियाला सर्वाधिक ६५,०७५ कोटी रुपयांचा फटका बसला आहे. त्याखालोखाल एचडीएफसी बँकेचे ३९,७०७ कोटी रुपये आणि आयसीआयसीआय बँकेचे ३२,१७३ कोटी रुपये इतकी घसरण झाली आहे. मध्यपूर्वेतील वाढता भू-राजकीय तणाव आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील अस्थिरता जोपर्यंत कमी होत नाही, तोपर्यंत शेअर बाजारातील अनिश्चितता कायम राहण्याची शक्यता असल्याचे मत बाजार तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

### बाजार सध्या कोणत्या रेंजमध्ये आहे?

**» निफ्टी ५० इंडेक्स सध्या २४००० या सपोर्ट पातळीवर ट्रेड करीत आहे. नजीकची रेझिस्टन्स पातळी २४४०० / २४,५०० असून जर येणाऱ्या दिवसांत जर बाजार अजून खाली तर निफ्टी साठी मंथली सपोर्ट पातळी २२,७०० असेल. सेन्सेक्स साठी नजीकची रेझिस्टन्स पातळी ७८,२०० / ७८३०० असून ७४,५०० ते ७४,७०० ही सपोर्ट पातळी मंथली पातळीवर दिसत आहे.** ■

# इराण युद्धामुळे कच्चे तेल पेटले
## संघर्ष लांबल्यास परिस्थिती बिकट



किंमत प्रतिबॅरल १०३ डॉलर्सपर्यंत पोहोचले

◆ **शिकागो, ९ मार्च**
इराण युद्ध तीव्र झाल्यामुळे मध्यपूर्वेतील उत्पादन आणि शिपिंग धोक्यात आल्याने तसेच आर्थिक बाजारपेठांमध्ये गोंधळ झाल्यामुळे सोमवारी कच्च्या तेलाच्या किंमती १० टक्क्यांनी वाढल्या. दिवसाच्या सुरूवातीला तेलाचे दर प्रतिबॅरल १२० डॉलर्सपर्यंत पोहचले होते. पण, दिवसाच्या शेवटी १०३ डॉलर्सवर स्थिरावले.

आंतरराष्ट्रीय मानक असलेल्या ब्रेंट क्रूडच्या प्रतिबॅरलची किंमत दिवसाच्या सुरुवातीला प्रतिबॅरल ११९.५० डॉलर्सपर्यंत वाढली होती. परंतु, नंतर ती प्रतिबॅरल १०७.८० डॉलर्सवर व्यवहार करीत होती. अमेरिकेत उत्पादित होणारे हलके, कच्चे तेल वेस्ट टेक्सास इंटरमिडिएट प्रतिबॅरल ११९.४८ डॉलर्सवर पोहोचले. परंतु, पुन्हा १०३ डॉलर्स प्रतिबॅरलवर घसरले.

पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या डिसॅलिनेशन प्रकल्पावर इराणने हल्ला केल्याच्या आरोप बहरीनने केल्याने आणि इस्रायलने रात्री केलेल्या हल्ल्यामुळे तेहरानमधील तेल डेपो धुमसत असताना नागारी लक्ष्यांवर युद्धाचा परिणाम वाढला. युद्ध आता दुसऱ्या आठवड्यात असल्याने, पर्शियन आखातातून तेल आणि वायूचे उत्पादन आणि वाहतुकीसाठी महत्त्वाचे असलेल्या देशांना आणि ठिकाणांना अडकवत असल्याने तेलाच्या किमती वाढल्या आहेत. ◂*(वृत्तसंस्था)*

# भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाचा गौरव
## विधानसभेत मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदनाचा प्रस्ताव

**मुंबई** : आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत न्यूझीलंडवर ९६ धावांनी दणदणीत विजय मिळवत भारताने इतिहास रचला. या भव्य यशाबद्दल राज्याच्या विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक केले.

अहमदाबादमधील जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट मैदानावर असलेल्या नरेंद्र मोदी स्टेडियम येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय क्रिकेट संघाने न्यूझीलंड संघाचा ९६ धावांनी पराभव करत तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा मान मिळवला. या विजयामुळे सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी गौरव केला. सोमवारी विधानसभेत अभिनंदन प्रस्ताव मांडताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय संघाने अंतिम सामन्यात २० षटकांत ५ बाद २५५ धावांचा विक्रमी डोंगर उभा करत टी-२० विश्वचषकाच्या फायनलमधील सर्वाधिक धावसंख्येचा नवा विक्रम केला. फलंदाजीत संजू सॅमसन (४६ चेंडूत ८९ धावा), अभिषेक शर्मा (२१ चेंडूत ५२ धावा) आणि ईशान किशन (२५ चेंडूत ५४ धावा) यांनी अर्धशतक झळकावत संघाला भक्कम धावसंख्या उभारून दिली. त्यानंतर तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनीही महत्त्वाची भर घातली. या स्पर्धेत संघाने एका सामन्याचा अपवाद वगळता सर्व सामने जिंकत शानदार कामगिरी केली.



कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या नेतृत्वाखाली संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले, असेही फडणवीस यांनी नमूद केल

# जिष्णु देव वर्मा यांचे मुंबईत आगमन

◆ **मुंबई ९ मार्च**
महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारण्यासाठी तेलंगणाचे विद्यमान राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे सोमवारी सपत्नीक मुंबईत आगमन झाले. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांचे स्वागत केले.यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आशिष शेलार आदि उपस्थित होते. दरम्यान, जिष्णु देव वर्मा मंगळवार १० मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय त्यांना शपथ देणार आहेत. ◂*(तभा वृत्तसेवा)*



# मोज्तबा खामेने ईराणचे सर्वोच्च धार्मिक नेते

**तेल अवीव** : अनेक दिवसांच्या विचार विनिमयानंतर मोज्तबा खामेनेई यांना इराणचा सर्वोच्च नेता म्हणून निवडण्यात आले.



मात्र, ते हवाई हल्ल्यात गंभीर जखमी झाले असल्याचा दावा इस्रायलच्या आयडीएफने केला आहे. हल्ल्यात ठार झालेले अयातुल्लाह अली खामेनेई यांचे ते पुत्र आहेत. मोज्तबा यांना त्यांच्या पित्याचा उत्तराधिकारी म्हणजे इराणचा सर्वोच्च नेता म्हणून असेंब्ली ऑफ एक्सपर्टसने निवड केली, असा दावा इराण इंटरनॅशनल या वाहिनीने केली. मोज्तबा खामेनेई यांना तत्काळ सर्वोच्च नेता म्हणून घोषित करण्याबाबत वरिष्ठ इराणी धर्मगुरूंनी आक्षेप घेतला.

# राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवाने देण्यावर बंदी
## वाहतूक कोंडी व प्रदूषणावर आळा घालण्याचा निर्णय

**मुंबई, ९ मार्च-**
राज्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषण लक्षात घेऊन ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षा परवाने देण्यास तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. पुढील धोरण निश्चित करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



राज्यातील मोठ्या शहरांमधील वाहतूक व्यवस्थेवर वाढत्या ऑटो रिक्षांच्या संख्येचा ताण येत असल्याने शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. नवीन परवाने कोणत्या निकषांवर द्यावेत याबाबतचा अंतिम निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला जाणार आहे. त्या निर्णयानंतर पुढील धोरण जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सरनाईक यांनी सांगितले की, पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे आहेत. या संदर्भात केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्यांना स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. मोटार वाहन दुरुस्ती अधिनियम २०१९ अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली आहे. तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ६७(३) नुसार राज्य सरकारला प्रवासी आणि मालवाहतूक परवाने नियंत्रित करण्याचा अधिकार आहे

# एक कोटी ‘लखपती दीदी’ घडविण्याचे लक्ष्य : मुख्यमंत्री
## महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर

◆ **मुंबई, ९ मार्च**
राज्यात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवत २०२७ पर्यंत एक कोटी ‘लखपती दीदी’ घडविण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार आणि उत्पन्नवाढीच्या संधी उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूतोवाच केले.



जागतिक महिला दिनानिमित्त मुंबईत आयोजित सक्षम महिला सशक्त महाराष्ट्र या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी प्रतिकूल परिस्थितीवर मातकरुन सक्षमपणे उभ्या राहिलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. राज्यात महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या दोन वर्षांत सुमारे ३७ लाख महिलांनी विविध योजनांच्या माध्यमातून वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवत लखपती दीदी’चा दर्जा मिळवला असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

या पृष्ठभूमीवर आता पुढील टप्प्यात आणखी २५ लाख महिलांना ‘लखपती दीदी’ बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या उपक्रमामुळे राज्यात एकूण एक कोटी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.




महिलांनी उद्योग, व्यवसाय, बचत गट आणि विविध स्वयंरोजगार उपक्रमांमधून उत्पन्न वाढविल्यास त्याचा थेट परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. महिलांचे उत्पन्न वाढल्याने कुटुंबांची आर्थिक स्थिती सुधारेल आणि समाजव्यवस्थेतही सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ◂*(तभा वृत्तसेवा)*



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नवले सिंहगड महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर.टी. व्यवहारे, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस पी सगट यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनीही माजी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मेळाव्यात राकेश गायकवाड, श्रीरंग औरंगाबादकर, ऋतूजा गायकवाड, अजय वेळेकर, योगेश नायकवाडी आणि निखिल शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन विद्यार्थी साकेत कांबळे यांनी केले तर आभार प्रा. मानसी जाधव यांनी मानले.

### पाटील इन्स्टिट्यूटमध्ये डीजीपीएस कार्यशाळा उत्साहात

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एजीपीआयटी), सोलापूर येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या वतीने डीजीपीएस (Differential Global Positioning System) या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेला प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून इंजि. गौरव वाळूंज उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना डी.जी.पी.एस. तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. केवळ थिअरीवर भर न देता, विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक (Hands-on field demonstration) सत्रही आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. विवेक भोगडे, प्रा. अनिल लिगाडे आणि राजकुमार मनुरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. कल्याणी मामड्याल यांनी केले. याप्रसंगी इस्माईल अरेवाले, पृथ्वीराज इंडे, श्रुतिका यारझल आणि पूजा जिदम या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.



### हरि ओम संस्थेतर्फे रंगपंचमी साजरी

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेने सकाळी विणकर बागेत संस्थेचे इच्छुक असलेले सभासदाना खोबऱ्याचे हार व साखरेचे हार घालून एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी करण्यात आली. यावेळी बालाजी जंगम, गणेश गुज्जा, राजेंद्र ध्यावरकोंडा, सुनील पवार,मिलिंद बोमद्याल, इराबत्ती, पांडुरंग रापोल, इंदापुरे, नरेश श्रीराम, श्रीनिवास रापरती यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन गणेश सिद्धम व आभार लक्ष्मीकांत दंडी यांनी मानले. यावेळी पांडुरंग चिलवेरी, संजीव नादरगी, अशोक यजा, हिरालाल धुळम, रुक्मणसा दौलताबाद, सुनील पत्तेवार, माणिकसा भूमकर, अशोक हबीब,शेखर इरावती, अंबादास नादरगी, पांडुरंग पोला उपस्थित होते.




### चाँद तारा शाळेत महिला दिवस साजरा

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत महिला दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा डॉ.जे.बी.बागबान होते. यावेळी शाळेतील महिला शिक्षकांचा सत्कार करण्यात आले. आयेशा नदाफ यांनी महिला दिनाची माहिती दिली मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी शाळा व संस्थेची माहिती दिली. सूत्रसंचालन खतिब उम्मे हबीबा यांनी तर आभार चौधरी चास्मीन यांनी मानले.



### आवताडे मित्र परिवारातर्फे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

राष्ट्रीय योगासन खेळाडू तथा हिंदवी परिवाराचे सोलापूर शहरप्रमुख तुषार आवताडे यांनी सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेत मित्रपरिवाराने त्यांचा सन्मान केला. यावेळी पर्यावरण मित्र मनोज देवकर यांच्यासोबत सोलापूर शहरात पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवण्याबाबत चर्चा झाली. या प्रसंगी महेश देवकर, शैलेश अहिवळे, प्रसाद खोबरे, ऋषिकेश वाघमारे, पत्रकार साहेबराव परबत उपस्थित होते.

# सोलापूर-पुणे-मुंबई मार्गावर वीकेंड विशेष रेल्वेची गरज

## तत्काळ तिकिटे काही मिनिटांत संपतात; कोटा वाढवण्याची गरज

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रूप, दि. ९ मार्च-**

सोलापूर येथील कामगार, विद्यार्थी पुणे व मुंबई येथे नोकरी व शिक्षणासाठी वास्तव्यास आहेत. सोलापूर ते पुणे दरम्यान हुतात्मा आणि इंद्रायणी एक्स्प्रेस, तर सोलापूर ते मुंबई दरम्यान सिद्धेश्वर एक्सप्रेस या प्रमुख गाड्या उपलब्ध आहेत. मात्र मागील काही वर्षांत पुणे-मुंबईकडे स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने या गाड्यांमधील तिकीट उपलब्धता प्रवाशांसाठी मोठी समस्या ठरत असल्याचे चित्र आहे.



प्रवासाच्या चार-पाच दिवस आधीपासूनच या गाड्यांमधील तिकिटे वेटिंग लिस्टमध्ये जातात. त्यामुळे अनेकांना तत्काळ तिकीट बुकिंगचा पर्याय वापरावा लागतो. मात्र इंद्रायणी आणि सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या तत्काळ तिकिटांचा कोटा काही मिनिटांतच संपत असल्याने उर्वरित तिकिटे पुन्हा वेटिंग लिस्टमध्ये जात असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. यामुळे आठवड्याच्या शेवटी सोलापूरला येणाऱ्या आणि सुट्टी संपल्यानंतर पुन्हा पुणे-मुंबईकडे परतणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. परिणामी अनेकांना खासगी वाहनांचा पर्याय स्वीकारावा लागत असल्याने प्रवास अधिक खर्चिक व काही प्रमाणात धोकादायकही ठरत असल्याची चर्चा आहे. रेल्वे प्रवाशांमध्ये होत असलेल्या चर्चेनुसार सोलापूर-पुणे किंवा सोलापूर-मुंबई मार्गावर वीकेंड विशेष रेल्वे सुरू करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**चार मिनिटांत वेटिंग लिस्ट**

सोलापूर ते पुणे दरम्यान धावणाऱ्या इंद्रायणी एक्स्प्रेससाठी तत्काळ तिकीट बुकिंग सकाळी ११ वाजता सुरू होते. मात्र अवघ्या चार मिनिटांत वेटिंग लिस्ट सुरू होते, असे प्रवाशांचे म्हणणे आहे. तिकिटांच्या उपलब्धतेपेक्षा प्रवाशांची संख्या जास्त असल्याने ही परिस्थिती निर्माण होत असल्याचे सांगितले जाते.

**सकाळी-संध्याकाळी विशेष गाड्यांची गरज**

पुणे हे आयटी क्षेत्राचे प्रमुख केंद्र असल्याने सोलापूरहून अनेक कर्मचारी रोजच्या प्रवासासाठी रेल्वेवर अवलंबून असतात. सकाळी पुण्यात पोहोचणे आणि सायंकाळी सोलापूरकडे परत येणे या वेळापत्रकानुसार गाड्यांची उपलब्धता मर्यादित असल्याने कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

> शुक्रवारी पुणे ते सोलापूर आणि सोमवारी सोलापूर ते पुणे या दिवसांमध्ये प्रवाशांची संख्या खूप वाढते. सुट्टीच्या दिवशी सोलापूरला यायचे ठरवले तरी तिकीट मिळणे कठीण होते. त्यामुळे प्रवासात मोठा मनस्ताप होतो.
>
> **- रवी विजापुरे,** आयटी कर्मचारी
>
> सोलापूर-पुणे प्रवास करताना तिकीट मिळणे ही मोठी डोकेदुखी झाली आहे. काही मिनिटांतच तिकिटे संपतात. त्यामुळे या मार्गावर अतिरिक्त गाड्या किंवा वीकेंड विशेष रेल्वे सुरू होणे गरजेचे वाटते.
>
> **- लोहितांक्ष श्रीराम,** फार्मा कर्मचारी

## श्री महालक्ष्मी संस्थेतर्फे महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

हत्तुरेवस्तीमधील श्री महालक्ष्मी महिला विकास व बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने रविवारी महिला दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे प्रकल्प अधिकारी राजशेखर शिंदे, सोलापूर व अजयकुमार देवकत यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. शैला पांडुरंग सरोदे उपस्थित होत्या.

अध्यक्षस्थानी संस्थापिका रेखा मळेवाडी या होत्या. कार्यक्रमाची प्रस्तावना दीपाली बोरगावकर यांनी केले व सूत्रसंचालन माधवी गोरनाळी यांनी केले आभार प्रदर्शन कुलकर्णी यांनी केले याप्रसंगी



डॉक्टर शैला पांडुरंग सरोदे (आरोग्य अधिकारी सोमपा), पूजा देवकते (कनिष्ठ लिपिक) शासकीय तंत्र निकेतन सोलापूर ममता कुलकर्णी टिकेकर (समाजसेविका), स्वाती युवराज गाडेकर, भाग्यश्री राऊत, क्षितिजा उडाणशिव, आरती कुसेकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे राजशेखर शिंदे, डॉ. शैला सरोदे, संस्थापिका रेखा मळेवाडी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी ओंकार मळेवाडी, काशिनाथ मळेवाडी, पल्लवी पाटील, अनुराधा कुलकर्णी, अंबिका कुलकर्णी सारिका लामतुरे, सुलोचना इटकर, सुषमा भंडारे, रोहिणी माने, पूजा करजगीकर, विकास प्रधान, सुनिता बिराजदार, लक्ष्मी आवटे, राजू काळे, जयश्री घोडके, राजश्री यमगवळी, चिवरे आप्पा, तेली, तात्या उजळंबे, समर्थ अर्जुन चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## बार्शीतील श्रावस्ती बुध्द विहारावर चोरट्यांचा डल्ला; दानपेटीसह हजारोंची रोकड लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मार्च-**

तालुक्यातील मौजे कासारवाडी हद्दीत असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहारात अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून धाडसी चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विहारातील धम्मदान पेटीच चोरुन नेण्यात आली असून, त्यामध्ये अंदाजे २५ ते ३० हजार रुपयांची रोकड असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विष्णु मारुतीराव कांबळे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, २ मार्च रोजी सायंकाळी विहारात बुद्ध वंदना घेऊन परिसरातील झाडांना पाणी घातल्यानंतर विश्वस्तांनी विहाराचे लोखंडी शटर व कुलूप व्यवस्थित बंद करुन तेथून निघाले होते. मात्र, ७ मार्च रोजी सकाळीच्या सुमारास अध्यक्ष विष्णु कांबळे आणि गणेश पंढरे विहारात गेले असता, शटरचे लॉक आणि कुलूप तुटलेले दिसून आले. विहारात पाहणी केली असता आतील धम्मदान पेटीच गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. विशेष म्हणजे, ज्या दिवशी ही चोरी उघडकीस आली, त्याच दिवशी विहारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी तंत्रज्ञ येणार होते. कॅमेरामन प्रितम सुरवसे आणि इतर सदस्य विहारात पोहोचल्यावर चोरीचा हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. विहार परिसरात शोध घेतला असता दानपेटीचा कोणताही मागमूस न लागल्याने अखेर विश्वस्तांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या घटनेची गंभीर दखल घेत बार्शी तालुका पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## 'दक्षिण'साठी २५ कोटींचा निधी मंजूर
### आ. देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

राज्याच्या अर्थसंकल्पातून दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी २५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे मतदारसंघातील रस्ते, पूल आणि पायाभूत सुविधांच्या कामांना गती मिळणार आहे. आमदार सुभाष देशमुख यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाला आहे.



या निधीतून इंगळगी ते जेऊर धुबधुबी तलाव पुलाचे बांधकाम, बरुर-हत्तरसंग-कुडल रस्त्याचे काँक्रीटीकरण, मंद्रूप-मळकवठे-सादेपूर-बाळगी रस्त्याचे काँक्रीटीकरण, भंडारकवठे-माळकवठे रस्त्याची दुरुस्ती व काँक्रीटीकरण, तसेच निंबर्गी-कंदलगाव रस्त्याची दुरुस्ती व काँक्रीटीकरण अशी विविध कामे करण्यात येणार आहेत. या कामांसाठी अनुक्रमे ६ कोटी, ४ कोटी, ५ कोटी, ५ कोटी आणि ५ कोटी असा २५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या निधीमुळे दक्षिण सोलापूरच्या विकासाला चालना मिळणार असून, स्थानिक नागरिकांना चांगले रस्ते व वाहतूक सुविधांचा लाभ होणार आहे. राज्य सरकारने मंजूर केलेल्या या निधीबद्दल आमदार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री व राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

## सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक भाऊसाहेब आंधळकर 'सितारा आयकॉन' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सितारा महिला विकास संस्थेच्यावतीने आयनॉक्स, कोरेगाव पार्क येथे आयोजित 'सितारा आयकॉन' या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात, पोलीस दलातील 'सिंघम' म्हणून निरीक्षक भाऊसाहेब आंधळकर यांचा ओळखले जाणारे माजी पोलीस विशेष सन्मान करण्यात आला.



भाऊसाहेब आंधळकर यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीत अनेक धाडसी कारवाया केल्या. विशेषतः ३५४ पिडीत मुलींना नरकयातनेतून सोडवून पुन्हा सन्मानाने त्यांच्या घरी पाठवण्याचे महान कार्य त्यांनी केले. तसेच गाजलेल्या रेव पार्ट्यांवरील धाडी आणि गुन्हेगारी विश्वात निर्माण केलेला त्यांचा दरारा यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने पोलीस दलातील 'सिंघम' ही पदवी मिळाली.यावेळी तृप्ती देसाई, भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका, डॉ. दत्ता शिंदे, समाजसेवक या मान्यवरांचीही यावेळी उपस्थिती लाभली. पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना आंधळकर यांनी हा सन्मान त्यांच्या खाकी वर्दीचा आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा असल्याचे सांगितले.

## ५४ अंशांतही काश्मीरचा अनुभव; 'डायकिन' एसीची नवी श्रेणी लाँच

**गुरुग्राम :** वाढत्या उन्हाचा कडाका आणि वीजबचतीची गरज ओळखून, एअर कंडिशनिंग क्षेत्रातील जागतिक दिग्गज 'डायकिन इंडिया'ने २०२६ सालातील उत्पादनांची नवी श्रेणी सादर केली आहे. यामध्ये प्रगत 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून, कडक उन्हाळ्यातही हे एसी अत्यंत कमी वीजवापरात प्रभावी कुलिंग देणार आहेत.



डायकिनने आपल्या रूम एसी श्रेणीमध्ये मोठे बदल केले आहेत. ब्यूरो ऑफ एनर्जी इफिशियन्सीच्या (बीईई) २०२६ च्या नवीन कडक मानकांनुसार हे

एसी तयार करण्यात आले आहेत. यातील 'पेटंटेड स्विमिंग कॉम्प्रेसर' आणि 'स्ट्रीमर डिस्चार्ज' तंत्रज्ञानामुळे हवा शुद्ध राहण्यासोबतच ५४ अंश सेल्सिअस तापमानातही हे एसी विनासायास थंड हवा देतात. प्रीमियम ग्राहकांसाठी कंपनीने ५-स्टार इन्व्हर्टर मॉडेल्सवर विशेष भर दिला आहे. आमची २०२६ ची श्रेणी जपानी तंत्रज्ञान आणि भारतीय गरजा यांचा सुवर्णमध्य आहे. भारतात आमच्या तीन फॅक्टरी कार्यरत असून, याद्वारे आम्ही शाश्वत आणि पर्यावरणपूरक थंडावा देण्यास कटिबद्ध आहोत, असे डायकिन इंडियाचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक कंवलजित जावा यांनी म्हटले आहे.

## एसबीआय लाइफ इन्शुरन्सची नवीन ब्रँड मोहीम

वेगाने बदलणाऱ्या भारतात प्रत्येक वयोगटातील आणि विविध भागांतील लोकांच्या आकांक्षा झपाट्याने वाढत आहेत. मात्र त्याचवेळी कुटुंबाप्रती असलेली आर्थिक जबाबदारी ही जीवनातील निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. एसबीआय लाइफच्या नव्या ब्रँड मोहिमेचा गाभा याच विचारावर आधारित आहे, तो म्हणजे आपल्या प्रियजनांना दिलेली आश्वासने सुरक्षित असतात, तेव्हाच व्यक्ती आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी खऱ्या अर्थाने आत्मविश्वासाने पाऊल उचलू शकते.

नवीन टीव्हीसीमध्ये हा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आर्थिक संरक्षण असल्यास व्यक्तीला तडजोड न करता मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि ती पूर्ण करण्याचे धाडस मिळते, हे या मोहिमेतून दाखवण्यात आले आहे. नवीन करिअरची निवड असो, मुलांच्या स्वप्नांना पाठबळ देणे असो किंवा स्वतःचा नवा उपक्रम सुरू करणे असो ही मोहीम संदेश देते की सुरक्षेची खात्री असते, तेव्हा व्यक्ती त्यांच्या इराद्यांवर अधिक ठामपणे आणि धैर्याने कृती करू शकतात.

हा विचार एसबीआय लाइफच्या 'अपने लिये, अपनों के लिये' या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. जीवन विमा हे केवळ आर्थिक उत्पादन नसून जीवनातील महत्त्वाच्या निर्णयांना बळ देणारे साधन आहे, असा कंपनीचा विश्वास आहे. आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करून व्यक्तीला स्वप्ने आणि जबाबदाऱ्या यांचा समतोल साधता येतो आणि मनः शांतीसह पुढे जाता येते. भावनिक आणि वास्तववादी कहाण्यांद्वारे ही मोहीम एसबीआय लाइफला आयुष्याच्या प्रवासातील विश्वासू सहकारी म्हणून सादर करते, जो व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षा आणि जबाबदाऱ्या दोन्हींचे संरक्षण करतो, तसेच भारतातील प्रत्येक व्यक्ती व कुटुंबाला जीवनातील सर्व स्वप्ने पूर्ण होऊ शकतात याची खात्री देतो.

ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांची एसबीआय लाइफचे पहिले ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड का करण्यात आली? जॉली आणि पॉली कोणाचे प्रतिनिधीत्व करतात? आजचा ग्राहक महत्त्वाकांक्षी आहे, आत्मविश्वासू आहे आणि आयुष्यात अर्थपूर्ण ध्येये गाठण्याची जिद्द असणारा आहे. पण त्याचवेळी तो कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांबाबतही तितकाच जागरूक असतो. निर्णय केवळ भावनेच्या भरात घेतले जात नाही, तर स्वप्नं आणि जबाबदारी यांचा समतोल साधत घेतले जातात. या बदलत्या विचारसरणीनुसार ब्रँड ॲम्बेसेडरची निवड आधारलेली आहे. ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा हे दोघेही आयुष्यातील या दोन परस्परपूरक दृष्टिकोनांचे सहज प्रतिनिधीत्व करतात. त्यांना 'जॉली' आणि 'पॉली' म्हणून सादर करण्यात आले आहे. ते केवळ पारंपारिक सेलिब्रिटी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून समोर येत नाहीत, तर जीवनातील महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या दोन भिन्न मानवी प्रवृत्तींचे प्रतीक आहेत.

'जॉली आणि पॉली' ही संकल्पना भारतातील कुटुंबांमध्ये घडणाऱ्या अंतर्गत संवादाचे प्रतीक आहे, जेथे प्रगती करण्याची ओढ आणि आपल्या प्रियजनांची काळजी घेण्याची जबाबदारी यांचा समतोल साधला जातो. त्यांची भूमिका विम्याचे नाट्यमय सादरीकरण करण्याची नाही, तर विम्याला दैनंदिन जीवनाचा स्वाभाविक भाग म्हणून मांडण्याची आहे. जीवन विम्यामुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते आणि त्यामुळे सकारात्मकता व प्रगतीचा मार्ग सुकर होतो, हा संदेश यातून दिला जातो. ऋषभ पंतने साकारलेला 'जॉली' हा स्वभावप्रवृत्ती, आशावाद आणि भरभरून जगण्याच्या धैर्याचे प्रतीक आहे. नियोजन करणे म्हणजे स्वातंत्र्य गमावणे नसून, आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याची पूर्तता करणे, हे तो पटवून देतो. याउलट, रवींद्र जडेजाने साकारलेली 'पॉली' ही व्यक्तिरेखा संयम, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन विचारांचे प्रतिनिधीत्व करते. तो अत्यंत शांतपणे आणि स्पष्टतेने संदेश देतो की, पूर्वतयारी किंवा नियोजन ही केवळ एक जबाबदारी नसून, ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि कौटुंबिक सुरक्षा या दोघांनाही बळ देणारी कृती आहे.

**ही मोहीम तरुण प्रेक्षकांशी कशी जोडली जाते?**

आजची तरूण पिढी महत्त्वाकांक्षी, सुजाण आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास उत्सुक आहे. पण, त्याच वेळी ते कुटुंब, आर्थिक स्थैर्य आणि दीर्घकालीन सुरक्षितता यांप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांबाबत देखील अधिकाधिक जागरूक होत आहेत. ही पिढी कौटुंबिक जबाबदाऱ्या टाळत नाही आहे; उलट, त्या जबाबदाऱ्या आणि स्वतःच्या छंदांचा किंवा आवडीचा पाठलाग यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहे.

ही मोहीम भारतातील घराघरांत सर्रास आढळणाऱ्या प्रसंगांचे चित्रण करून आजच्या पिढीच्या विचारसरणीशी संलग्न होते. यामध्ये करिअरमधील बदल, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि जीवनातील अशा निवडी दाखवल्या आहेत ज्यामध्ये 'धाडस' आणि 'सावधगिरी' या दोन्हीचा मेळ आहे. ही मोहीम कोणत्याही क्लिष्ट आर्थिक संज्ञा किंवा तांत्रिक शब्दांचा वापर न करता, आर्थिक संरक्षण कशा प्रकारे शांतपणे आत्मविश्वास वाढवते हे दर्शवते. एकदा का कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्या सुरक्षित झाल्या की, तरुण पिढीला आपल्या आवडीच्या क्षेत्रांत पूर्ण ताकदीने आणि प्रगतीशील पावले उचलणे कसे शक्य होते, हे या कथानकातून प्रभावीपणे मांडले आहे.

तरुण ग्राहक, विशेषतः पहिल्यांदाच विमा पॉलिसी घेणाऱ्यांसाठी, हा संदेश अगदी स्पष्ट आहे: लवकर नियोजन करणे म्हणजे निवडींवर मर्यादा आणणे नसून स्वतःला सक्षम बनवणे आहे. आपल्या प्रियजनांच्या गरजा सुरक्षित करून, तरुणांना त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी एक प्रकारची स्पष्टता, आत्मविश्वास आणि मनःशांती मिळते, जी त्यांना मुक्तपणे प्रगती करण्यास वाव देते.

**आगामी काळात एसबीआय लाइफचा ब्रँडचा भर कशावर असेल?**

पुढील काळात एसबीआय लाइफचा ब्रँड भर लोकांच्या स्वप्नांना बळ देणाऱ्या सक्षम भागीदाराची भूमिका अधिक मजबूत करण्यावर राहील. आर्थिक सुरक्षितता व्यक्तीला आत्मविश्वासाने आयुष्य जगण्याची ताकद देते, हा विचार अधिक ठळकपणे मांडला जाईल. महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी यांचा समतोल साधणे हीच खरी प्रगती आहे, या भूमिकेला ब्रँड पुढेही अधोरेखित करेल. जीवन विमा हा केवळ गरजेपोटी घेतला जाणारा उत्पादन नसून, स्वातंत्र्य आणि नव्या शक्यता उघडणारा सजग निर्णय आहे, अशी भूमिका कंपनी मांडणार आहे.

'अपने लिये, अपनों के लिये' या तत्त्वाचा विस्तार करत एसबीआय लाइफ सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत कथानक तयार करण्यावर, ग्राहकांसोबत भावनिक नाते अधिक दृढ करण्यावर आणि आर्थिक संरक्षण अधिक सोपे व सुलभ बनवण्यावर भर देईल. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर, तसेच विविध भागांमध्ये आर्थिक संरक्षण अधिक सोपे आणि सहज उपलब्ध करून देणे, यावर विशेष लक्ष राहील. त्याचबरोबर नवकल्पना, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर आणि ग्राहककेंद्रित उपाययोजना यांवर भर देत नव्या, महत्त्वाकांक्षी भारताच्या गरजांशी सुसंगत सेवा विकसित केल्या जातील. संरक्षणाची गती आणि लोकांच्या स्वप्नांची गती यांत ताळमेळ राखणे, हेच उद्दिष्ट असेल. थोडक्यात सांगायचे तर, देशातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक कुटुंबाच्या प्रगतीला चालना देणारे प्रेरणास्थान बनणे, हीच एसबीआय लाइफची भावी दिशा आहे.

**- रवींद्र शर्मा, प्रवक्ता ब्रँड, कॉर्पोरेट कम्युनिकेशन आणि सीएसआर प्रमुख**




उद्धव ठाकरे यांना विधान परिषद आमदार व्हायचे असेल तर त्यांनी दिल्लीच्या पुढे टाहो फोडण्यापेक्षा एकनाथ शिंदेंना फोन करावा. एकनाथ शिंदे मोठ्या मनाचे नेते आहेत. त्यांना फोन केला तर ते तुमच्या मागे सगळे सोडून उभे राहतील.
**- नरेश म्हस्के**, खासदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

मंगळवार, १० मार्च २०२६ ३


उद्धव ठाकरेंनी राज्याचे संकट काळात उत्तम प्रकारे नेतृत्व केले आहे. त्यांच्यासारख्या नेत्याने विधान परिषदेमध्ये असणे हे महाविकास आघाडीसाठी चांगले संकेत असतील आणि आमच्या आमदारांना बळ मिळेल.
**- संजय राऊत**, खासदार



# इस्रायलने लेबनॉनमध्ये केला रासायनिक शस्त्रांचा वापर

## ह्युमन्स राईट्स वॉचचा आरोप; गावांवर टाकले गोळे



### व्हाईट फॉस्फरसचा वापर घातक

» रहिवासी भागांत व्हाईट फॉस्फरसचा केला जाणारा वापर अत्यंत गंभीर आहे. याचा नागरिकांवर भीषण परिणाम होऊ शकतो, असे ह्युमन राईट्स वॉचच्या लेबनॉन येथील कार्यकर्ते रामजी काईस यांनी सांगितले. रहिवासी भागांमधील ठिकाणांवर व्हाईट फॉस्फरसचा वापर नागरिकांवर हल्ल्यांसाठी नव्हे तर स्मोक स्क्रीन बनवण्यासाठी केला, असा दावा इस्रायली सैन्याकडून केला जायचा. मात्र, या मुद्यावर इस्रायली सैन्याने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. ■

### मागील युद्धातही वापर

» **इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात जून २०२५ मध्ये झालेल्या युद्धादरम्यान दक्षिण लेबनॉनमध्ये कित्येकदा व्हाईट फॉस्फरसचा वापर करण्यात आला होता. त्यावेळी नागरिकांच्या उपस्थितीत व्हाईट फॉस्फरस वापरण्यात आले.** ■

◆ **बैरूत, ९ मार्च**

इस्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनच्या एका गावात व्हाईट फॉस्फरसचा वापर केलेले गोळे डागले, असा आरोप मानवाधिकार संघटना ह्युमन राईट्स वॉचने केला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या अंतर्गत हा प्रकार अत्यंत वादग्रस्त आहे तसेच रायासनिक शस्त्रे अत्यंत धोकादायक समजली जातात.

संस्थेने सात प्रतिमांचे भौगोलिक स्थान आणि पडताळणी केली. इस्रायलने दक्षिण लेबनॉनमधील योहमोर गावातील निवासी गावांवर तोफखान्याद्वारे डागलेल्या गोळ्यांमध्ये व्हाईट फॉस्फरसचा वापर केला, असा निष्कर्ष या पडताळणीतून काढला आहे. इस्रायली सैन्याने काही तासांपूर्वीच गावातील नागरिक आणि दक्षिण लेबनॉनच्या इतर काही गावे सोडण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर हा हल्ला करण्यात आला. हल्ला झाला त्यावेळी गावात नागरिक उपस्थित होते का, याची माहिती मिळू शकली नाही, असे ह्युमन राईट्स वॉचने म्हटले आहे.

घनदाट लोकवस्ती असलेल्या भागात व्हाईट फॉस्फोरसचा वापर हा आंतरराष्ट्रीय मावनी कायद्यांचे उल्लंघन मानले जाते, असे मानवाधिकार कार्यकर्त्यांनी सांगितले. हा रासायनिक पदार्थ गरम होऊन पेट घेतो. यामुळे इमारतींना आग लागू शकते आणि मानवी शरीर आणि हाडेही जाळू शकते. किरकोळ होरपळल्यानेही संसर्ग, अवयव निकामी होणे आणि श्वासोच्छवासाशी निगडीत समस्या मोठ्या प्रमाणावर उद्‌भवू शकतात, अशी माहिती तज्ज्ञांनी एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. ◂(वृत्तसंस्था)

### निर्बंधांमुळे इंडिगोचे विमान दिल्लीला परतले

◆ **नवी दिल्ली, ९ मार्च**

भाडेतत्त्वावर चालवले जाणारे बोईंग ७८७ इंडिगोचे मँचेस्टरला जाणारे विमान सोमवारी काही निर्बंधांमुळे दिल्लीत परतले. हे विमान एरिट्रियाच्या हवाई क्षेत्रात प्रवेश करणार होते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीमुळे, शेवटच्या क्षणी हवाई निर्बंधांमुळे दिल्लीहून मँचेस्टरला जाणारे विमान दिल्लीला परतावे लागले. प्रवास पुन्हा सुरू करण्याच्या शक्यतांचा शोध घेण्यासाठी आम्ही संबंधित अधिकाऱ्यांसोबत काम करत आहोत, असे इंडिगोने एका निवेदनात म्हटले आहे. एरिट्रियन अधिकाऱ्यांसोबत काही मंजुरीच्या समस्या होत्या आणि जोखीम मूल्यांकनानंतर, विमान दिल्लीला परतण्याचा निर्णय घेण्यात आला, असे सूत्राने सांगितले. एरिट्रिया हा एक आफ्रिकन देश आहे.

मध्य पूर्व संघर्षाच्या पृष्ठभूमीवर, नियामक (युरोपियन युनियन एव्हिएशन सेफ्टी एजन्सी) ने सौदी अरेबियासह मध्य पूर्वेतील काही हवाई क्षेत्रे वापरण्यास, यामध्ये नॉर्स अटलांटिकचा समावेश आहे, त्यांच्या विमानांना मनाई केली आहे. परिणामी, इंडिगो आता युरोपमध्ये प्रवेश करण्यासाठी आफ्रिकेतून लांब उड्डाण मार्गाचा वापर करत आहे. युरोपियन उड्डाणांसाठी, एअरलाईन युरोपमध्ये प्रवेश करण्यापूर्वी अरबी समुद्र, इथिओपिया, एरिट्रिया, लाल समुद्र आणि इजिप्तवरून उड्डाण करते. ◂(वृत्तसंस्था)

# मुख्य निवडणूक आयुक्तांना कालीघाट मंदिराबाहेर विरोध

## ‘चले जाव’च्या घोषणा; काळे झेंडेही दाखवले



कालीघाट मंदिर येथे आरती करताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार

◆ **कोलकाता, ९ मार्च**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सोमवारी सकाळी दक्षिण कोलकाता येथील पवित्र कालीघाट मंदिराला भेट दिली असता त्यांना जोरदार विरोध झाला. यावेळी आंदोलकांनी कुमार ‘चले जाव’च्या घोषणा देत त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. दरम्यान, घटनास्थळी उपस्थित पोलिस कर्मचाऱ्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवत सीईसींना मंदिराला भेट देण्याची परवानगी दिली.

यापूर्वी रविवारी रात्रीही ज्ञानेश कुमार शहरात पोहोचताच विमानतळाजवळ एसआयआरचा विरोध करत आंदोलन करण्यात आले. विमानतळावरून कुमार यांचा ताफा निघत असताना तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांना लक्ष्य करत ‘चले जाव’ची घोषणाबाजी केली. दरम्यान, व्हीआयपी रोडवरील कैखली परिसरातून त्यांचा ताफा जात असताना सीईसींना काळे झेंडेही दाखविण्यात आले. तसेच टीएमसीसह डाव्या पक्षांच्या कार्यकर्त्यांनीही विमानतळाबाहेर निदर्शने केली. त्यामुळे परिसरात तणाव वाढला. दरम्यान, पोलिसांनी कठोरता दाखवत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले.

विधानसभा निवडणुकीपूर्वी कुमार यांच्या तीन दिवसांच्या भेटीसाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. तिसऱ्या दिवशी कुमार विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राजकीय पक्ष, अंमलबजावणी संस्था आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतील. कुमार हे निवडणूक आयुक्त एस. एस. संधू आणि विवेक जोशी यांच्यासोबत राज्याच्या दौऱ्यावर आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### काँग्रेस आमदाराची निवडणूक झाली रद्द

◆ **ग्वाल्हेर, ९ मार्च**

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने निवडणूक याचिकेवर महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. विजयपूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले काँग्रेस आमदार मुकेश मल्होत्रा यांची निवडणूक रद्द करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, याचिकाकर्ते माजी मंत्री रामनिवास रावत यांनी मुकेश मल्होत्रांवर त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात गुन्हेगारी रेकॉर्डची माहिती लपवल्याचा आरोप करणारी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर हा निर्णय देण्यात आला आहे.

पोटनिवडणुकीदरम्यान दाखल केलेल्या उमेदवारी अर्जात मुकेश मल्होत्रा यांनी त्यांच्या गुन्हेगारी रेकॉर्डची माहिती लपवली होती, असा आरोप याचिकेत करण्यात आला होता. मल्होत्रा यांच्यावर सहा गुन्हेगारी खटले दाखल होते. परंतु, त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात केवळ दोनच गुन्हे असल्याचे नमूद केले होते. ◂(वृत्तसंस्था)

# कुनो राष्ट्रीय अभयारण्यात पाच शावकांचा जन्म

एकूण संख्या **५३**



◆ **नवी दिल्ली, ९ मार्च**

मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय अभयारण्यात नामिबियातील मादी चित्ता ज्वालाने पाच शावकांना जन्म दिला. त्यामुळे देशातील एकूण चित्त्यांची संख्या ५३ झाली, अशी घोषणा केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी सोमवारी केली. याच अभयारण्यात गामिनी नावाच्या मादी चित्त्याने चार शावकांना जन्म दिल्यानंतर आता परत पाच शावक जन्माला आले आहेत.

चित्ता प्रकल्पासाठी हा खूप अभिमानाचा क्षण आहे. कारण, नामिबियन चित्ता आणि तिसऱ्यांदा यशस्वीरीत्या आई झालेली ज्वाला हिने आज कुनो राष्ट्रीय अभयारण्यात पाच शावकांना जन्म दिला. या जन्मासह, भारतात जन्मलेल्या वाढत्या शावकांची संख्या ३३ झाली आहे, जी भारतीय भूमीवर दहावे शावक जन्माला आले आहे. हा भारताच्या चित्ता संवर्धन प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे यादव यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

ही कामगिरी पशुवैद्यकीय कर्मचारी, क्षेत्रीय कर्मचारी आणि जमिनीवर अथकपणे काम करणाऱ्या सर्वांच्या समर्पित प्रयत्नांचे, कौशल्याचे आणि वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

या चित्यांच्या शावकांच्या आगमनाने, भारतातील एकूण चित्यांची संख्या आता ५३ वर पोहोचली आहे. वन्यजीव संवर्धनासाठी हा एक ऐतिहासिक आणि हृदयस्पर्शी क्षण आहे. ज्वाला आणि तिची शावके बलवान व्हावीत आणि पुढे धावत राहावीत, असे यादव यांनी पोस्टमध्ये म्हटले. ◂(वृत्तसंस्था)

# नॅशनल हेरॉल्ड प्रकरण : सुनावणी पुढे ढकलली

◆ **नवी दिल्ली, ९ मार्च**

नॅशनल हेरॉल्डशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार देणाऱ्या ट्रायल कोर्टाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या ईडीच्या याचिकेवरील सुनावणी दिल्ली उच्च न्यायालयाने पुढे ढकलली आहे. न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांच्या खंडपीठाने आता पुढील सुनावणी २० एप्रिलला ठेवली आहे.

ईडीने १६ डिसेंबर २०२५ च्या ट्रायल कोर्टाच्या आदेशाला आव्हान दिले आहे. ईडीच्या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने २२ डिसेंबरला सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यासह इतर आरोपींना नोटीस बजावल्या होत्या. वास्तवात १६ डिसेंबर २०२५ रोजी राऊस एव्हेन्यू कोर्टाने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरुद्ध ईडीच्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला होता. राऊस अव्हेन्यू कोर्टाने म्हटले होते की, ईडीच्या आरोपपत्राची दखल खासगी तक्रारीवर आधारित असू शकत नाही. काँग्रेस पक्षाला देणगी देणाऱ्या लोकांची फसवणूक झाल्याचे ईडीने म्हटले. ◂(वृत्तसंस्था)


## मणिपूरमध्ये दोन बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, ९ मार्च**

मणिपूरच्या वेगवेगळ्या भागातून दोन बंडखोरांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले. रविवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोंगपाल चिंगांगबम लीकाई येथून प्रतिबंधित सोरेपा संघटनेच्या एका सदस्याला अटक करण्यात आली. स्थानिक लघु व्यवसायांकडून खंडणी वसूल करण्याचा आरोप त्याच्यावर होता. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील प्रजातंत्र गल्ली येथून प्रेपाकच्या एका कॅडरला अटक करण्यात आली. वेगळ्या कारवाईत, टेंग्नौपाल जिल्ह्यातील मोरेह सीमावर्ती शहरातील एका हॉटेलमधून तीन संशयित ड्रग्ज तस्करांना अटक करण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### शहिद कपूरने केली ‘फर्जी २’च्या चित्रीकरणाला सुरुवात



**मुंबई** : शाहिद कपूरच्या ‘फर्जी’ वेब सीरिजच्या दुसऱ्या सीझनच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. अभिनेत्याने इन्स्टाग्रामवर चित्रकरणाच्या पहिल्या दिवसाचा फोटो शेअर केला. यासोबतच त्याने आपल्या भूमिकेचा लूकही दाखवला. ‘फर्जी २’चा पहिला दिवस... पुन्हा सुरुवात!, असे कॅप्शन शाहिदने लिहिले. यापूर्वी शाहिद कपूरने ‘फर्जी’ सीझन २ यायला वेळ लागेल. सिरीझच्या चित्रीकरण आणि पोस्ट-प्रोडक्शनला खूप वेळ लागतो. ही सिरीझ अनेक भाषांमध्ये डब करून २०० देशांमध्ये प्रदर्शित केली जाणार असल्याचे त्याने सांगितले होते. ■

### आलियाचा ‘अल्फा’ होणार १० जुलैला प्रदर्शित



**मुंबई** : यश राज फिल्म्सच्या बहुप्रतिक्षित ‘अल्फा’ या चित्रपटाची प्रदर्शनहची तारीख जाहीर झाली आहे. अभिनेत्री आलिया भट्ट प्रमुख भूमिकेत असलेला हा चित्रपट १० जुलैला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यासोबतच चित्रपटाचे टीझर पोस्टरही समाज माध्यमांवर जारी करण्यात आले असून यामधील आलिया भट्टचा लूक सध्या जोरदार चर्चेत आहे. ‘अल्फा’ या चित्रपटात आलिया भट्टसोबत अभिनेत्री शर्वरी देखील महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. याशिवाय ज्येष्ठ अभिनेता अनिल कपूर, बॉबी देओल या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन शिव रवैल यांनी केले आहे. ■

### ‘कल्की २’साठी कमल हसन यांची फी २० लाख डॉलर्स



**मुंबई** : २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘कल्की २८९८ एडी’ या चित्रपटाच्या सिक्वेलमध्ये कमल हासनची भूमिका अधिक महत्त्वाची असणार आहे. त्यांना पहिल्या भागासाठी दररोज १० लाख डॉलर्स मानधन देण्यात आले होते, असा दावा चित्रपट निर्माते-अभिनेते युगी सेतू यांनी अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत केला आहे. चित्रपटाच्या निर्मात्याला भेटल्यानंतर, युगी यांनी दावा केला की अभिनेत्याला प्रत्यक्षात शूटिंगसाठी दररोज २० दशलक्ष डॉलर्स मिळत होते. कमल सरांची प्रतिष्ठा इतकी आहे की त्यांना ‘कल्की २८९८ एडी’ या चित्रपटाच्या २० दिवसांसाठी १५० कोटी रुपये मिळत आहेत. ते भारतातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेता आहेत आणि त्यांना दररोज १० दशलक्ष डॉलर्स मिळत आहेत, कारण त्यांना २० दिवसांसाठी १५० कोटी रुपये मिळत होते, असे युगी सेतू यांनी सांगितले. ■

# शैक्षणिक शुल्क आगाऊ घेतल्यास कारवाई

## वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीम यांचा इशारा

◆ **मुंबई ९ मार्च**



शिष्यवृत्तीधारक आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांनी विकास शुल्क आणि शैक्षणिक फी आगाऊ वसूल करू नये, यासाठी राज्य सरकार लवकरच कडक शासन निर्णय निर्गमित करणार असल्याची घोषणा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत केली.

प्रश्नोत्तराच्या तासात आमदार योगेश सागर यांनी राज्यातील शासकीय व मान्यता प्राप्त वैद्यकीय मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील मुलींना शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीबाबत प्रश्न विचारला होता.मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, ‘‘उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याशी चर्चा करून विद्यार्थ्यांकडून अनावश्यक विकास शुल्क आकारले जाऊ नयेत, असे स्पष्ट आदेश काढले जातील.

‘‘काही महाविद्यालये फी प्रतिपूर्ती होईल की नाही, या शंकेतून विद्यार्थ्यांकडून पैसे घेतात. महाविद्यालयांनी फी प्रतिपूर्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांची अडवणूक केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचे संकेतही त्यांनी दिले.

गेल्या दोन वर्षांतील आकडेवारी पाहता राज्य शासनाने १००% फी प्रतिपूर्ती केली आहे. वित्त विभाग देखील शैक्षणिक बाबीसाठी निधी विहित वेळत देण्यासाठी आग्रही आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून फी वसूल करू नये, यासाठी आम्ही तातडीने कार्यवाही करूअसेही त्यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

## राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या परीक्षा शुल्काबाबत फेरविचार



राज्यातील शासकीय नोकर भरती प्रक्रियेत परीक्षार्थींवर येणारा आर्थिक भार कमी करण्यासाठी तसेच परीक्षा पद्धती अधिक सुसूत्र आणि पारदर्शक करण्यासाठी राज्य शासन महत्त्वाचे पाऊल उचलत आहे. इतर राज्ये आणि केंद्र शासनाच्या परीक्षांमध्ये राखीव प्रवर्गातील उमेदवारांकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या पद्धतीचा अभ्यास समितीमार्फत करून योग्य निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली.

शासकीय नोकरभरती प्रक्रियेत आकारल्या जाणाऱ्या परीक्षा शुल्काबाबत सदस्य श्वेता महाले यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री शेलार बोलत होते. या चर्चेत सदस्य सुधीर मुनगंटीवार, नितीन राऊत, राजेश पवार, राजकुमार बडोले आणि प्रताप अडसड यांनीही सहभाग घेतला. मंत्री शेलार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात ‘महाभरती’च्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे १ लाख २० हजार पदांची भरती करण्यात आली आहे.

चालू अर्थसंकल्पात आणखी ७० हजारांहून अधिक पदे भरण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. भरती प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि उमेदवारांसाठी सोयीस्कर करण्यासाठी परीक्षांचे सुसूत्रीकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. ■

# पृथ्वीचे ऋतुचक्र पूर्णपणे झाले विस्कळीत

## ● अनेक संस्थांच्या अहवालांचे केले विश्लेषण ● विज्ञान आणि पर्यावरण केंद्राने केला अहवाल तयार

◆ **नवी दिल्ली, ९ मार्च**

भारताची पारंपारिक ओळख ही विविध ऋतूचक्रांनी नटलेला देश अशी आहे. ऋतुंनुसारच आपल्याकडे अनेक सण साजरे करतात. पृथ्वीचे हेच ऋतूचक्र आता पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पृथ्वीच्या वाढत्या उष्णतेमुळे निसर्गाची लय बिघडत चालली आहे.

या बिघडत्या ऋतुचक्राबाबत धोक्याची सूचना विज्ञान आणि पर्यावरण केंद्राने ‘डाउन टू अर्थ’ या अहवालातून दिली आहे. हवामान विभाग आणि सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीचा अभ्यास करून विज्ञान आणि पर्यावरण केंद्राने एक अहवाल तयार केला. २०१२ ते सप्टेंबर २०२५ या सुमारे १,५०० दिवसांमधील हवामानातील बदलांचा एक नकाशातून



धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. भारतामध्ये तीन ऋतू उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे स्पष्टपणे वेगळे जाणवायचे, मात्र आता वाढत्या उष्णतेमुळे निसर्गाची लय बिघडली आहे. हे ऋतू एकमेकांत मिसळले आहेत. म्हणजेच, कोणत्याही ऋतुत पाऊस पडतो तर कधी हिवाळ्यात उन्हाचा तडाखा जाणवतो. २०२५ वर्षातील जानेवारी ते सप्टेंबरमध्ये देशात सुमारे ९९ टक्के दिवस अतिवृष्टीचा अनुभव आला. या २७३ दिवसांमध्ये भारताच्या काही भागात अतिवृष्टी, उष्णतेची लाट, गारपीट किंवा चक्रीवादळ यासारख्या आपत्तीचा तडाखा बसला.

मागील चार वर्षांत भारतात प्रथमच जवळजवळ संपूर्ण वर्षभर अतिवृष्टीच्या घटनांची नोंद झाली आहे. २०२३ मध्ये केवळ सहा राज्यांमध्ये अशा घटना घडल्या, तर २०२५ मध्ये देशभरातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश प्रभावित झाले. जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये ५९ पैकी ५७ दिवस अतिवृष्टीच्या घटना नोंदवल्या गेल्या, असे विज्ञान आणि पर्यावरण केंद्राने एक अहवालातील आकडेवारीवरून असे दिसून येते. ◂(वृत्तसंस्था)

### ऋतू बदलाचा पिकावरही परिणाम

» **ऋतू बदलाचा आणखी उदाहरण म्हणजे अवकाळी पावसामुळे शेतकरी आता जूनमध्ये पेरणी करायला घाबरत आहेत. कधी पाऊस उशिरा येतो, तर कधी तयार झालेले पीक अवकाळी पावसामुळे मातीमोल होते. नोव्हेंबरपर्यंत पडणाऱ्या पावसामुळे संपूर्ण खरीप आणि रब्बी पिकांच्या कापणीत व्यत्यय आला आहे.** ■

### २.४७ लाख रुपयांचे हेरॉईन जप्त

◆ **इटानगर, ९ मार्च**

अरुणाचल प्रदेशातील चांगलांग जिल्ह्यातून २.७४ लाख रुपयांचे हेरॉईन जप्त करण्यात आल्यानंतर पोलिसांनी दोघांना अटक केली, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले.

रविवारी जिल्ह्यातील बोर्डुमसा सर्कल अंतर्गत वागुन पोंथाई ट्राय-जंक्शनजवळ दोघांना अटक करण्यात आली. बोर्डुमसा पोलिस स्टेशनचे प्रभारी तोमाई वांगपन यांच्या नेतृत्वाखालील ड्रग्ज विरोधी पथकाने आसाममधील जगुनहून बोर्डुमसाकडे जाणाऱ्या एका वाहनाला अडवले. कसून तपासणीत स्टिअरिंग बॉक्सखाली लपवलेले सुमारे २.७४ लाख रुपये किमतीचे ४२.९३ ग्रॅम हेरॉइन जप्त केले. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# नेपाळमधील सत्तांतराचा नवा अध्याय

शिक्षण, रोजगार, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक शासन याबाबतच्या अपेक्षा नव्या पिढीत तीव्र आहेत. त्यामुळे भविष्यात राजकीय बदल घडवून आणण्यात युवकांची भूमिका अधिक निर्णायक ठरू शकते, हा नेपाळमधील नव्या सत्तांतर पर्वाचा धडा आहे. गेल्या अनेक दशकांत नेपाळमधील घडामोडींमुळे दक्षिण आशियातील राजकारणात अनेकदा अनपेक्षित वळणे घेतली आहेत. राजेशाहीचा अंत, प्रजासत्ताकाची स्थापना, माओवादी आंदोलन आणि वारंवार होणारी सत्ताबदलाची राजकीय अस्थिरता या सर्व टप्प्यांतून जात असताना नेपाळमध्ये घडलेल्या नव्या सत्तांतरातून पुन्हा एकदा नव्या प्रकारच्या राजकीय प्रयोगाचा प्रारंभ दिसू लागला आहे. नव्या वर्षात पहिल्या तिमाहीतच नेपाळमध्ये घडलेले सत्तांतर हा केवळ तेथील सत्तापालट किंवा सरकारमधील बदल नाही; तर नव्या पिढीच्या प्रगल्भ जाणिवा, समस्या आणि गरजांविषयीची जागृती व या पिढीच्या राजकीय हस्तक्षेपाचे प्रतीक म्हणून त्याकडे पाहावयास हवे. आजच्या तरुण पिढीने या जाणिवांचे दर्शन केवळ नेपाळमध्येच घडविलेले आहे असे नाही. 'जेन-झी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पिढीच्या आंदोलनांमुळे जगातील अनेक देशांच्या राजकारणाला आणि सत्ताकारणाला वेगळ्या दिशा मिळाल्याचे अलिकडील काही देशांतील तरुणांच्या आंदोलने आणि आक्रमक राजकीय अपेक्षांतून पाहावयास मिळाले आहे. त्यातूनच नेपाळमधील प्रस्थापितांच्या पठडीबाज राजकारणाची सद्दी संपली आणि नवी राजकीय समीकरणे उदयास आली. नेपाळमध्ये जे घडले, तो केवळ नेपाळच्याच नव्हे, तर दक्षिण आशियातील राजकारणासाठी महत्त्वाचा संकेत मानला जात आहे.

नेपाळमधील पारंपरिक राजकारण दीर्घकाळ काही ठरावीक पक्ष आणि नेत्यांभोवती फिरत राहिले. माओवादी, कम्युनिस्ट आणि काँग्रेस या प्रमुख राजकीय शक्तींमध्येच सत्तेचा खांदेपालट होत राहिला, परंतु सामान्य नागरिकांच्या जीवनात फारसा बदल दिसत नव्हता. भ्रष्टाचाराच्या आरोपांची मालिका, आर्थिक अडचणी, बेरोजगारी आणि रोजगाराच्या शोधात परदेशांत होणारे मोठ्या प्रमाणातील स्थलांतर यामुळे युवकांमध्ये असंतोष वाढत होता. शिक्षण घेऊनही देशात रोजगाराच्या मर्यादित संधी, आणि राजकीय घराणेशाहीमुळे नव्या नेतृत्वाला संधी न मिळणे या कारणांनी तरुणांचा पारंपरिक राजकारणावरील विश्वास कमी होत गेला, त्याचा परिणाम म्हणून या सत्तापालटाकडे पाहावे लागेल. समस्यांच्या संघर्षात भरडलेल्या तरुणाईच्या या असंतोषाची ठिणगी गेल्या वर्षअखेरच्या काही महिन्यांतच पडली होती. सरकारने काही सामाजिक माध्यमांवर निर्बंध लावण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये आणि तरुणांमध्ये संतापाची लाट उसळली. इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांवर पोसलेल्या आणि त्यावरच मुख्यतः विसंबून असलेल्या पिढीसाठी हा प्रशासकीय निर्णय केवळ तांत्रिक प्रश्न न राहता, तो अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादांचा प्रश्न बनला. देशभर विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि स्वतंत्र कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. विशेष म्हणजे, या आंदोलनामागे पारंपरिक राजकीय पक्षांचे नेतृत्व नव्हते. सामाजिक माध्यमांवरूनच आंदोलनाची आखणी होत गेली आणि हजारो तरुण स्वयंस्फूर्तीने यामध्ये सहभागी झाले. पुढे काही दिवसांतच ते उग्र झाले आणि सरकारविरोधी वातावरण तापत गेल्याने नेपाळी सत्तेवरील राजकीय दबाव वाढत गेला. के. पी. शर्मा ओली यांच्या सरकारला या आंदोलनांचा मोठा राजकीय धक्का बसला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे स्पष्ट झाल्यावर त्यांना पद सोडावे लागले. त्यानंतर अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले आणि नव्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. नव्या पिढीच्या नेतृत्वाला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हे या निवडणुकीचे वेगळेपण ठरले आणि रॅप गायकीकडून राजकारणात दाखल झालेले बालेंद्र शहा यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी या जेमतेम चार वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या पक्षाला ऐतिहासिक बहुमत देऊन नेपाळी जनतेने सत्तापालट घडविला. पारंपरिक राजकीय पक्षांच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि भ्रष्टाचारविरोधी प्रतिमा असलेल्या या नेतृत्वाला मिळालेला युवकांचा मोठा पाठिंबा हेदेखील या निवडणुकीतील जेन-झी च्या जागृत जाणिवांचे संकेत म्हणावे लागतील. कारण, इंटरनेट, समाजमाध्यमे आणि जागतिक माहिती प्रवाहाच्या वातावरणात वाढलेल्या जेन-झी पिढीचा या संपूर्ण प्रक्रियेतील सहभाग विशेष लक्षवेधी ठरतो. आजच्या प्रगत माहिती युगातील तरुण नागरिक केवळ प्रेक्षक राहिलेले नसून ते राजकीय प्रक्रियेचे सक्रिय सहभागी घटक होऊ पाहात आहेत. त्यांच्या अपेक्षा, त्यांच्या प्रश्न आणि त्यांच्या आकांक्षा या कोणत्याही लोकशाहीच्या भवितव्याला आकार देऊ शकतात, हा संदेशही या निकालाने जगाला दिला आहे. म्हणूनच केवळ भारताशेजारच्या एका देशातील राजकीय घटना एवढ्याच दृष्टीने या सत्तांतराकडे न पाहता, जागतिक पटलावरील बदलत्या सामाजिक-राजकीय वास्तवाचे संकेत देणारी घटना म्हणून या सत्ताबदलाची दखल घ्यावी लागेल.

अर्थात, आंदोलनातून उभे राहिलेले नेतृत्व सत्तेत आल्यानंतर त्यांच्यासमोरही अनेक कठीण आव्हाने उभी असतात. एक तर, अशा सत्ताधाऱ्यांकडून जनतेच्या अपेक्षा अधिक उंचावलेल्या असतात. आर्थिक संकट, प्रशासनातील जुनी व्यवस्था आणि शेजारील मोठ्या देशांशी संतुलित परराष्ट्र धोरण राखणे अशा अनेक या सर्व प्रश्नांना या नवख्या सत्ताधीशांस सामोरे जावे लागणार असते. युवकांच्या अपेक्षा खूप मोठ्या असल्याने त्या पूर्ण करण्यात अपयश आले तर नव्या नेतृत्वालाही तीव्र जनआक्रोशाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे, नेपाळमधील सत्तांतर हे राजकीय व्यवस्थेतील पिढीबदलाचे प्रतीक असले आणि आंदोलनातून राजकीय परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता नव्या पिढीत आहे, हे या घटनाक्रमाने सिद्ध केले असले, तरी आता सत्तेच्या राजकारणात या बदलाचा प्रभाव किती टिकून राहतो, याची अग्निपरीक्षा नव्या सरकारला पार पाडावी लागणार आहे. दक्षिण आशियातील राजकारणाच्या पुढील वाटचालीत या घटनेचे परिणाम दूरगामी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. या निवडणुकीत बालेंद्र शहा यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने निर्णायक बहुमत मिळविले आहे आणि माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या पक्षाला जेमतेम जागांवर विजयाची संधी देऊन त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. आता शहा यांच्या नव्या नेतृत्वाला नव्या पिढीच्या अपेक्षांची पूर्तता करण्याकरिता तातडीने काही धोरणात्मक कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. २७५ सदस्यांच्या सभागृहात बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील पक्षास दोन तृतीयांश बहुमत मिळण्याची स्पष्ट चिन्हे म्हणजे शहा सरकारवरील जनतेच्या या अपेक्षांचे नवे ओझे आहे. कारण या विजयामध्ये जवळपास दहा लाख नवमतदारांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

त्यातच, सरकार चालविण्याच्या राजकारणात शहा अगदीच नवखेदेखील आहेत. काठमांडूचे महापौरपद आणि अस्थिर आर्थिक संकटात सापडलेल्या देशाचे नेतृत्व यांमधील अनुभवांतही मोठे अंतर असते. नेपाळच्या डळमळत्या अर्थव्यवस्थेचा डोलारा पूर्वपदावर आणणे आणि शेजारी राष्ट्रांसोबतच्या नात्याची पुनर्बांधणी करणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, आरोग्य सुविधा सुदृढ करणे अशी अनेक नवी आव्हाने नेपाळच्या नव्या सत्ताधीशांसमोर आहेत. भारत आणि चीन या भारतीय उपखंडातील दोन प्रबळ सत्तांमधील संरक्षक पट्टी म्हणून नेपाळमधील राजकीय घडामोडी संवेदनशील असल्याने, या सत्ताबदलाचे भारतीय उपखंडातील भूराजकीय परिणाम दक्षिण आशियाच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही कळीचे मुद्दे ठरतात. कारण, आजच्या समस्याग्रस्त नेपाळचा भारत हा सर्वांत मोठा विकास भागीदार आहे. आरोग्य, शिक्षण, जलशक्तीसारख्या अनेक प्रकल्पांत भारताची नेपाळमध्ये गुंतवणूक होत आहे. सत्ताबदलाच्या पर्वात या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत अडथळे आले, तर नेपाळी जनतेच्या नव्या सरकारकडून असलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्याची परीक्षा अवघड ठरू शकते. ▮

## आंतरराष्ट्रीय

# 'नेट-झीरो' आणि डिजिटल क्रांतीचे योगदान

**प्रा. जयसिंग यादव**

'नेट-झीरो' म्हणजे वातावरणात सोडल्या जाणाऱ्या हरितगृह वायूंचे प्रमाण आणि ते शोषून घेण्याचे प्रमाण यामध्ये संतुलन साधणे. म्हणजेच जितके उत्सर्जन होते, तितकेच कार्बन शोषून घेण्याची व्यवस्था निर्माण करणे. यासाठी दोन मार्ग महत्त्वाचे मानले जातात. पहिला म्हणजे कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी करणे आणि दुसरा म्हणजे जंगलवाढ, कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान किंवा इतर नैसर्गिक प्रक्रियांद्वारे उत्सर्जित कार्बन शोषून घेणे. या संकल्पनेला जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यामागे पॅरिस हवामान करार हा महत्त्वाचा टप्पा ठरला. २०१५ मध्ये झालेल्या या करारानुसार जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसच्या मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. ते साध्य करण्यासाठी शतकाच्या मध्यापर्यंत जगाने 'नेट-झीरो' उत्सर्जन गाठणे आवश्यक असल्याचे वैज्ञानिकांनी स्पष्ट केले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हवामानबदलाचे परिणाम जगभरात स्पष्टपणे दिसू लागले आहेत. युरोपमध्ये उष्णतेच्या लाटा, अमेरिकेत चक्रीवादळे, आफ्रिकेत दुष्काळ, आशियामध्ये पूर आणि जंगलातील आगी यासारख्या घटनांनी हवामानबदलाचे भीषण रूप उघड केले आहे. समुद्रपातळी वाढल्यामुळे किनाऱ्यावरील काही राष्ट्रांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कृषी उत्पादनावरही हवामानबदलाचा मोठा परिणाम होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर येत्या काही दशकांमध्ये जगासमोर अन्नटंचाई, पाण्याची कमतरता आणि पर्यावरणीय स्थलांतर यासारखी गंभीर संकटे उभी राहू शकतात. त्यामुळेच 'नेट-झीरो'चे ध्येय आता पर्यावरणीय प्रश्नापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याशीही थेट जोडले गेले आहे.

'नेट-झीरो'च्या प्रवासात विकसित देशांची भूमिका निर्णायक मानली जाते. कारण औद्योगिक क्रांतीपासून आजपर्यंतच्या एकूण कार्बन उत्सर्जनात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. अमेरिका, युरोपीय महासंघ, जपान आणि कॅनडा यांच्यासारख्या देशांनी २०५० पर्यंत 'नेट-झीरो' साध्य करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. युरोपीय महासंघाने हरित ऊर्जा, स्वच्छ वाहतूक आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक सुरू केली आहे. 'ग्रीन डील' धोरणांतर्गत उद्योग, शेती आणि शहरी विकासात मोठे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेतही अक्षय ऊर्जेच्या विस्ताराला चालना देणारी धोरणे राबवली जात आहेत. सौर आणि पवन ऊर्जेच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक वाढत असून इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे; मात्र विकसित देशांवर अजूनही टीका होत असते की त्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर उत्सर्जन केले असूनही विकसनशील देशांना आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरेशी दिलेली नाही. विकसनशील देशांसाठी 'नेट-झीरो'चा प्रवास अधिक गुंतागुंतीचा आहे. कारण या देशांमध्ये आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि गरिबी निर्मूलन या प्राथमिक गरजा अजूनही महत्त्वाच्या आहेत. उद्योग, ऊर्जा आणि वाहतूक क्षेत्राचा विस्तार करताना उत्सर्जन कमी ठेवणे हे मोठे आव्हान आहे. भारत, चीन, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यासारख्या देशांनीही 'नेट-झीरो'ची उद्दिष्टे जाहीर केली आहेत.

चीनने २०६० पर्यंत 'नेट-झीरो' साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, तर भारताने २०७० पर्यंत 'नेट-झीरो' गाठण्याची घोषणा केली आहे. या देशांनी अक्षय ऊर्जेचा विस्तार, ऊर्जा कार्यक्षमता आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर यावर भर दिला आहे; परंतु या परिवर्तनासाठी प्रचंड गुंतवणूक आवश्यक आहे. त्यामुळे विकसनशील देश वारंवार सांगतात, की विकसित देशांनी हवामान वित्तपुरवठा आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यामध्ये अधिक उदार भूमिका घ्यावी. जागतिक कार्बन उत्सर्जनात सर्वाधिक वाटा ऊर्जा क्षेत्राचा आहे. कोळसा, तेल आणि वायू यासारख्या जीवाश्म इंधनांवर आधारित ऊर्जा प्रणालीमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर कार्बन सोडला जातो. त्यामुळे 'नेट-झीरो'च्या दिशेने वाटचाल करताना ऊर्जा संक्रमण अत्यंत महत्त्वाचे ठरते. सौर, पवन, जलविद्युत आणि हरित हायड्रोजन यासारख्या अक्षय ऊर्जेच्या स्रोतांना प्रोत्साहन देणे, हा या संक्रमणाचा मुख्य भाग आहे. अनेक देशांमध्ये सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प वेगाने वाढत आहेत. ऊर्जा साठवण तंत्रज्ञान, 'स्मार्ट ग्रीड' आणि डिजिटल व्यवस्थापन यामुळे ऊर्जा प्रणाली अधिक कार्यक्षम आणि स्थिर बनत आहे. भारतासारख्या देशांमध्ये सौरऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. मोठ्या सौर पार्क प्रकल्पांमुळे आणि घरगुती सौर प्रणालींमुळे ऊर्जा क्षेत्रात नवे परिवर्तन घडत आहे. ऊर्जा क्षेत्राबरोबरच स्टील, सिमेंट, रसायन आणि वाहतूक यासारख्या क्षेत्रांमध्ये उत्सर्जन कमी करणे कठीण मानले जाते. या उद्योगांमध्ये उच्च तापमान प्रक्रिया आणि जीवाश्म इंधनांवर आधारित उत्पादन पद्धती वापरल्या जातात. या क्षेत्रांमध्ये कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान यांचा वापर वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आज अनेक उद्योग आपली उत्पादन प्रक्रिया अधिक स्वच्छ करण्यासाठी संशोधन आणि नवकल्पनांवर भर देत आहेत. 'नेट-झीरो'च्या प्रवासात तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. डिजिटलायझेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि डेटा विश्लेषण यासारख्या साधनांमुळे ऊर्जा वापर अधिक कार्यक्षम बनवणे शक्य होत आहे. स्मार्ट ग्रीड, स्वयंचलित इमारती आणि डिजिटल मॉनिटरिंग प्रणालीमुळे उत्सर्जन कमी करण्यास मदत मिळते. तसेच कार्बन कॅप्चर आणि स्टोरेज, हरित हायड्रोजन उत्पादन आणि प्रगत बॅटरी तंत्रज्ञान यासारख्या नव्या तांत्रिक उपाययोजना भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. 'नेट-झीरो' हा केवळ पर्यावरण संरक्षणाचा कार्यक्रम नाही, तर तो हरित अर्थव्यवस्थेचा नवा मार्गही आहे. अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा कार्यक्षम इमारती आणि हरित उद्योग यामुळे लाखो नवे रोजगार निर्माण होऊ शकतात. अनेक देश या परिवर्तनाकडे आर्थिक विकासाची संधी म्हणून पाहत आहेत. हरित तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढल्यामुळे उद्योग आणि संशोधन क्षेत्राला नवे प्रोत्साहन मिळत आहे. 'नेट-झीरो' हा प्रश्न जागतिक स्वरूपाचा असल्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यावश्यक आहे. हवामान वित्तपुरवठा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सामायिक संशोधन यामुळेच जागतिक स्तरावर परिणामकारक बदल घडू शकतो. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदांमध्ये या विषयावर सातत्याने चर्चा होत आहे; मात्र अनेक वेळा विकसित आणि विकसनशील देशांमधील मतभेदामुळे निर्णय प्रक्रियेत अडथळे येतात.

भारत जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. त्यामुळे ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत, तरीही भारताने अक्षय ऊर्जेच्या विस्तारावर भर देत हरित विकासाचा मार्ग स्वीकारला आहे. सौर ऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहने, हरित हायड्रोजन मिशन आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या योजना यामुळे भारत 'नेट-झीरो'च्या दिशेने महत्त्वाची पावले उचलत आहे. त्याचबरोबर भारताने जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय सौर आघाडीसारख्या उपक्रमांद्वारे सहकार्यालाही चालना दिली आहे. 'नेट-झीरो'च्या प्रवासात अजून अनेक अडथळे आहेत. अक्षय ऊर्जा प्रकल्पांसाठी जमीन, गुंतवणूक आणि तांत्रिक क्षमता यासारख्या समस्या अनेक देशांसमोर आहेत. तसेच ऊर्जा संक्रमणामुळे पारंपरिक उद्योगांमध्ये रोजगाराचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. याशिवाय हवामान वित्तपुरवठ्याच्या प्रश्नावर विकसित आणि विकसनशील देशांमध्ये मतभेद कायम आहेत. त्यामुळे जागतिक सहकार्य अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर 'नेट-झीरो' उत्सर्जनाकडे वाटचाल हा केवळ पर्यावरणीय कार्यक्रम नाही, तर मानवजातीच्या भविष्याशी निगडित असलेले ऐतिहासिक परिवर्तन आहे. हवामानबदलाचे संकट टाळण्यासाठी आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारण्यासाठी हा बदल अपरिहार्य ठरतो. ऊर्जा संक्रमण, तांत्रिक नवकल्पना, धोरणात्मक सहकार्य आणि आर्थिक गुंतवणूक यांच्या साह्यानेच हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. जगातील सर्व देशांनी एकत्रितपणे प्रयत्न केले, तरच पृथ्वीचे पर्यावरण संतुलित राखणे शक्य होईल. 'नेट-झीरो'च्या दिशेने सुरू झालेली ही जागतिक वाटचाल अजूनही दीर्घ आणि आव्हानात्मक आहे; परंतु शाश्वत भविष्याची आशा जिवंत ठेवणारा हा एकमेव मार्ग असल्याचे आज सर्वांनाच मान्य करावे लागेल. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# भारताच्या शक्तीची चीनलाही जाणीव

आपल्या विस्तारवादी मानसिकतेसाठी चीनची संपूर्ण जगाला ओळख आहे. गरीब आणि असहायतेचा फायदा घेऊन चीनने अनेक देशांना आपल्या जाळ्यामध्ये ओढले आहे. त्यामुळे संपूर्ण जगामध्ये कटकारस्थान करून आपला स्वार्थ साधणारा देश म्हणून त्याची ओळख निर्माण झाली आहे. याबाबत भारत अतिशय सावधगिरीने पावले उचलून वाटचाल करीत असला, तरीही भविष्यामध्ये निर्माण होणाऱ्या घडामोडींबाबत डोळ्यात तेल घालून दक्ष राहण्याची गरज आहे. २०१४ नंतर उदयास आलेल्या नव्या भारताची ओळख चीनला नक्कीच झाली आहे. त्यामुळे ताकही फुंकून पिण्याच्या मानसिकतेमध्ये सध्या चीन वावरत आहे. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर २०१४ पर्यंत चीन भारतावर सतत कुरघोडी करीत राहिला. येथील सत्ताधारी हे सर्व आपल्या उघड्या डोळ्यांनी बघत राहिले. काँग्रेस पक्षाने अनेकदा देशहित बाजूला सारून आपल्या वैयक्तिक गरजांना प्राधान्य दिले. परंतु, डोकलाम आणि गलवान घाटीच्या घटनेने चीनला नरेंद्र मोदीच्या नव्या भारताची खरी ओळख झाली. आकाशालाही गवसणी घालण्याची ताकद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक आव्हानांना सामोरे जात निर्माण केली.

भारतीय संस्कृती आणि परंपरेची यावेळी खऱ्या अर्थाने जगाला ओळख झाली. त्यामुळे शक्तिशाली भारतसोबत मैत्रीचे नवे पर्व सुरू व्हावे यासाठी चीनने आटापिटा सुरू केला आहे. भारत आणि चीनने एकमेकांकडे प्रतिस्पर्धी नव्हे, तर भागीदार आणि धोक्याऐवजी संधी म्हणून बघितले पाहिजे, असे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांचे वक्तव्य म्हणजे संपूर्ण जगाला नव्या शक्तिशाली भारताची ओळख करून देणारे आहे. एका शक्तिशाली आणि शक्तिसंपन्न शेजारी देशाशी पूर्वीची सर्व कटुता विसरून भागीदार म्हणून जर चीन भारताकडे बघत असेल, तर चीनलाही भारताच्या शक्तीची, स्वाभिमानाची ओळख पटली आहे, हे दिसून येते.



या देशावर जवळपास ६० वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेस पक्षाने देशाला शक्तिसंपन्न करण्याऐवजी घराणेशाहीच्या संपन्नतेलाच अधिक महत्त्व दिले. काँग्रेसच्या या माानसिकतेची जबर किंमत देशाला मोजावी लागली. त्याचे चटके अजूनही आम्हाला बसत आहेत. काँग्रेस पक्षाने लाडावून ठेवलेला पाकिस्तान एका झटक्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरळ केला. हाती कटोरा घेऊन जगभर फिरण्यास त्याला बाध्य केले. संपूर्ण जगाला त्यांनी खऱ्या भारताची ओळख करून दिली. अमेरिका आणि चीन हे दोन देश नेहमीच एकमेकांना पाण्यात बघणारे. त्यामुळे शक्तिशाली भारत आपला मित्र असावा असे चीनला वाटणे स्वाभाविक आहे. परंतु, पाठीमध्ये खंजीर खुपसण्याची चीनची वृत्तीही आम्ही कायम स्मरणात ठेवली पाहिजे. चीनचे विस्तारवादी धोरण हे शेजारी राष्ट्राच्या जमिनीवर दावा करणे, लष्करी ताकद वाढविणे आणि त्या देशास आपल्या आर्थिक जाळ्यामध्ये ओढून त्यांचा भूभाग काबीज करणे यावरच आधारित आहे. चीनने केवळ भारताचाच नव्हे तर आपल्या जवळच्या जवळपास २३ देशांच्या भूभागावर दावा केला आहे. नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान, मालदीव यासारख्या अनेक लहान देशांना भरमसाट कर्ज देऊन चीनने या देशांना आपले बटिक बनविले आहे. त्यामुळे भविष्यामध्ये चीनचा या देशाशी व्यवहार कसा असेल, हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. चीनचा हा कावेबाजपणा जगानेही ओखला आहे. दुसरीकडे भारताने कोणत्याही अन्य देशाचा भूभाग बळकावण्याचा प्रयत्न तर दूर तसा साधा विचारही कधी केला नाही. हे विश्वचि माझे घर अशा उदात्त वृत्तीचे भारतीय आम्ही. त्यास अधिक ठळकपणे नरेंद्र मोदींनी जगासमोर मांडले आहे. संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी झटणारा भारत अशी ठाम ओळख मोदींनी जगामध्ये निर्माण केली आहे. त्यामुळे जगामधील कितीतरी देश भातरामध्ये आपले भविष्य शोधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. नरेंद्र मोदींची घोडदौड अशीच सुरू राहिली तर आपले काही खरे नाही, या नैराश्याने काँग्रेस ग्रासली असून, काँग्रेस बेताल आणि भयभीत झाली आहे. भारताच्या बदनामीचे षडयंत्र रचण्यात काँग्रेस आपला वेळ घालवीत आहे. विदेशामध्येही आपल्या देशाची बदनामी करीत आहे. शत्रू घरामधील असो की, बाहेरचा नरेंद्र मोदी हे चांगलेच ओळखून आहे. ▮

९८८१७१७८५६

## कानोसा

# विकसित भारतासाठी महिलांचे योगदान

**अमोल पुसदकर**

आईच्या नावावरून तिच्या पराक्रमी पुत्रांची ओळख प्राचीन काळापासून केली जात होती. कौशल्या नंदन राम, देवकीनंदन वासुदेव कृष्ण, कौंतेय अर्जुन, राधेय कर्ण आणि शालिवाहन राजघराण्यातील राजा सातकर्णी हा स्वतःची ओळख गौतमीपुत्र सातकर्णी अशी करून द्यायचा. आमची संस्कृती ही मातृपूजकच आहे. माहूरला आईचे श्राद्ध जिथे करतात. त्या तीर्थाचे नाव सुद्धा मातृतीर्थ आहे. संतांची, महापुरुषांची, देवतांची, पराक्रमी पुरुषांची अशी अनेक उदाहरणे आपल्या ग्रंथांमध्ये ठिकठिकाणी आपल्याला आढळून येतील. नुकताच जागतिक महिला दिन साजरा झालेला आहे. जगाला समानतेचे पाठ देणारे अमेरिका आणि युरोप या देशांमध्ये महिलांना समानतेचे अधिकार नव्हते. कामाचे तास, कामाच्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा या सुद्धा एकेकाळी नव्हत्या. त्या विरोधात महिला रस्त्यावर उतरल्या आणि त्यातून त्यांनी बदल घडवून आणले. याची स्मृती म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी महिला दिन साजरे केले जाऊ लागले आणि मग याला एके दिवशी जागतिक स्वरूप प्राप्त झाले.

जगामध्ये महिला हक्कांच्या या गोष्टी ज्या वेळेला घडत होत्या, त्याच्या अनेक वर्ष आधी भारतामध्ये ''मेरी झांसी नहीं दूंगी'' असे म्हणत एक तरुण मुलगी इंग्रजांच्या विरोधामध्ये आपल्या प्रजेच्या आणि राज्याच्या रक्षणार्थ उभी ठाकली होती. ती झाशीची राणी लक्ष्मीबाई होती. तिच्या महिला तुकडीचे नेतृत्व करणारी झलकारी बाई ही महिला सेनानी होती. आमच्या देशाला राणी लक्ष्मीबाई, राणी दुर्गावती, राणी चन्नम्मा, आझाद हिंद सेनेची महिला सेनापती कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन माहीत आहेत. ज्यावेळेस महिला अमेरिकेमध्ये हक्कांसाठी लढत होत्या, त्यावेळेला प्रीतिलता वड्डेदार, शांती घोष, दुर्गा भाभी यासारख्या महिला भारतीय स्वातंत्र्यासाठी लढत होत्या. त्यामुळे जागतिक महिला दिवस हाच केवळ भारतीय महिलांसाठी दिशादर्शक नाही. तरीसुद्धा जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांची समाजातील सद्य:स्थिती, त्यांच्यासमोरील आव्हाने, विकासासाठी खुणावणारी क्षेत्रे व आगामी काळात विकसित भारतासाठी त्यांचे योगदान या सर्वच बाबींवर विचार करण्याची आवश्यकता आहे. महिला म्हटलं की आपल्यासमोर सगळ्यात पहिले जर कोणती गोष्ट उभी राहत असेल, तर ती म्हणजे कुटुंब. मुलांचे संगोपन, मुलांना संस्कार देणारी आई, घरातील तिची पत्नी, आई, बहीण आणि सून अशा विविध रूपांतील भूमिका. या भूमिकांचा शेकडो वर्षांपासून कुटुंब व्यवस्थेला खूप मोठा आधार मिळत राहिलेला आहे. या सर्व भूमिकांनी कुटुंबाला नेहमीच सावरून धरलेलं होतं.



काळ बदलत गेला. शिक्षण, नोकरी, करीअर, समाजात चालणारे विविध स्त्रीमुक्तीचे प्रवाह, या सर्वच गोष्टींचा परिणाम या भूमिकांवर होत गेलेला आहे. मागच्या तीस वर्षांत खूप मोठे सामाजिक बदल कुटुंब व्यवस्थेमध्ये बघायला मिळालेले आहेत. तीस वर्षांपूर्वी या सर्व भूमिका कायम ठेवत स्त्रियांनी शिक्षण, नोकरी, व्यावसायिक कारकीर्द, सामाजिक कार्य या सर्वच क्षेत्रांमध्ये प्रवेश केला. त्यांनाही या सर्वच क्षेत्रांमध्ये प्रवेश करण्यासाठी, कायम राहण्यासाठी, प्रगती करण्यासाठी संघर्ष करावा लागला. या संघर्षातून वेळेचे व्यवस्थापन हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला. घरात आणि घराबाहेर वठविलेल्या भूमिकांमुळे साहजिकच परिश्रम वाढले व थकवा सुद्धा येऊ लागला. हळूहळू यातील काही भूमिकांना दिला जाणारा न्याय कमी होत गेला. आपण आपल्या भूमिकांना न्याय देऊ शकत नाही, यामुळे मानसिक संघर्ष सुद्धा निर्माण झाले. कौटुंबिक वाद सुद्धा निर्माण झाले.

२०४७ हे स्वातंत्र्याचे शंभरावे वर्ष आहे. या वर्षापर्यंत भारत खऱ्या अर्थाने कसा विकसित राहील, याचा विचार करणे आवश्यक आहे. महिलांची यामध्ये मोठी भूमिका राहणार आहे. १९४७ मध्ये समाजामध्ये एकत्र कुटुंब पद्धती होती. ७५ वर्षांमध्ये ती अति संकुचित झाली. मी, माझी बायको व माझा एखादा मुलगा किंवा मुलगी, इथपर्यंत कुटुंबाची व्याख्या आलेली आहे. आता ती त्याच्याही पुढे जाऊन मुलं नसलेली जोडपी इतकी समोर जाऊ पाहत आहे. त्यामध्ये आई-वडिलांचे स्थान कमी दिसत नाही. येणाऱ्या काळात यातून वृद्धाश्रम आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मोठ्या समस्या निर्माण होतील. ज्यांनी आपले संपूर्ण जीवन आपल्या मुलाबाळांना सुख-सुविधा, उत्तम शिक्षण देण्याकरिता घालविले आहे, त्याच वृद्धांवर उद्या त्यांनीच उभ्या केलेल्या इमारतींमधून बाहेर निघून वृद्धाश्रमात राहण्याची वेळ येणे हे काही चांगल्या समाजाचे लक्षण नाही. भारतापेक्षा मोठी लोकसंख्या चीनची आहे, परंतु त्यांनी लोकसंख्येला आपली कमतरता बनू दिलेले नाही, तर त्यांनी शक्ती बनविलेले आहे. चीनमध्ये लोकसंख्येच्या ४९ टक्के महिला आहेत. त्यांचा सहभाग हा राष्ट्र उभारणीत मोठा आहे. चीनच्या कुटीर उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिलांचे स्थान आहे. उद्योगांमध्ये सुद्धा ज्या ठिकाणी महिलांच्या अंगभूत गुणांचा उपयोग आहे, अशा सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणावर महिला कामगार, महिला अधिकारी, महिला उद्योजक आहेत. भारतातही अनेक यशस्वी महिला आहेत, ज्यामध्ये बायो कॉन या औषधे क्षेत्रातील कंपनीच्या संस्थापक किरण मजुमदार, वयाच्या पन्नासाव्या वर्षी नायका ही ऑनलाईन सौंदर्यप्रसाधने आणि स्वास्थ्य उत्पादने विकणारी कंपनी स्थापन करणाऱ्या फाल्गुनी नायर, वंदना लुथरा यांची आरोग्य व सौंदर्यप्रसाधने निर्माण करणारी व्हीएलसीसी ही कंपनी आहे. उद्योगाबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये सुद्धा महिला चांगली कामगिरी नोंदवीत आहे. ज्यामध्ये ऋतू श्रीवास्तव या चांद्रयान दोन या मोहिमेच्या मिशन संचालक होत्या, तर मुथया वनिता या प्रोजेक्ट डायरेक्टर होत्या, तर कविता या चंद्रावर विक्रम लँडर उतरविण्याच्या योजनेच्या तांत्रिक प्रमुख होत्या. पूर्वीपासूनच महिलांनी या देशांमध्ये सनातन हिंदू धर्म टिकवून ठेवलेला आहे. तो भविष्यातही कसा टिकेल, आमच्या येणाऱ्या पिढीला सुद्धा आम्ही त्यातील जीवनमूल्ये कशी संक्रमित करू शकू, याचाही विचार होणे गरजेचे आहे. पूर्वी शाळांच्या भिंतीवर अनेक सुविचार लिहिलेले असायचे. यामध्ये ''विद्या विनयेन शोभते'' असे लिहिलेले असायचे. हा सुविचार मुला-मुलींना सर्वांनाच लागू आहे. सर्वांनीच त्याचे भान ठेवावे असे वाटते. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### डोनाल्ड ट्रम्प जेम्स बाँडच्या भूमिकेत

युनोचा काही उपयोग आहे? हा सडेतोड अग्रलेख वाचला. इंग्रजी चित्रपटात जेम्स बाँड नावाच्या व्यक्तिरेखेला राईट टू कील हा अधिकार दिलेला असतो ज्यामध्ये त्याला कोणालाही, कधीही, कुठेही, कोणत्याही कारणाशिवाय गोळ्या घालून ठार करण्याचा अधिकार दिलेला असतो, असे सांगितले जाते. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे यानंतर जेम्स बाँडवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यास कायदेशीर मनाई होती. अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष सध्या जेम्स बाँडच्या भूमिकेत आलेले आहेत. परमेश्वराने त्यांना राईट टू अटॅक, राईट टू किडनॅप, राईट टू रुल, राईट टू इंटरव्हेन आणि राईट टू डिस्ट्रॉयसह जागतिक जेम्स बाँडची भूमिका प्रत्यक्षात निभावण्याची जबाबदारी दिलेली आहे. भारतात जशी नैतिकतेची सोल एजन्सी परमेश्वराने गांधी नेहरू परिवाराला आणि काँग्रेस पक्षाला दिली आहे, अगदी तशीच जबाबदारी डोनाल्ड ट्रम्पना मिळालेली आहे. अमेरिका फर्स्ट याचा, बाकी सगळे लास्ट असा सोयीस्कर अर्थ त्यांनी काढला आहे.

जगातील कोणत्या देशात कोणाचे सरकार हवे, कोणी कोणाकडून काय खरेदी करावे, कोणाला काय विकावे येथपासून ते कोणत्या देशाने कोणकोणत्या शस्त्रास्त्रांचा साठा करावा याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार ट्रम्प यांनाच आहे. एखादा देश अमेरिकन हिताच्या आड येणार असेल तर पैशाच्या जोरावर तेथे गुंडांच्या आणि दहशतवाद्यांच्या मदतीने सरकार उलथवणे, हे उपद्व्याप ट्रम्प उघडपणे आणि डंके की चोटपर करत आहेत. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेने त्याची झळ सोसली आहे. इराक, इराण, अफगाणिस्तानच्या नागरिकांना ते भोगावे लागले आहे. इतके होऊनही युनो, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोग, संयुक्त राष्ट्र संघाची सुरक्षा परिषद अशा सर्व संस्था बापूंच्या तीन मर्कटांच्या भूमिकेत गेल्या आहेत. जगातील दहशतवादाचे उच्चाटन करण्याची दर्पोक्ती करणारे डोनाल्ड ट्रम्प, आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांसाठी नंदनवन असलेल्या, जगातील विविध देशांत दहशतवाद पसरवणाऱ्या आणि ओसामा बिन लादेनला आपल्या पंखाखाली घेणाऱ्या पाकिस्तानचे मात्र चोचले पुरवत आहेत. जगातील रशिया, चीन आणि युरोपीय देशांनी अमेरिकेच्या दादागिरीचा विरोध केला असला तरीही नजीकच्या काळात अमेरिकेचा दहशतवाद थांबण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### पर्यावरण जनजागृती

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्ती या विषयांवर जनजागृतीपर लेख प्रसिद्ध करावेत. तसेच या विषयांवर सातत्याने बातम्याही प्रसिद्ध कराव्यात. सामाजिक संघटनांच्या उपक्रमांनाही प्रसिद्धी द्यावी.

**भूषण जोशी**/पुणे

### स्थानिक बातम्यांना प्राधान्य हवे

जिल्हा व तालुका स्तरावरील बातम्यांना अधिक जागा द्यावी. ग्रामीण भागातील विषयांना सातत्याने प्रसिद्धी द्यावी. स्थानिक समस्या, विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केल्यास प्रशासन अधिक जबाबदार राहील. त्यातून आणखी वाचक जोडले जातील.

**रोशन निंबाळकर**/पुणे

●● ●●

### महिला विषयांवरील लेख

महिलांच्या आरोग्य, स्वावलंबन आणि सुरक्षिततेसंबंधी लेख अधिक प्रमाणात प्रकाशित व्हावेत. महिलांसाठी विशेष पान करता आले तर उत्तम होईल. ग्रामीण महिलांच्या यशोगाथा प्रसिद्ध केल्यास समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण होईल. त्यातून महिला सबलीकरण करता येईल.

**महेश थोरात**/पुणे

### शाळांमध्ये स्वच्छतागृह नसणे ही सरकारची नामुष्की

राज्यातल्या ६ हजार ९६४ शाळांमध्ये मुलींसाठी आणि दहा हजार १८९ शाळांमध्ये मुलांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याची कबुली शालेय शिक्षण मंत्र्यांनी विधानसभेत दिली. महाराष्ट्रातील शाळांमध्ये स्वच्छतागृह असणे हे फार महत्त्वाचे आहे आणि याकडे लक्ष देणे हे शिक्षण मंत्र्यांचे पहिले कर्तव्य आहे. शिक्षणमंत्र्यांनी खरोखर ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या ताबडतोब कराव्यात. शाळेतील मुलांसाठी प्रसाधनगृहे ही फारच आवश्यक असल्याने त्यांनी स्वतः वर्षभरात ही प्रसाधनगृहे बांधून पूर्ण करावीत. शिक्षणमंत्र्यांनी या गोष्टी प्रथम कराव्यात कारण आजची मुलं उद्या देशाची आधारस्तंभ आहेत. ▮

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### लघुशंका करत असताना विचारणा केल्याने मारहाण

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

लघुशंका करत असताना विचारणा केली असता दगडाने एका व्यक्तीच्या डोक्यात व चेहऱ्यावर मारून जखमी तिघांनी मिळून जखमी केले. शिवीगाळ करून तू तुझे पार्किंग कसे चालवितो ते बघतो अशी धमकी दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत हकीकत अशी की, दि. ६ मार्च रोजी शुभम धोत्रे, अनिल विटकर, नागेश मंठाळकर, रा. रविवार पेठ सोलापूर यांनी मार्केट यार्ड जवळ सम्राट हॉटेल बाजूला स्वस्तिक पार्किंग येथे लघुशंका करत असताना त्यांना विचारणा केली असता त्यांनी दगडाने सचिन शिवाजी लकडे वय रा. ५५ / १ शिमला नगर, विजापूर रोड सोलापूर यांच्या डोक्यात व चेहऱ्यावर मारून जखमी केले. शिवीगाळ करून तू तुझे पार्किंग कसे चालवितो ते बघतो अशी धमकी दिली. या प्रकरणी तिघां विरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाडीकर करीत आहेत.

### मार्केट यार्ड येथून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

मार्केट यार्ड सोलापूर येथे पार्क केलेली एचएफ डीलक्स मोटार सायकल क्रमांक एमएच १३ इइ ६३१७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दि. ४ मार्च रोजी अरबाज मैनुद्दीन बागवान रा. ६०, चांदलक्ष्मी नगर, शेळगी यांची लाल रंगाची एचएफ डीलक्स ५० हजार रुपयांची मोटार सायकल क्रमांक एमएच १३ इइ ६३१७ ही हाजीसाब हॉटेल मार्केट यार्ड सोलापूर येथे पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबतचा गुन्हा जेलरोड पोलीस ठाण्यात दि. ७ मार्च रोजी दाखल झाला आहे.

### रस्ता ओलांडताना चारचाकीने दिली धडक

**सोलापूर, दि.९ मार्च-**

काळजापूर मारुतीचे दर्शन घेऊन रस्ता ओलांडताना दि. १७ फेब्रुवारी रोजी विजयकुमार विश्वनाथ इंगळे वय ४७ रा. युनायटेड पार्क चौक, सोलापूर व त्यांची मोठी मुलगी, लहान मुलगी यांना किरण सुरज लोंढे रा. आदित्य नगर, विजापूर रोड याने त्यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एम एच १३ इ एक्स २२८१ हे चारचाकी वाहन भरदा वेगाने, निष्काळजीपणाने व हायगायीने चालवून विजयकुमार इंगळे यांच्या मुलीस धडक देऊन जखमी केले. याबाबत सदर बाझार पोलीस ठाण्यात दि. ८ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास जमादार करत आहेत.

### अज्ञात कारणावरून हॉकी स्टिकने मारहाण

**सोलापूर, दि.९ मार्च-**

मित्रासोबत गप्पा गप्पा मारत असताना दि. ७ मार्च रोजी अनुज अमर क्षीरसागर (वय १९, रा. घर नंबर १५५ मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर) यांना गौरव सोनवणे, कुणाल सोनवणे, गणेश इंगळे, कुणाल कांबळे (सर्व रा. बुधवार पेठ, सोलापूर) यांनी त्यांच्याकडील दुचाकीवर डबल सीट बसून बुधवार पेठ येथे येऊन अनुज क्षीरसागर याला अज्ञात कारणावरून शिवीगाळ केली. आरोपी गौरव याने लाकडी हॉकी स्टिकने फिर्यादीच्या डोक्यात मारले व अनुज यांना खाली रोडवर पाडून चौघांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात चौघां विरोधात ८ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास भद्रशेट्टी करत आहे.

# २४ तासात गुन्हा उघडकीस; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ९ मार्च -**



चोवीस तासाच्या आत चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन ८ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात जेलरोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश प्राप्त झाले आहे.

जेलरोड पोलीस ठाणे शहर येथे दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मार्केट यार्ड येथुन एक रिक्षा अंदाजे २ लाख ५० हजार रुपये किंमतीची चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच ०५ मार्च २०२६ रोजी सुधाकर व्यकटेश सिंघम यांचे राहते घरातुन एकुण २९ ग्रॅम सोन्याचे चैन किंमत ४ लाख ५० हजार चोरीचा गुन्हा दाखल झाला.

गोपनीय माहतीनुसार चोरीच्या गुन्हयातील रिक्षा विक्रीकरता अक्कलकोट रोड स्मशानभुमीजवळ येणार आहे. त्याठिकाणी गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि संदीप पाटील व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी सापळा लावला रोहित रविंद्र जाधव (वय ३२, वर्षे, रा. शाहीर वस्ती भवानी पेठ) यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याचा मित्र विकास सुरेश जाधव (वय ३२, रा. निराळे वस्ती) याच्यासोबत मिळुन चोरी केली असल्याची कबुली दिली. सदर आरोपीकडुन एकुण ३ लाख ५० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन त्याचेकडुन २ रिक्षा जप्त केल्या. तसेच एक इसम हा चोरीच्या गुन्हयातील सोने विक्रीकरता चिप्पा मार्केट, अशोक चौक येथे येणार असल्याची मिळाल्यावरुन याठिकाणी गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि संदीप पाटील व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी सापळा लावला अनिल लक्ष्मण मंजुळकर (वय २२, रा. अशोक चौक, न्यु पाच्छा पेठ) यास ताब्यात घेवुन तपास केला असता चोरी केली असल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ४ लाख ५० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

ही कामगिरी एम. राजकुमार पोलीस आयुक्त, पोलीस उपआयुक्त परिमंडळ विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१ प्रताप पोमण यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत, पोलीस निरीक्षक गुन्हे भाऊराव बिराजदार, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, सफौ शरिफ शेख, गजानन कणगिरी, एम.डी. नदाफ, पोलीस हवालदार वसंत माने, धनाजी बाबर, अब्दुल वहाब शेख, अयाज बागलकोटे, पोलीस नाईक भारत गायकवाड, पोकॉ इकरार जमादार, उमेश सावंत, कल्लप्पा देकाणे, संतोष वायदंडे, विठठल जाधव, अर्जुन गायकवाड यांनी केली आहे.

# महिलेला दिली दुचाकीस्वाराने धडक

**सोलापूर, दि. ९ मार्च-**




दुचाकी वरून महिला जात असताना बजाज पल्सरील एकाने भरधाव वेगाने दुचाकी चालवून धडक दिल्याने महिलेच्या डाव्या पायास मार लागल्याने गंभीर दुखापत झाली. हाड फॅक्चर करून व त्याचे सोबत असलेल्या इसमास गंभीर दुखापतीस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. २० फेब्रुवारी रोजी ज्योती राजेश शहा रा. २, आशीर्वाद अपार्टमेंट, १४०, रेल्वे लाईन सोलापूर यांची एक्सेस दुचाकी क्रमांक एम एच १३ डीजे ३९१३ यावरून जात असताना सात रस्ता येथे रोड क्रॉस करताना मोसिन मेहबूबसाब अत्तरगा रा. झोपडपट्टी नंबर २ सोलापूर याने बजाज पल्सर मोटरसायकल क्रमांक एम एच १३ डी एल ९४६० ही भरधाव वेगाने चालवून ज्योती यांच्या दुचाकीस धडक दिल्याने त्यात त्यांच्या डाव्या पायास, नडगीस गंभीर दुखापत व डाव्या हाताच्या कोपऱ्याचे हाड, ओटीपोटाच्या खालचे हाड फॅक्चर करून व त्याचे सोबत असलेल्या इसमास गंभीर दुखापतीस कारणीभूत ठरल्या प्रकरणी सदर बाझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मनोहर करीत आहेत.

### नामफलकाचे अनावरण

**सांगोला, दि. ९ मार्च-**

सांगोला शहरातील जुन्या मेडशिंगी रोडवर असलेल्या समर्थ नगरच्या नामफलकाचे अनावरण नगराध्यक्ष आनंद माने यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी प्रभाग क्र.३ च्या नगरसेविका गोदाबाई बनसोडे, नगरसेवक अरुण पाटील, विलास पाटील, प्रा.राजेंद्र ठोंबरे, संजय खिस्ते, सुभाष दिघे, हरिबा घोडके, देवदत्त केदार, योगेश कुलकर्णी, दत्तात्रय घाडगे, मनोहर राऊत तसेच परिसरातील इतर नागरिक उपस्थित होते. या फलकामुळे परिसरातील रहिवाशांची आणि बाहेरून येणाऱ्या नागरिकांची ओळख पटवण्याची सोय झाली असून, समर्थ नगरला आता स्वतंत्र ओळख प्राप्त झाली आहे.


## अुत्तम सेवा — मंगळवार दि. १० मार्च २०२६ — नोकरीच्या शोधात

उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, AIIMS** | | | |
| १ | नर्सिंग ऑफिसर (२२५१ पदे) | B.Sc (नर्सिंग) किंवा GNM व २ वर्षे अनुभव आवश्यक | ३० पर्यंत | १६/०३/२६ |
| २) | **IDBI बँक** | | | |
| १ | ज्यु. असि. मॅनेजर (११०० पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण | २५ पर्यंत | १९/०३/२६ |
| ३) | **भारत संचार निगम लि.,** | | | |
| १ | सिनियर एक्झि. ट्रेनी (९५ पदे) | B.E. (इलेक्ट्रॉ. टेली/इलेक्ट्रॉ/कॉम्प्यु/आय.टी./इले/इन्स्ट्र ६०% गुणांसह उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | ३१/०३/२६ |
| ४) | **वेस्टर्न रेल्वे, RRC (ॲप्रेंटिस करण्याकरिता** | | | |
| १ | ॲप्रेंटिस (५३४९ पदे) | दहावी व ITI उत्तीर्ण असावे | २४ पर्यंत | २३/०३/२६ |


**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ५) | **छत्रपती संभाजीनगर महानगपालिका** | | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (३२ पदे) | पदवी (सिव्हील) उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | १८/०३/२६ |
| २ | अग्निशामक (१०० पदे) | दहावी व अग्निशामक कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३ | स्थापत्य अभि. निरीक्षक (२४ पदे) | डिप्लोमा (सिव्हील) किंवा संबंधित स्थापत्य अभियांत्रिकी कोर्स असावा | ३८ पर्यंत | |
| ४ | स्वच्छता निरीक्षक (१२ पदे) | पदवी व संबंधित डिप्लोमा उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ५ | रोखपाल (१२ पदे) | B.Com व इंगजी-मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ६) | **केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC** | | | |
| १ | संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२६- (३४९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २५ पर्यंत | १२/०३/२६ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. — www.uttamseva.org

### रमणनगर येथून दुचाकी गेली चोरीला

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. ८ मार्च-**

रमणनगर येथून एम.एच.१३ बी.एफ.०००२ या क्रमांकाची होंडा सीडी डिलक्स ही दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. दि. ४ मार्च रोजी सुरज नागनाथसिंग मरोड, रा. १५७, ब्रह्मदेव नगर, होळकर यांची दुचाकी रमणनगर येथे पार्क केली असता अज्ञात चोरट्याने ती चोरुन नेली. याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात दि. ७ मार्च रोजी फिर्याद दाखल करण्यात आली.




### शांतीनगर येथून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि.९ मार्च-**

शांतीनगर येथे दुचाकी पार्क केली असता चोरट्याने ती चोरुन नेली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दि. ५ मार्च रोजी आफताब सिद्दिकी शेख ( रा.गोदुताई वसाहत, कुंभारी, दक्षिण सोलापूर) यांनी एम.एच.१३ इ.डी.४४१३ या क्रमांकाची दुचाकी शांतीनगर येथे पार्क करुन ठेवली असता चोरट्याने ती चोरुन नेली. याबाबत दि.७ मार्च रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलानी दिलेल्या माहिति व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व. सु. हद्दीतील पेठ शास्त्री नगर - अ झोपडपट्टी, सोलापूर या नावांने ओळखले जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. १०२८ यांसी मनपा मिळकत क्रमांक १०११८०३२२९ ही झोपडी मिळकत घरजागा आमचे अशिल श्रीमती शारदाबाई रामदास पोतू यांचे मयत पती कै. रामदास लछमय्या पोतू यांचे नावांवर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागात कर आकारणीस नोंद आहे. सदर ठिकाणी त्यांचे नांवे दोन खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधून वरत्ती पन्हाळी पत्रे वासे घातलेले आहेत.

सदरच्या खोल्या आमचे अशिलांचे पती कै. रामदास लछमय्या पोतू यांचे नावावर असून सदरहू खोल्या आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीत आहेत. आमचे अशिलाचे पती कै. रामदास लछमय्या पोतू यांचे दि. २०/०८/२०१५ रोजी त्यांचा मृत्यु झालेला आहे त्यांचे मृत्युपश्चात आमचे अशिल हे त्यांचे धर्मपत्नी व कुटुंबकर्ती या नात्याने कायदेशीर वारस आहेत.

तरी सदरहू वर नमूद झोपडी घरजागेवर आमचे अशिलाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी व कर संकलन विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख : ०९/०३/२०२६

सही/-
**ॲड. एस.एम. ढेकणे**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



**जाहीर प्रसिध्दीकरण** — दिवाणी किरकोळ अर्ज नं. ६/२०२६

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**कस्तुराबाई अमसिध्द कांबळे - अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात मयत आमसिध्द काशप्पा कांबळे यांचे पश्चात कायदेशीर वारसदार या नात्याने मयत आमसिध्द काशप्पा कांबळे यांच्या नावे मु.पो. चिंचोळी नजीक, तालुका अक्कलकोट, जिल्हा सोलापूर मयत आमसिध्द काशप्पा कांबळे बी.एम.टी.सी. महामंडळ येथे कंडक्टर/वाहक म्हणून कार्यरत होते व तसेच आमसिध्द काशप्पा कांबळे यांनी दि.३०/०७/२०२३ रोजी मयत झालेले असून, यातील अर्जदार यांच्या पश्चात अर्जदार यांनीच कायदेशीर वारसदार आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केली आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक ०७/०४/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक ०७/०३/२०२६

(कोर्टाचा शिक्का)
सही/-
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील कसबे सोलापूर (रामवाडी) येथील जुना सर्व्हे नं.४०९/१ब यांसी नविन सर्व्हे नं. ४२३/१/ब, ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं.४२३/१/३ यांसी टि.पी. स्कीम नं. ४, फायनल प्लॉट नं. २२५ याचे एकूण क्षेत्र ०० हे. ८० आर या जमीनीवर मंजूर ले-आऊट प्रमाणे प्लॉटस् पाडलेले असून सदर प्लॉट जागा ही राजेंद्र नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील बिनशेती प्लॉट नं.२२ यांसी एकूण क्षेत्र ११२.४७ चौ.मी. अथवा १.१२.४७ आर.चौ. मी. इतके आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - ९ मीटर रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. २१, पश्चिमेस - सर्व्हे नं. ४२३/५, उत्तरेस प्लॉट नं.२३. येणेप्रमाणे चतुःसिमेतील असलेली बिनशेती खुली प्लॉटजागा व त्यातील असणारे वहिवाटीचे हक्क व इतर सर्व कायदेशीर अधिकार व यातील तदंगभुत वस्तुसह. सदर मिळकती ही त्रिशा विशाल जाधव यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलासोबत व्यवहार करुन इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाचीही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दावा, लीज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबध, वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद मिळकतीबाबत आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचेही कसलेही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली तारीख ०९/०३/२०२६.

सही/-
**ॲड. रविकांत रंगनाथ पाटील**
**बी.ए., एलएल.बी.**
**पत्ता. गाळा नं.४, बेसकर कॉम्प्लेक्स, बी.एम.सी. बँकेच्या खाली, जिल्हा न्यायालयाजवळ, सोलापूर**
**मो.नं. ९७६७७३०१०१ / ७३८७३८४१०१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



**जाहीर प्रसिध्दीकरण** — दिवाणी किरकोळ अर्ज नं. १८/२०२६

**बार्शी येथील मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**सिध्दी जितेंद्र गांधी,**
वय १५, धंदा - शिक्षण,
रा. तेलगिरणी चौक, बार्शीचे
अ.पा.क. आई चैताली जितेंद्र गांधी,
वय - ४८, धंदा - घरकाम,
रा. तेलगिरणी चौक, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र सरकार तर्फे - सा.वाला**
**मा. जिल्हाधिकारी साहेब, सोलापूर**

ज्या अर्थी, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील जागा सि.स.नं. १५५१/अ/क/ १ ते ३२/ २ याचे क्षेत्रफळ २२८-०० चौ.मी. यांत बांधकाम याची मोजमापे पूर्व बाजू मी. १२-२०, दक्षिण बाजू मी. १५-५०, पश्चिम बाजू मी. १४-५० व उत्तर बाजू मी. १८-१० आहे. याचे वागणूक व पाणी पूर्व बाजूचे मुख्य रस्त्यास जाते व आहे. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - ६-०० मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. १, पश्चिमेस - नगरपालिका पाण्याची टाकी व सि.स.नं. १५५१/८ व उत्तरेस - प्लॉट नं. ३ येणेप्रमाणे जागा आतील सर्व तदंगभूत वस्तूसह सदर मिळकतीत यातील अज्ञान अर्जदारांचा अविभक्त १/२ हक्क हिस्सा व अज्ञान अर्जदाराचे अ.पा.क. करणार आई हिचा अविभक्त १/२ हक्क हिस्सा आहे. सदर मिळकतीतील अज्ञान अर्जदाराचे १/२ निम्म्या हिश्यांची व तिचे आईची १/२ निम्मे हिश्याची मिळकत अशी पूर्ण मिळकत सुरज सुनिल गांधी यांना र.रु. १७,२५,०००/- (रु. सतरा लाख पंचवीस हजार) यास विक्री करणेचा ठराव करुन यातील अज्ञान अर्जदाराचे अ.पा.क. चैताली जितेंद्र गांधी हिने स्वतःसाठी व अज्ञान अर्जदाराचे तर्फे अ.पा.क. म्हणून अर्ज क. १ मधील पूर्ण जागेचे खरेदीखत देण्याचे ठरवून दि. २५/२/२०२६ रोजी सूरज सुनिल गांधी यांचे नांवे इसार पावतीचा दस्त लिहून नोटरी करुन दिला आहे. व इसारापोटी त्यांचेकडून अज्ञान अर्जदाराचे हिश्याची १/२ निम्मे हिश्याची र.रु. १,००,०००/- (एक लाख रु.) व अ.पा.क. करणार आई चैताली हिचे १/२ निम्म्या हिश्याची र.रु. १,००,०००/- (एक लाख रु.) अशी एकूण र.रु. २,००,०००/- (दोन लाख रु.) चैताली जितेंद्र गांधी हिने स्विकारली आहे. व रक्कमेचा उपयोग अज्ञान करणार हिने अज्ञानाचे ॲडमिशन फी, ट्यूशन फी, कपडालत्ता व इतर शैक्षणिक गरजा व घरगुती अडचणी भागविणेसाठी केला आहे व बाकी खरेदी रकमेपैकी राहिलेली अज्ञानाचे हिश्यांची र.रु. ७,६२,५००/- (सात लाख बासष्ट हजार पाचशे रु.) व पालन करणर आईचे हिश्याची र.रु. ७.६२,५००/- (सात लाख बासष्ट हजार पाचशे रु.) अशी एकूण र.रु. १५,२५,०००/- (रु. पंधरा लाख पंचेवीस हजार) घेऊन त्यांचा उपयोग अज्ञान अर्जदारांचे पुढील उच्च शिक्षणासाठी व घरगुती अडचणी, कपडालत्ता, औषधपाणी यासाठी अज्ञानाचे पुढील भवितव्यासाठी पालन करणार आई चैताली करणार आहे. अज्ञान अर्जदार सिध्दी ही अत्यंत हुशार असून तिची पुढे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे व तिचे शैक्षणिक भवितव्य उज्वल होण्यासाठी रक्कमेची अत्यंत गरज असल्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे मिळकत विक्री करणे जरुरीचे झाले आहे. व त्यासाठी मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

त्याअर्थी, वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदार यांचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता.१३/०४/२०२६ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण दिले. ता. ०२/०३/२०२६

(कोर्टाचा शिक्का)
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**



## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, सोलापूर

**द्वारा योगीनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

**ताबा नोटीस - नमूना 'Z' नोटीस**

**म.स.सं. नियम १९६० मधील नियम १०७ (११) ड-१**

**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा (Symbolic) घेतल्याबाबतची नोटीस**

मी खाली सही करणार वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, सोलापूर द्वारा योगीनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.. सोलापूर ज्याअर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६० कलम १०७ व महाराष्ट्र सहकारी सस्था आधीनियम १९८१ चे नियम १०७ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. उपनिबंधक सहकारी सस्था सोलापुर शहर, सोलापुर याच्या कडून प्राप्त झालेला कलम १०१ च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार / जामीनदारास नियमानुसार मागणी त जप्त नोटीस पाठवून त्याच्या राहत्या घरी जाऊन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यानंतर त्याच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा १०७ (१०) नुसार जप्ती आदेश दिलेला आहे संस्थेकडे गहाणखत / जप्त असणारी / जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम १०७ चे (नियम ११ ड १) नुसार नमुना झेड नोटीस देऊन सदरील मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकाना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते कि, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी, विक्री, गहाण-दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नये या उपर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो योगीनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर याचे खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीररीत्या अधीन रहावे लागेल याची नोंद घ्यावी त्याची खालील नमूद स्थावर मालमत्ता तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | थकबाकीदाराचे / जाबदाराचे नाव व गाव | वसुली दाखला क्र. व दिनांक | स्थावर मालमत्तेचे वर्णन | गट / भूमापन क्र. व उपविभाग | येणेबाकी रु. २८/०२/२०२६ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. हरीष भानुदास राऊत यांचे जाबदार नं. २ श्री. सिद्राम बापूराव मंठाळकर यांचे हिस्सा पुरते | १०१/३६२/२०१६ | मौजे - दहिटणे, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | १२/९/अ/२ | ७,६३,४०७/- |
| २ | श्री. पार्वती विरेश याळगी यांचे जाबदार नं. ३ गणेश प्रभुलिंग याळगी यांचे हिस्सा पुरते | १०१/५४२/२०२५ | मौजे - कुंभारी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | ६५३/१/क/१ | २,०९,७७४/- |
| ३ | श्री. मलीक कसीमसाब नदाफ यांचे हिस्सा पुरते | १०१/२२०/२०१४ | मौजे - दहिटणे ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | ६/१/अ/१ | १,७०,३०९/- |

ही उद्घोषणा प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत आपली थकबाकी, त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम संस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घेऊन तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र घ्यावे अन्यथा कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही केली जाईल. म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा / कब्जा प्रत्यक्ष घेण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी साहेब तथा मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे रितसर प्रकरण दाखल करून व पुढील योग्ताय ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ताबा / कब्जा घेतल्याची नमुना झेड नोटीस प्रसिध्द केली.

हि नोटीस दिली दिनांक : ०९/०३/२०२६.

(शिक्का)
**स्वाक्षरीत/-**
**एन.ए. एकबोटे**
**वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा - योगीनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महत्त्वाचे

### अमित मिश्राविरोधात पत्नी न्यायालयात

**कानपूर :** भारतीय क्रिकेटपटू अमित मिश्रा याच्या पत्नीने कानपूर न्यायालयात याचिका दाखल केली आहे. अमित मिश्रा हुंड्यासाठी मला मारहाण करीत होता व मानसिक छळ करीत होता. अनेकदा मला उपाशी राहण्यास भाग पाडले जात होते, असा आरोप पत्नी गरिमा तिवारीने केला आहे. आजारी असतानाही अमित मिश्रा यांनी त्यांच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. इतकेच नाही तर ते त्यांच्या मॉडेलिंगमधून मिळणारी कमाईही हिसकावून घेत होते. सततच्या छळाला कंटाळून त्यांनी एकदा आत्महत्येचा प्रयत्नही केला होता. अमित मिश्रा अनेक मुलींच्या संपर्कात असतात. त्यांच्यासमोरच ते इतर मुलींशी फोनवर बोलत आणि चॅट करत असत. अनेक मुलींना विवाहाचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक शोषणही केले आहे. यापूर्वी त्यांनी पोटगी, तडजोडीच्या नावाखाली १ कोटी रुपयांचा खटला दाखल केला होता. आता पोलिस ठाण्यात सुनावणी न झाल्याने त्यांनी न्यायालयामार्फत तक्रार अर्ज दाखल केला आहे.



### आयपीएलची धूमशान २८ मार्चपासून




**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीगचा १९ वा हंगाम २८ मार्चपासून सुरू होणार आहे. बीसीसीआय दोन टप्प्यात वेळापत्रक जाहीर करण्याची अपेक्षा आहे. अनेक राज्यांमधील निवडणुकांच्या तारखा आणि ठिकाणांच्या अनिश्चिततेमुळे ८४ सामन्यांच्या हंगामाची संपूर्ण घोषणा लांबणीवर पडली आहे. नवीन आयपीएल हंगाम सुरू होण्यास २० दिवसांपेक्षा कमी वेळ शिल्लक असल्याने, बीसीसीआय या आकर्षक स्पर्धेचे वेळापत्रक दोन भागात जाहीर करेल अशी अपेक्षा आहे, पहिल्या सहामाहीच्या तारखा सोमवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. संघांनी आंशिक क्षमतेने सराव आणि धावण्याच्या शिबिरांना सुरुवात केली आहे. याशिवाय काही फ्रँन्चायझींनी आपल्या बहुप्रतिक्षित जर्सीचे अनावरण केले आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि राजस्थान रॉयल्स (आरआर) यांच्या घरच्या ठिकाणांबद्दल अनिश्चितता आणि काही शहरांमध्ये निवडणुकीशी संबंधित संभाव्य संघर्षांमुळे, बीसीसीआयला घोषणा पुढे ढकलावी लागली.

### श्रीलंका क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी गॅरी कर्स्टन



**कोलंबो :** श्रीलंका क्रिकेटने सोमवारी दक्षिण आफ्रिकेचे माजी क्रिकेटपटू गॅरी कर्स्टन यांची राष्ट्रीय पुरुष संघाचे नवीन मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती जाहीर केली. ही नियुक्ती १५ एप्रिलपासून लागू होईल. दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधित्व करताना प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा आनंद घेतलेले कर्स्टन २००८ ते २०११ पर्यंत भारताच्या पुरुष राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि २०११ ते २०१३ पर्यंत दक्षिण आफ्रिका पुरुष राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होते. नवीन मुख्य प्रशिक्षकाची नियुक्ती ही श्रीलंका क्रिकेटने राष्ट्रीय उच्च कामगिरी केंद्राची रचना सुधारण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे, असे क्रिकेट श्रीलंकेने म्हटले आहे. कर्स्टनचा सर्वात अलीकडील सहभाग २०२६ मध्ये संपलेल्या आयसीसी पुरुष टी विश्वचषक स्पर्धेत सल्लागार म्हणून क्रिकेट नामिबियासोबत होता. श्रीलंका क्रिकेटमध्ये त्यांची नियुक्ती १४ एप्रिल २०२८ रोजी संपणाऱ्या दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी असेल.

### आर्यना सबालेन्काची गाठ ओसाकाशी



**इंडियन वेल्स :** येथे सुरू असलेल्या इंड़ियन वेल्स टेनिस स्पर्धेत बेलारूसची आर्यना सबालेन्काने रोमानियाच्या जॅकलिन क्रिस्टियनला सरळ सेटमध्ये ६-४, ६-१ असे हरवले, तर जपानच्या १६ व्या मानांकित नाओमी ओसाकाने कोलंबियाच्या कॅमिला ओसोरियोला तीन सेटमध्ये ६-१, ३-६, ६-१ असे हरवले. आता चौथ्या भेरीत सबालेन्काची गाठ ओसाकाशी पडणार आहे. मात्र चौथ्या क्रमांकाची खेळाडू अमेरिकेची कोको गॉफ डाव्या हाताच्या दुखापतीमुळे निवृत्त झाली. चौथ्या फेरीत फिलीपिन्सची उदयोन्मुख स्टार अलेक्झांड्रा इला ही कोको गॉफविरुद्ध ६-२, २-० अशी आघाडीवर होती, मात्र याचदरम्यान कोकोच्या डाव्या हाताला दुखापत झाली. त्यामुळे कोको सामन्यातून निवृत्त झाली

# द्रविड, लक्ष्मणला विजय समर्पित : गंभीर

◆ **अहमदाबाद, ८ मार्च**

या ऐतिहासिक टी-२० विश्वचषक विजयाचे श्रेय भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक राहुल द्रविड व माजी दिग्गज फलंदाज व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांना जाते. मी ही ट्रॉफी त्यांना समर्पित करतो, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले.

अहमदाबाद येथे नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडवर ९६ धावांच्या धमाकेदार विजय नोंदविला. भारत तीन टी-२० विश्वचषक जिंकणारा पहिला संघ बनला (२००७, २०२४, २०२६), जेतेपदाचे रक्षण करणारा पहिला संघ आणि घरच्या मैदानावर असे करणारा पहिला संघ ठरला.

द्रविड यांनी भारतीय संघाला एक मजबूत दिशा दिली व लक्ष्मण यांनी बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये उत्कृष्ट खेळाडूंची फळी तयार केली आहे. खेळाडूंनी मला प्रशिक्षक बनवले, असे ते म्हणाले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकला तेव्हा द्रविड मुख्य प्रशिक्षक होता तर लक्ष्मणने सीओईमध्ये खेळाडूंच्या पुढच्या फळीला तयार केल्याबद्दल कौतुक केले आहे.




पत्रपरिषदेत बोलताना प्रशिक्षक गौतम गंभीर व कर्णधार सूर्यकुमार यादव

**कर्णधार सूर्यकुमारची प्रशंसा**

गंभीर यांनी भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याचीही मुक्तकंठाने प्रशंसा केली. सूर्यकुमारने माझे काम सोपे केले व त्याने संघाला एका कुटुंबाप्रमाणे सांभाळले, असे ते म्हणाले.

**संघाचा विजय हेच आमचे ध्येय राहिले : सूर्यकुमार**

मी यापूर्वी कोलकाता नाईट रायडर्समध्ये गंभीरच्या नेतृत्वाखाली खेळलो आहे. आम्हा दोघांचेही ध्येय नेहमी संघाचा विजय हेच राहिले आहे. आमच्यात कधीही वाद झाले नाहीत. आमची मैत्री निश्चित होती. ते २ पावले चालले व मी २ पावले चाललो, असे कर्णधार सूर्यकुमार यादवनेही सांगितले. भारतीय संघ आता २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटच्या सुवर्णपदकावरही लक्ष ठेवेल, असेही तो म्हणाला.

**आशेवर नाही, विश्वासावर संघ बांधला**

मी विश्वासाच्या आधारे संघ निवडले आहेत. मी कधीही आशेवर आधारित संघ निवडला नाही, असे ते म्हणाले.

संजू सॅमसनच्या झंझावाती ८९ धावा, अभिषेक शर्मा (५२) व ईशान किशनच्या (५४) धडाकेबाज अर्धशतकांच्या जोरावर भारताने न्यूझीलंडच्या गोलंदाजांना जेतेपदाच्या लढतीत धक्का दिला आणि जबरदस्त धावसंख्या उभारली. गोलंदाजीत जसप्रीत बुमराह (चार षटकांत १५ धावांत ४ बळी) नेहमीप्रमाणे उत्कृष्ट होता, तर अक्षर पटेलनेही (२७ धावांत ३ बळी) छाप सोडली. भारताने न्यूझीलंडला स्वस्तात हरवले. ◀ *(वृत्तसंस्था)*

### आगरकर, जय शाह यांचे आभार

माजी सलामीवीर व विद्यमान मुख्य प्रशिक्षकांनी मुख्य राष्ट्रीय निवडकर्ता अजित आगरकर व सध्याचे आयसीसी अध्यक्ष आणि माजी बीसीसीआय सचिव जय शाह यांचेही आभार मानले.

### ते ३० लोक महत्त्वाचे

माझी जबाबदारी सोशल मीडियावरील लोकांसाठी नाही. माझी जबाबदारी चेंजिंग रूममधील त्या ३० जणांची आहे, असे गंभीर यांनी सांगितले. मी प्रशिक्षक म्हणून दोन आयसीसी ट्रॉफी जिंकल्या तरी काही फरक पडत नाही. माझ्या प्रशिक्षकपदाच्या काळात ते ३० लोक माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहेत, इतर कोणीही महत्त्वाचे नाही, असेही ते म्हणाले.

# निर्णायक खेळीने सॅमसन सर्वोत्तम : गावस्कर



◆ **नवी दिल्ली, ९ मार्च**

संजू सॅमसनसाठी आयुष्य पूर्ण झाले आहे. तो एका सामान्य खेळाडूपासून पुढे जाऊन भारताच्या ऐतिहासिक टी-२० विश्वचषक मोहिमेदरम्यान बाद फेरीत तीन निर्णायक खेळी करून स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू झाला आहे, असे गौरवोद्गार महान फलंदाज सुनील गावस्कर यांनी काढले.



सॅमसनने टी-२० विश्वचषकाच्या शेवटच्या तीन सामन्यांमध्ये तडाखेबंद खेळी केल्या, यात इंग्लंडविरुद्धचा उपांत्य सामना आणि न्यूझीलंडविरुद्धचा अंतिम सामन्यातील खेळीचा समावेश आहे.

२०२६ च्या टी विश्वचषकापूर्वी सॅमसनची न्यूझीलंडविरुद्धची मालिका वाईट होती. त्याला वगळण्यात आले, त्यानंतर टी-२० विश्वचषक सुरू झाल्यानंतर, त्याला नामिबियाविरुद्ध खेळण्याची संधी मिळाली, परंतु त्याची खेळी त्याचे स्थान टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी नव्हती.

सॅमसनने पुढे सुपर एट सामन्यात थेट झिम्बाब्वेविरुद्ध खेळला, परंतु त्याची खरी कामगिरी वेस्ट इंडीजविरुद्धच्या उपांत्यपूर्वसमान सामन्यात सुरू झाली, असे ते म्हणाले.

संजूने एक शानदार खेळी खेळली व तो पूर्ण नियंत्रणात दिसत होता. आम्हाला माहित आहे की संजू किती कुशल आहे. ९.२० च्या सरासरीने केवळ ४६ धावा काढल्या. त्याला वगळण्यात आले व यष्टिरक्षक म्हणून ईशान किशनला संधी देण्यात आली, परंतु दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गट टप्प्यातील पराभवानंतर भारत बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर पोहोचल्यानंतर संघाला पुनर्विचार करावा लागला.

झिम्बाब्वेविरुद्धच्या विजयी सामन्यात संधी मिळाल्याने, सॅमसनने १५ चेंडूत २४ धावांची धमाकेदार सुरुवात केली व भारताला ४ बाद २५६ धावसंख्येचा भक्कम पाया रचून दिला.

त्या खेळीमुळे त्याचा आत्मविश्वास वाढला व त्याने त्यानंतर ईडन गार्डन्सवर वेस्ट

### भारतीय क्रिकेट इतिहासातील सर्वोत्तम क्षण

विश्वविजेतेपदाचे रक्षण करणे हे क्रिकेटमधील सर्वात कठीण कामांपैकी एक होते. भारताचे ट्रॉफी कॅबिनेट आता खूप भरलेले आहे. आयसीसी ट्रॉफी जिंकणे सोपे नाही. द्विपक्षीय वर्चस्व वेगळे आहे. आयसीसी स्पर्धांमध्ये प्रत्येक सामन्यात सर्वोत्तम प्रदर्शन केले पाहिजे, असे माजी भारतीय कर्णधार गावस्कर म्हणाले. यासाठी कौशल्य लागते, नशीब नाही. दबाव खूप मोठा असतो आणि हे खेळाडू मैदानावर उतरताना अब्जावधी लोकांचे प्रतिनिधित्व करतात. कोणत्याही संघाने सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकलेले नाहीत. सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकणे ही एक मोठी कामगिरी आहे. भारतीय क्रिकेट इतिहासातील हा सर्वोत्तम क्षण आहे, असे ते म्हणाले.

# कर्मयोगी पॉलिटेक्निकला राज्य खो-खो स्पर्धेत उपविजेतेपद

● अॅथलेटिक्स स्पर्धेत पायल वाघमारे, सृष्टी पिसाळला दुहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मार्च-**

येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने विविध राज्य क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

इंटर इंजिनियरिंग डिप्लोमा स्टूडेंट स्पोर्ट असोसिएट यांच्या वतीने जून्नर येथे झालेल्या राज्य खो खो स्पर्धेमध्ये त्यांनी उपविजेतेपद संपादिले. तसेच सी झोन अॅथलेटिक्स स्पर्धेत पायल वाघमारे हिने ४०० मीटर व २०० मीटरमध्ये प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

अंकिता जाधव हिने ४०० मीटरमध्ये द्वितीय स्थान मिळविले. सृष्टी पिसाळ लांब उडी व तिहरी उडीमध्ये अव्वल ठरली. ऋतुजा सर्जे भालाफेक स्पर्धेमध्ये द्वितीय तर माऊली वाघमारेने १५०० मीटरमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांना क्रीडा संचालक साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. संघातील खेळाडूंचे श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ.अजित कणसे, प्राचार्य डॉ. एस.पी. पाटील, संस्थेचे रजिस्ट्रार गणेश वाळके यांनी अभिनंदन केले.







# शिवरत्नच्या महिला क्रिकेट संघास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मार्च-**

महिलांच्या राज्य क्रिकेट स्पर्धेत येथील शिवरत्न क्रिकेट अॅकॅडमीने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी स्टार ऑफ अकलूज डॉक्टर ११चा पराभव केला. तृतीय स्थान येथील राष्ट्रमाता जिजाऊ संघाने संपादिले.

विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुलात झालेल्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना स्टार ऑफ अकलूज संघाने ६ षटकांत शिवरत्न अॅकॅडमीसमोर ४५ धावांचे लक्ष ठेवले होते. शिवरत्न क्रिकेट अॅकॅडमीने हे लक्ष ५.२ षटकांत पूर्ण केले. शिवरत्नच्या वैष्णवी मिसाळने ६ गडी टिपले.

वैष्णवीने २५ धावा करीत अष्टपैलू खेळी केली. ती सामन्याची मानकरी ठरला. संघास शिवरत्न क्रिकेट अॅकॅडमीचे प्रशिक्षक मंजित नवले सर व बाळासाहेब रणवरे यांचे मार्गदर्शन लाभले.

रोटरी क्लब अकलूज यांच्या विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ही स्पर्धा आयोजित केली होती. विजयी संघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शितल देवी मोहिते पाटील व क्रीडा विभाग प्रमुख इशिता देवी धैर्यशील मोहिते पाटील यांनी अभिनंदन केले

**वैयक्तिक पारितोषिकाचे मानकरी**

फलंदाज-अर्चना गवळी, गोलंदाज-वैष्णवी मिसाळ, क्षेत्ररक्षण-आशा शेख, यष्टीरक्षक-अपर्णा एकतपुरे.

### बुमराह राष्ट्रीय संपत्ती : चावला

नवी दिल्ली : भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह मौल्यवान खेळाडू असून तो राष्ट्रीय संपत्ती आहे, असे पीयूष चावला म्हणाला. भारताला टी-२० विश्वचषक जिंकून देताना बुमराहने अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. १५ धावांत ४ बळी टिपून न्यूझीलंडचा कणा मोडला व त्यांना १९ षटकांत १५९ धावांत गुंडाळले. बुमराने १८ व्या षटकात शानदार गोलंदाजी केली.

केवळ सहा धावा दिल्या व बेथेलला स्ट्राईकपासून दूर ठेवले. बुमराह हा माणूस कोणत्याही प्रतिस्पर्धी संघाच्या सर्वोत्तम फलंदाजांचा दिवस वाईट करू शकतो. त्याने २०२६ च्या टी-२० विश्वचषकात असेच केले आहे. या स्पर्धेत त्याने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली आहे, ती उल्लेखनीय आहे. जेव्हा जेव्हा भारताला महत्त्वाच्या टप्प्यात बळींची आवश्यकता असते तेव्हा बुमराह पुढे येतो व मदत करतो.

# जागतिक आरोग्य दिन : ५ एप्रिलला माळशिरसमध्ये सायकल राईड

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ९ मार्च-**

प्रतिनिधी दरवर्षी श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या देशपातळीवरील सुमारे अडीच हजार किलोमीटर सायकल वारीचे यशस्वी आयोजन करणाऱ्या सायकल रायडर्स असोसिएशन या राष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून यंदा प्रथमच जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून ५ एप्रिल रोजी सन डे, वन डे या सुमारे ७५ किलोमीटरच्या एकदिवसीय माळशिरस तालुका सायकल राईडचे आयोजन केल्याची माहिती या असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.

भिसे म्हणाले, रविवारी सकाळी ६ वाजता अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथून मान्यवरांच्या हस्ते सायकल राईडचा शुभारंभ होईल. माळीनगर, २५/४, महाळुंग, श्रीपूर, बोरगाव, माळखांबी, बोंडले, वेळापूर, खुडूस, माळशिरस, संग्रामनगर मार्गे ही सायकल राईड सायंकाळी ४ वाजता अकलूज क्रीडा संकुल येथे पोहोचेल. येथे मान्यवरांच्या हस्ते सायकल रायडर्सना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय सायकल रायडर्स सतीश जाधव (मुंबई) यांचे सायकल काळाची गरज या विषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सायकल रायडर्सना प्रवासात चहा , नाश्ता व भोजनाची मोफत सोय करण्यात आली आहे. या एकदिवसीय सायकल राईड मध्ये १८ वर्षापुढील महिला व पुरुषांना सहभागी करुन घेतले जाणार आहे . सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सायकल रायडर्सनी २९ मार्चपूर्वी ९८२२०२३५६४ या मोबाईल क्रमांकावर आपली नाव नोंदणी करावी.

## बँक ऑफ इंडिया आंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धा

# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

बँक ऑफ इंडिया विभागीय क्रीडा समितीच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित आंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत पहिल्या फेरीत सोलापूर विभागाच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त सौरभ साहू यांच्यासह श्रीकांत गोरडे, सचिन चिंचोळे, आशिष गायकवाड व मयूर कलाल यांनी विजय मिळवत विजयी सलामी दिली.

महिला गटात राजश्री कुलकर्णी, स्मिता पाटील, पलक छाचीया, प्रतीक्षा देशमुख, स्नेहल शेषाद्री, श्रुती घोडके आणि मेरी स्टेला यांनीही आकर्षक विजय नोंदविले. या स्पर्धेत यजमान सोलापूरसह रत्नागिरी, नाशिक, पुणे, सांगली व कोल्हापूर येथील संघांनी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक चंद्रशेखर वि. मंत्री आणि बँक ऑफ इंडिया अधिकारी संघटनेचे सरचिटणीस प्रमोद शिंदे यांच्यातील मैत्रीपूर्ण बुद्धिबळ लढतीने झाले. यावेळी पुणे युनिटचे अध्यक्ष अमोल सांगळे, बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघटनेचे जनरल सेक्रेटरी ऑब्री अल्मेडा, विभागीय क्रीडा समितीचे सचिव सचिन संकद, स्वयंरोजगार ग्रामीण प्रशिक्षण संस्था सोलापूरचे संचालक दिपक वडेवाले, सांगलीचे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विश्वास वेताळ, आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, राष्ट्रीय वरिष्ठ पंच उदय वगरे, विजय पंगुडवाले आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन संकद यांनी केले. प्रमोद शिंदे यांनी बुद्धिबळ खेळाविषयी सविस्तर माहिती देत खेळाडूंना मार्गदर्शन केले.

**तिसऱ्या फेरी अखेरचे महत्त्वाचे निकाल:**

**पुरुष :** सौरव साहू विजयी विरुद्ध शुभम कांबळे, आशिष गायकवाड वि.वि. अक्षय नवले, मयूर कलाल वि.वि. पियुष मिश्रा. **महिला :** टी मेरी स्टेला वि.वि. पलक छाचीया, मयुरी तावडे विजयी विरुद्ध स्मिता पाटील, रेश्मा गोंडे बरोबरी विरुद्ध प्रीती चव्हाण

# श्रध्दा गुंटुकचा २७५ कि.मी. सायकलिंगचा नवा विक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च -**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित वूमन्स डे २०२६ सायकलिंग स्पर्धेचे औचित्य साधून येथील राष्ट्रीय धावपटू श्रद्धा हिने २७५ कि.मी अंतर सायकलिंग करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

श्रद्धाने हे अंतर ११ तास २२ मिनिटे ३ सेकंदात पूर्ण केले आहे. ही स्पर्धा सकाळी ९ वाजून ३० मिनिटाला सुरूवात करण्यात आले. ही स्पर्धा जुळे सोलापूर भंडारी ग्राउंड ते विजयपूर ११६ किमी व पुन्हा विजयपुर ते तामलवाडी १३६ किमी व पुन्हा यू टर्न घेऊन ताम लवाडी ते एस आर पी एफ कॅम्प सोरेगाव २३ किमी असे एकूण २७५ किमी अंतर यशस्वीपणे पार पाडले आहे. यापूर्वीही श्रद्धाच्या नावे वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये जागतिक विक्रम केल्याच्या नोंदी



आहेत. येणाऱ्या काळात भारताचे प्रतिनिधित्व करून देशासाठी पदक मिळविण्याचा ध्यास व साधना त्यांनी घेतला आहे. श्रध्दाला सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह तसेच स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्रा. चिदानंद माळी व क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विठ्ठल-रुक्मिणीची चंदनउटी पूजा गुढीपाडव्याला होणार सुरु

## विठुरायाच्या उटीपूजेसाठी २१ हजार तर रुक्मिणीमातेच्या पूजेसाठी ९ हजार रुपये देणगी शुल्क

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मार्च-**

उन्हाळ्यामध्ये उन्हापासून त्रास होवू नये यासाठी प्रत्येक वर्षी मंदिर समितीकडून येथील विठ्ठल रुक्मिणीमातेस चंदनउटी पूजा केली जाते. यंदाच्या वर्षी गुढीपाडवा ते मृगनक्षत्रा पर्यंत चंदनउटी पूजा करण्यात येणार आहे. विठुरायाच्या चंदनउटी पूजेसाठी २१ हजार तर रुक्मिणीमातेच्या चंदनउटी पूजेसाठी ९ हजार रुपये देणगी शुल्क आकारण्यात येणार आहे. मंदिर समितीकडून लवकरच चंदनउटी पूजेसाठी नोंदणी करण्यास सुरुवात होणार असल्याची माहिती मंदिर समितीच्या सदस्यांकडून देण्यात आली.

उन्हाळ्यामध्ये सुर्यनारायण रौद्ररुप धारण करीत असल्यामुळे येथील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाते. यामुळे उकाड्यापासून विठ्ठल रुक्मिणीस त्रास होवू नये यासाठी गेल्या अनेक वर्षापासून विठ्ठल रुक्मिणीस चंदन उटी पूजा करण्याची परंपरा आहे. विठ्ठल रुक्मिणीमातेच्या चंदनउटी पूजेसाठी लागणारे चंदन दरवर्षी मंदिर समिती कर्नाटकातून खरेदी करीत असते. दरवर्षी गुढीपाडवा ते मृगनक्षत्र निघे (अर्थात ७ जून ) पर्यंत दररोज दुपारी चार वाजता विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्तीस चंदनउटी केली जाते. त्यानंतर विठ्ठल रुक्मिणीमातेस शिरा,पोहे, सुकामेवा, कैरीचे पन्हे, लिंबू सरबत यांचा नैवेद्य देखील दाखविण्यात येत असतो. दरम्यान विठ्ठलाच्या चंदनउटी पूजेसाठी यावर्षी २१ हजार रुपये तर रुक्मिणीमातेच्या चंदन उटी पूजेसाठी ९ हजार रुपये इतके देणगी शुल्क मंदिर समितीकडून आकारण्यात आलेले आहे. सध्या मंदिर समितीकडून चंदनउटी पूजेची तयारी सुरु करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी दिली आहे. चंदनउटी पूजा करण्यासाठी भाविकांकडून अर्ज मागविले जातात. यावर्षी गुढी पाडवा १९ एप्रिलला आहे. त्यामुळे गुढी पाडव्या पासून चंदनउटी पूजेस सुरुवात करण्यात येणार आहे.





## महत्वाचे...

### शरणबसवेश्वर यात्रा उत्साहात

**अक्कलकोट, दि. ९ मार्च-**



कलबुर्गीचे (राज्य कर्नाटका) ग्रामदैवत शरण बसवेश्वर महाराज यांची यात्रा महोत्सव मोठया उत्साहात लाखो भाविकाच्या उपस्थिती मध्ये रथोत्सवाने सांगता झाली. कलबुर्गी जिल्हयासह बिदर विजयपुर जिल्हयासह महाराष्ट्रातील लातुर सोलापुर उस्मानाबाद जिल्ह्यातील लाखो भाविक शरण बसवेश्वर यात्रेकरिता रंगपंचमी दिवशी रथोत्सवाकरिता एकत्र आली होती पहाटे पासून दर्शनाकरिता भाविकांनी गर्दी केली होती कलबुर्गी शहरात पहाटेपासुन घरोघरी सडासांमर्जन रांगोळी घालून भाविक दर्शनाकरिता मार्गस्थ झाले होते शरण बसवेश्वर महाराज की जय च्या घोषात हजारो भाविकांनी सुर्यास्त दरम्यान रथ ओढला. रथा वर भाविकांनी खारीक केळी पुष्प मालाची उधळण केली यात्रे दरम्यान भाविकांनी श्रीफळ वाढविले पेढे वाटले . कलबुर्गी शहरात ठिक ठिकाणी भाविका साठी महाप्रसाद भोजन थंड पाणी मठ्ठा प्रसाद आदीची सोय केली होती यात्रे दरम्यान प्रासादिक वस्तुची मोठी उलाढाल झाली. लहान मुलाकरिता झुले पाळणे खेळणी ची दुकाने थाटली होती बाल गोपाल वृद्ध युवक साऱ्यांनी शरण बसवेश्वर महाराज की जय चा घोष केल्याने सारा आसमंत दुमदुमून गेला शोभेच्या दारूच्या आताषबाजीने आसमंत दुमदुमला.



### सुयश विद्यालयात महिला जागर सप्ताह

**बार्शी, दि.९ मार्च-**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या औचित्याने सुयश विद्यालय, बार्शी येथे 'महिला जागर सप्ताह' साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. इतापे उपस्थित होत्या. तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजर मोहिनी घोलप आणि संस्थेच्या मार्गदर्शिका सौ. प्रतिभा नलवडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिका जगताप, उपमुख्याध्यापक येवले, पूर्वप्राथमिक विभागाच्या प्रिन्सिपल चंदेले, प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका देशमुख, तसेच माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका मोरे व साखरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी बालसभेचे आयोजन केले होते.



# मंगळवेढ्यात जप्त केलेल्या १७० मोटर सायकली मूळ मालकास परत

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ मार्च-**

मंगळवेढा पोलीस ठाणे अंतर्गत कोव्हीड काळात दाखल गुन्हे व बेवारस तसेच रजिस्ट्री जमा असलेल्या १७० मोटर सायकली मुळ मालकांचा शोध घेवून त्यांच्या ताब्यात देण्यात आल्या. दरम्यान अद्यापही दाखल गुन्हे व कोव्हीड कालावधीमधील मोटर सायकली कोणाच्या मालकीच्या असलतील तर आपली मुळ कागदपत्रे घेवून पोलीस प्रशासनास संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी केले आहे.

कोविड कालावधीत जिल्हा प्रशासनाने कोव्हीडची लागण नियंत्रीत करण्यासाठी रस्त्यावर फिरण्यास मनाई केली होती. या दरम्यान हा आदेश जुगारुन काही युवकांनी मोटर सायकलवरुन फिरत असताना अशा गाड्या पोलीसांनी जप्त केल्या होत्या. या गाड्या अनेकवर्षे धुळ खात मंगळवेढा पोलीस स्टेशन आवारात पडल्या होत्या.

कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सल्ल्याने डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे,पो.नि.दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी जवळपास १७० मोटर सायकली मुळ मालकांचा शोध घेवून त्यांच्या ताब्यात दिल्या. जप्त केलेल्या वाहनामुळे पोलीस स्टेशनमधील बरीचशी जागा गुंतून पडली होती. ऊन,वारा,पाऊस यामुळे सदर वाहनाचे नुकसान होवू नये याची दखल घेवून पोलीस प्रशासनाने त्या परत केल्या आहेत.

# बार्शीतील मुदत संपलेल्या ९५ ग्रामपंचायतीच्या प्रारुप प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.९ मार्च-**

तालुक्यातील मुदत संपलेल्या ९५ ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. याबाबतची प्रक्रिया सुरु असून येत्या मे मध्ये या प्रभाग रचनेवर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शिक्कामोर्तब होणार आहे.

तालुक्यातील ९५ ग्रामपंचायतींची मुदत २५ फेब्रुवारी रोजी संपली आहे. या ग्रामपंचायतींच्या नवीन प्रारुप प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

तहसील कार्यालयाकडून या प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, अशी माहिती तहसीलदार एफ. आर. शेख यांनी दिली. तालुक्यातील ९५ ग्रामपंचायतींचा २६ फेब्रुवारी २०२१ ते २५ फेब्रुवारी २०२६ असा पाच वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्याने या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांच्याकडून संयुक्तपणे स्थळपाहणी प्रक्रिया करुन प्रभाग रचना, सीमा निश्चिती करण्यात येणार आहे. यानंतर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेली समिती या प्रभागाची तपासणी करणार असून या समितीमध्ये गटविकास अधिकारी व संबंधित मंडल अधिकारी यांचा समावेश असणार आहे. या तपासणीनंतर ११ मार्च रोजी प्रभाग रचनेचा हा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे. तसेच यावरील हरकतींसाठी १३ एप्रिल ही तारीख नक्की करण्यात आली आहे. या सर्व प्रशासकीय प्रक्रियेनंतर ४ मे रोजी राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे तहसीलदार शेख यांनी सांगितले.



# युद्धामुळे बंद केळी निर्यात सुरू करण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.९ मार्च-**

युद्धजन्य परिस्थितीमुळे बंद असलेली केळी निर्यात सुरू करण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची मागणी सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना करण्यात आली आहे यासंबंधी मागणीचे निवेदन सोलापूर जिल्ह्यातील करमाळा माढा तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने कृषिमंत्र्यांना देण्यात आले आहे.

सध्या सुरू असलेल्या इराण इस्त्राईल अमेरिका युद्धाचा परिणाम केळी निर्यातीवर झाला असून सोलापूर जिल्ह्यातून होणारी केळी निर्यात पूर्णपणे बंद झाली आहे. हजारो टन केळी सध्या कोल्ड स्टोरेजमध्ये व निर्यात बंदरावर अडकून राहिलेली आहे. शेतकऱ्यांना एक एकर क्षेत्रावरील केळी उत्पादनासाठी दीड ते दोन लाख रुपये खर्च होतो सध्या निर्यात बंद असल्याने शेतकऱ्यांची केळी खरेदी करणे व्यापाऱ्यांनी बंद केले आहे त्यामुळे फार मोठे आर्थिक नुकसान शेतकऱ्यांना होत असून शासनाच्या वतीने लवकरात लवकर केळी निर्यात सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे यावेळी करमाळा तालुक्यातील कंदर येथील निर्यातदार शेतकरी किरण डोके, सोमनाथ हुलगे, किरण पाटील, अंगद पाटील, आण्णासाहेब कदम अॅड. बसळे उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### डॉ. नंदकुमार सोनकवडे



**सोलापूर, दि. ९ मार्च-**

भवानी पेठ ढोर गल्ली येथील सुप्रसिध्द समाजसेवक तथा डॉक्टर नंदकुमार रतिलाल सोनकवडे (वय ५८) यांचे सोमवार ९ मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार १० मार्च रोजी सकाळी १० वाजता. भवानी पेठ ढोर गल्ली येथील राहत्या घरापासून निघून रूपाभवानी स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी, भाऊ, बहीण असा परिवार आहे. वीरशैव कक्कय्या मध्यवर्ती जन्मोत्सव मंडळाचे ते अध्यक्ष होते.

### रामेश्वर अक्कलकोटे



**सोलापूर, दि. ९ मार्च-**

हत्तुरे नगर येथील रहिवासी व अभियंता रामेश्वर सोमनाथ अक्कलकोट (वय ४०) यांचे आजाराने सोमवार ९ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ व दोन बहिणी असा परिवार आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण विभागातील सेवानिवृत्त अधिकारी सोमनाथ अक्कलकोटे यांचे सुपुत्र व विद्युत विभागातील ज्येष्ठ कर्मचारी मल्लिकार्जुन अक्कलकोटे यांचे ते लहान बंधू होत. सिद्धेश्वर साखर कारखाना येथील लिंगायत स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शिवाजी घाडगे



**सोलापूर, दि. ९ मार्च-**

वसंत विहार येथील रहिवासी व पत्रा तालमीचे प्रमुख सल्लागार अण्णासाहेब पाटील शिक्षण संकुलाचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव घाडगे (गुरुजी) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चत पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


### शांताबाई बणजगोळे



**सोलापूर, दि. ९ मार्च-**

शांताबाई अर्जुन बणजगोळे (वय १००) यांचे ९ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली चार मुले नातवंडे असा परिवार आहे. बोरेगावचे माजी सरपंच गजानन अर्जुन बणजगोळे यांच्या त्या मातोश्री होत्या.

### शिवबसप्पा झाडबुके



**दक्षिण सोलापूर, दि. ९ मार्च-**

विंचूर येथील शिवबसप्पा निंगप्पा झाडबुके (वय ८७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या (मंगळवारी) सकाळी साडेअकरा वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. ते निवृत्त कृषी सहायक होते. डॉ. प्रकाश झाडबुके यांचे ते वडील होत.



# स्वामी समर्थ महाराज हे कलियुगातील महीपती : आयएएस अधिकारी जयस्वाल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ मार्च-**

आपल्या अपार लिलांनी द्वापारयुगात जसे महीपती भगवान श्रीकृष्णांनी आपला महीमा पृथ्वीतलावर अधोरेखीत केला तसाच महीमा वर्तमान कलियुगात श्री स्वामी समर्थांचा आहे, म्हणून ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज हे कलियुगातील महीपती असल्याचे मनोगत भारतीय प्रशासन सेवेतील सार्वजनिक बांधकाम खात्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयएएस संजीव जयस्वाल यांनी व्यक्त केले.

त्यांनी नुकतेच येथील श्री.वटवक्ष स्वामी महाराज मंदीरात श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समिताच्यावतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी श्री. जयस्वाल यांचा श्री.स्वामी समर्थाचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी अक्कलकोटचे मंडल अधिकारी जुबेर नदाफ, पुरवठा निरीक्षण अधिकारी विराज वासेकर, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ उपस्थित होते.


# तीर्थक्षेत्र पंढरपुरात मे महिन्यात सामुदायिक उपनयन संस्कार

### आयोजक हिवरेकर गुरूजींची माहिती

### नावे नोंदविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

सर्व शाखीय ब्रम्हवृंद आणि श्री याज्ञवल्य आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने तीर्थक्षेत्र पंढरपुरात सामुदायिक उपनयन (मुंज) संस्काराचे आयोजन रविवार दि. ३ मे २०२६ रो करण्यात आल्याची माहिती मुख्य आयोजक राजन हिवरेकर गुरूजींनी दिली.



हल्लीच्या काळात महागाई आणि अन्य कारणांमुळे उपनयन संस्कार करणे जिकरीचे झाले आहे. ही गोष्ट लक्षात घेत तीर्थक्षेत्र पंढरपुरातील सर्व ब्रम्हवृदांनी मिळून आणि सोबतीला श्री याज्ञवल्य आश्रमाचे सहकार्य घेत या सामुदायिक सोहळ्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्यात सनातन पद्धतीने शास्त्रोक्त, मंत्रोपचारात उपनयन संस्कार करण्यात येणार आहेत. यासाठी तज्ज्ञ ब्रम्हवृदांचे अमूल्य सहकार्य प्रत्येक बटूस आणि त्याच्या माता-पित्यास लाभणार आहे. यामुळे सोळा संस्कारातील हा महत्त्वाचा संस्कार अतिशय पवित्र, वेदमंत्रोच्चारात पार पडणार आहे. अशी नामी संधी यानिमित्ताने सर्व इच्छुकांना उपलब्ध झाली आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.कार्याच्या सुसूत्रतेसाठी, नेटकेपणासाठी, व्यवस्था करण्यास सोपे जावे यासाठी इच्छुकांनी नाव नोंदणी करावी, असेही यानिमित्ताने आवाहन करण्यात आले आहे. यासाठी आयोजक स्वतः हिवरेकर गुरूजींकडे (९४२००९३१९९) नावे नोंदविता येतील. आवश्यक ती माहिती मिळवता येईल. तसेच श्री याज्ञवल्य आश्रमाचे अध्यक्ष जयंत पुराणिक (९९२२०२२१९५), उपाध्यक्ष बाळकृष्ण धाराशिवकर (८६६८६२८९६२), याबरोबरच गणेश कुरुलकर गुरुजी (९०२८३४८०९५) यांच्याकडेही नावे नोंदविता येतील. इच्छुकांनी दि. १ मे २०२६ पर्यंत नावे नोंदवावीत, असे आवहन अध्यक्ष श्री. पुराणीक यांनी केले.



> सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा हे धर्म, समाजकार्य आहे. यासाठी समाजातील दानशूरांनी आर्थिक हातभार लावावा. अशा उपक्रमांमुळे समाजात, विश्वात सनातन धर्माची ध्वजा अधिकाधिक उंचावते.
>
> **- राजन हिवरेकर, गुरूजी**

# डॉ. आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी बोकेफोडे

**बार्शी, दि.८ मार्च**

भीमनगर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी धीरज ऊर्फ सोमनाथ बोकेफोडे यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकारी निवडीबाबत भीमनगरमध्ये झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक अशोक बोकेफोडे होते. यावेळी माजी नगरसेवक बब्रुवान अय्यर, दीपक बोकेफोडे, सूर्यकांत लोंढे, संतोष बोकेफोडे, ॲड. प्रसन्नजीत नाईकनवरे, बंटी गायकवाड, रुपेश बंगाळे, आबासाहेब बोकेफोडे उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्षपदी गोविंद शेंडगे, सचिवपदी अक्षय बोकेफोडे, खजिनदारपदी प्रफुल्ल बोकेफोडे, सहसचिवपदी सत्यपाल बोकेफोडे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



# मंद्रूपच्या ग्रामसेवकांकडून पदभार देण्यास टाळाटाळ

### 'दक्षिण'च्या बीडीओविरोधात नाराजी

### विस्तार अधिकाऱ्यांकडून चालढकल

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ९ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून बदली झालेल्या ८४ ग्रामसेवकांपैकी ८० पेक्षा अधिक ग्रामसेवकांनी पदभार दिला आहे. मात्र 'दक्षिण'मध्ये बीडीओ व विस्तार अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे मंद्रूपच्या ग्रामसेवकांकडून पदभार देण्यास टाळाटाळ होत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे बदली होऊनही ठाण मांडून बसलेल्या व प्रशासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविणाऱ्या ग्रामसेवकावर काय कारवाई होणार? याकडे लक्ष लागले आहे. बीडीओ व विस्तारअधिकारी मात्र उडवाउडवी करीत असल्यामुळे नागरीकांमध्ये संशय व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूपचे ग्रामसेवक नागेश जोडमोटे स्थानिक असून नऊ वर्षांपासून नियमबाह्य काम करीत असल्यामुळे दोन वेळा बदली करण्यात आली. मात्र प्रशासनाच्या आदेशाला झुगारणाऱ्या ग्रामसेवकाकडून बदली होऊनही आठ महिन्यापासून बिनदिक्कत काम करणाऱ्या ग्रामसेवक जोडमोटे यांच्यावर कारवाई करताना वरिष्ठ अधिकारी मागे हटत आहेत. त्यामुळे मंद्रूपकरांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. नागरीकांना विविध योजनांची माहीती न देणे, कार्यालयात सतत गैरहजर असणे व विकासकामांमध्ये राजकारण आणणे अशा अनेक तक्रारी बीडीओ कार्यालयाकडे आहेत. बीडीओ मनोज राऊत यांना पदभारासंदर्भात विचारले असता उडवाउडवीची उत्तरे देऊन विस्तार अधिकारी शंकर पाटील यांना पदभार प्रक्रीया पूर्ण करण्यास सांगतात. तीन महिन्यांपासून बीडीओ राऊत वारंवार कारणे सांगत पदभार प्रक्रीया टाळत आहेत. त्यामुळे नागरीकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. बीडीओंच्या धरसोडवृत्तीमुळे मंद्रुपच्या विकासावर परीणाम होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे राजकीय दबावाला बळी न पडता बीडीओ राऊत यांनी त्वरीत पदभार काढून घ्यावा, अन्यथा त्यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा तक्रारदारांनी दिला आहे.

### बीडीओ राजकीय दबावाला पडले बळी

करमाळा येथील माजी आमदारांबरोबर मंद्रूपच्या सत्ताधाऱ्यांचे संबंध आहेत. बीडीओही करमाळा येथील रहिवासी असल्याने माजी आमदारांकडून ग्रामसेवक पदभार विलंब लावण्यास सांगण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे बीडीओ राजकीय दबावाला बळी पडल्याचे सांगण्यात येत आहे.

### सेवानिवृत्तीमुळे विस्तार अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ

विस्तार अधिकारी शंकर पाटील हे यापूर्वी मंद्रूपमध्ये ग्रामसेवक होते. त्यामुळे त्यांचे सत्ताधाऱ्यांशी हितसंबंध आहेत. शिवाय ते ३१ मार्च रोजी निवृत्त होणार असल्याने ग्रामसेवक जोडमोटे यांच्याकडून पदभार काढून घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. दोन दिवस थांबा म्हणत तीन महिन्यांपासून जोडमोटे यांना मुदतवाढ देण्याचे काम करीत आहेत.

### ग्रामसेवकांकडून तक्रारदारांवर दबाव

ग्रामसेवक जोडमोटे मंद्रूपचा पदभार सोडण्यास तयार नाहीत. तक्रारदारांकडून प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा होत असल्याने तक्रारदाराला अमिष दाखवून दबाव टाकण्यात येत आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने अमिष दाखवून तक्रार मागे घेण्यास सांगितले जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सिईओंनी पदभार प्रक्रियेकडे लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# पाणीटंचाई : १४७ गावे, ५८९ वाड्यांवर येणार पाणी टँकर

- महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांची माहिती
- १७७ पाणीटँकरसाठी निविदा

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

गतवर्षी अतिवृष्टी झाल्याने आणि महापूर आल्याने जिल्ह्यात पाण्याचा मुबलक साठा होता. पाणीपातळीही वर आलेली होती. त्यामुळे आजतागायत पाणीटँकरची गरज कोठेही भासली नाही. आता मार्च महिना आल्याने टंचाईच्या झळा लागू लागल्याने जिल्ह्यातील १४७ गावे आणि ५८९ वाड्या-वस्त्यांसाठी १७७ पाणीटँकरची मागणी करण्यात आली आहे.

यासाठी निविदा काढण्यात आली. मागणी केलेल्या गावांना टंचाई स्थिती पाहून येत्या पंधरवड्यात पाणीटँकरची सोय करण्यात येईल, असे महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी आज दै.तरुण भारतशी बोलताना सांगितले. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी १२०४ कोटीचा पाणी टंचाई आराखडा तयार केला आणि जिल्हा प्रशासनाकडे पाठविला होता. हा टंचाई आराखडा आता जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे सादर केला आणि त्यास मंजुरीही मिळाली आहे.



जिल्हयामध्ये उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता असणारी गावे, वाडयांसाठी पाणी टंचाई निवारण कार्यक्रम अंतर्गत तालुका स्तरावर टंचाई कृती आराखडे सन २०२५-२६ तयार करुन सादर केले आहेत. सन २०२५-२६ चे टंचाई आराखडयामध्ये २४६ गावे व ५९९ वाडया/वस्त्यांचा समावेश करण्यात आलेला असून, या मध्ये ऑक्टोबर-२०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीचे त्रैमासिक आराखडे निरंक आहेत. तसेच माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ व एप्रिल २०२६ ते जून २०२६ अखेर अंदाजित खर्च रक्कम रुपये १२०४.१०/- लक्ष एकूण इतका किमतीचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा मान्यतेअंती पुढील कार्यवाहीस्तव सोबत जोडून सादर केला आहे.

यामध्ये विंधन विहिरी नव्याने घेणे, जुन्या विंधन विहिरी दुरूस्ती, डुबकी घेणे, विहिरी खोलीकरण, विहिरी अधिग्रहण करणे, टँकर/ बैलगाडीने पाणीपुरवठा करणे, स्त्रोत बळकटीकरण आदी विविध उपाययोजनांचा समावेश आहे. जिल्ह्यात एकूण ४३० उपाययोजनांची संख्या या आराखड्यामध्ये दिली आहे. तर हा आराखडा २४६ गावे व ५९९ वाडया/वस्त्यांसाठी केला आहे. यावर्षी मुबलक पाऊस झाल्याने अजूनही चोहीकडे पाणी आहे मात्र आगामी उन्हाळ्यात जिल्ह्यातील नागरिकांची गैरसोय होवू नये यासाठी हा कृती आराखडा जिल्ह्याच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने केला आहे. हा आराखडा शासन मंजूर करण्यात आला असून, लवकरच मागणी केलेल्या सर्व गावे-वस्त्यांना त्या ठिकाणच्या पाण्याची वास्तव स्थिती पाहून प्रांतांच्या मार्फत पाणीटँकरची सोय करण्यात येणार असल्याचेही उपजिल्हाधिकारी कसेकर यांनी सांगितले.

# राज्यात ७.६१ लाख टन हरभरा खरेदीला मंजुरी

## सोलापूर जिल्ह्यात 'एनसीसीएफ'कडून खरेदी प्रक्रिया



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

केंद्र सरकारच्या हमीभाव योजनेअंतर्गत हरभरा खरेदीसाठी राज्यातील सरकारी केंद्रांवर १ मार्चपासून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ही नोंदणी २९ एप्रिलपर्यंत सुरू राहणार असून या कालावधीत एकूण ६० दिवस हरभरा खरेदी केली जाणार आहे.

केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्यासाठी ७ लाख ६१ हजार २५० टन हरभरा खरेदीला मंजुरी दिली आहे. हरभरा खरेदीसाठी केंद्र सरकारने नाफेड आणि एनसीसीएफ (राष्ट्रीय सहकारी ग्राहक फेडरेशन) या दोन केंद्रीय नोडल संस्थांची नियुक्ती केली आहे. जिल्ह्यांची विभागणी करण्यात आली असून सोलापूर जिल्ह्यात खरेदीची जबाबदारी एनसीसीएफकडे देण्यात आली आहे. जिल्ह्यातील सातही हमीभाव केंद्रांवर शेतकऱ्यांची नोंदणी सुरू झाली आहे. ही नोंदणी एनसीसीएफच्या ई-सम्युक्ती पोर्टलवर केली जात आहे.

### २९ एप्रिलपर्यंत खरेदीचे आदेश

नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे माहिती मिळेल. त्यानंतरच संबंधित दिवशी हरभरा खरेदी केंद्रावर आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यासाठी खरेदीचे उद्दिष्ट निश्चित झाले असले तरी जिल्हानिहाय उद्दिष्ट अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र २९ एप्रिलपर्यंत खरेदीचे आदेश देण्यात आले असून शेतकऱ्यांनी नोंदणी करण्यास सुरुवात केली आहे.

**- मनोज वाजपेयी,**
जिल्हा पणन अधिकारी

### नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- आधार कार्ड
- पिकपेरा नोंद असलेला सातबारा उतारा
- बँक पासबुक

**बाजारभाव कमी हमीभावामुळे शेतकऱ्यांचा प्रतिसाद**

केंद्र सरकारने हरभऱ्यासाठी प्रतिक्विंटल ५,८७५ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. सध्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत स्थानिक हरभऱ्याची सुमारे ५५० क्विंटल आवक होत असून बाजारात दर किमान ४,८०० ते कमाल ५,१४० रुपये प्रति क्विंटल इतके आहेत. म्हणजेच बाजारभाव हमीभावापेक्षा सुमारे ८०० ते १,००० रुपयांनी कमी असल्याने शेतकरी सरकारी खरेदी केंद्रांकडे वळत आहेत.

# नगरसेविकांना औषधी रोपांचे वाटप

**सोलापूर** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत सोलापूर महानगरपालिकेत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या पुढाकाराने पर्यावरणपूरक इको-फ्रेंडली रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रत्येक नगरसेविकेला देशी व औषधी रोपांचे वाटप करून पर्यावरण जपण्याचा संदेश देण्यात आला.

'हरित सोलापूर' घडविण्याच्या दिशेने वाटचाल करत शहर अधिक हिरवेगार करण्याचा निर्धार यावेळी सर्व नगरसेविकांनी व्यक्त केला. याप्रसंगी भाजपाच्या शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, स्थायी समितीच्या अध्यक्षा रंजना चाकोते, नगरसेविका संगीता जाधव, अश्विनी चव्हाण, सुधा अळ्ळीमोरे, कल्पना कदम यांच्यासह इतर नगरसेविका व भाजपाच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# कृषी यांत्रिकीकरण संदर्भात महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रिया सुरु करा

- आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांची विधिमंडळात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.९ मार्च-**

राज्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रियेतील अडचणींचा मुद्दा आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्य विधिमंडळात उपस्थित केला.महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन, कृषी यांत्रिकीकरण आदी योजनांसाठी राज्यातील लाखो शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत. मात्र काही महिन्यांपासून पूर्वसंमती प्रक्रिया बंद असल्याने अनेक शेतकऱ्यांना साहित्य खरेदी व कामे सुरु करण्यात अडचणी येत असल्याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.






कृषी योजनांच्या मोका तपासणीदरम्यान जिओ-टॅगिंगसाठी प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र लॉगिन वापरावे लागत असल्यामुळे तपासणी व अनुदान वितरण प्रक्रियेत विलंब होत असल्याने सर्व कृषी योजनांचे जिओ-टॅगिंग व मोका तपासणी एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर करण्याची व्यवस्था शासनाने करावी,अशी मागणी त्यांनी केली.तसेच अनेक योजनांमध्ये लाभार्थी निवड झाल्यानंतर पूर्व संमती मिळाल्यानंतरच बिले अपलोड करण्याची अट असल्यामुळे अनेक पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावर उत्तर देताना सांगितले की, सन २०२५-२६ मध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी राज्यभरातून महाडीबीटी पोर्टलवरून ४९,६४,५८३ अर्ज निवडण्यात आले आहेत. त्यापैकी १८,०४,३१७ अर्ज प्रक्रिया टप्प्यात असून आतापर्यंत ७,७५,१३५ अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली आहे.सध्या उपलब्ध निधीनुसार पुढील पूर्वसंमती देण्यात येणार असून कोणताही अर्ज रद्द होणार नाही, निवड झालेल्या प्रत्येक शेतकऱ्यांना लाभ देण्यात येणार आहे.

# महाराजस्व अभियानांतर्गत 'उत्तर'मध्ये विविध दाखल्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी, तिऱ्हे व इतर मंडळात समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात नागरिकांना विविध दाखले, प्रमाणपत्रे व शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला. या शिबिरास आमदार विजयकुमार देशमुख, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, तहसीलदार निलेश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. नागरिकांनी सहभाग नोंदवून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



कोंडी येथे फेरफाराचे ६१ अर्ज निकाली काढण्यात आले. तर ०५ सातबारा दुरूस्ती,३१० सातबारा उतारे वाटपश, ८ अ प्रमाणपत्रे वाटप: १५, प्रमाणपत्रे वितरित: २१०, एक खिडकी सेवा अर्ज निकाली: १५, आरोग्य तपासणी: ७२ नागरिक, पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेत लाभार्थी: १८, नवीन रेशन कार्ड अर्ज: १७, युनिट वाढ/कमी अर्ज: १८, संजय गांधी योजना लाभार्थी: २०, उत्पन्न दाखले वाटप: ६०, गोपीनाथ मुंडे सानुग्रह अनुदान योजना लाभार्थी: ०१, सुरक्षित रस्ता सप्ताह पुस्तके वाटप: ६००, घरकुल पासेस वाटप: ३८ आणि बेबी केअर ५ कीट वाटप करण्यात आले. या शिबिरामुळे नागरिकांना त्यांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित दाखले, प्रमाणपत्रे व योजनांचा लाभ सहज मिळाला. प्रशासनाच्या पुढाकारामुळे नागरिकांचा वेळ व श्रम वाचले तसेच शासकीय सेवा अधिक सुलभ झाल्या. तहसील प्रशासनाने दिलेल्या या सेवांमुळे नागरिकांच्या समस्यांचे त्वरित समाधान झाले असून, उपक्रमांचे प्रमाण वाढवून अधिकाधिक नागरिकांना लाभ देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**असे राबविले अभियान**

निकाली काढलेले फेरफरांची संख्या-८७, सातबारावरील दुरुस्ती संदर्भात स्वीकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या-०८, अभियानांतर्गत देण्यात आलेल्या सातबाराची संख्या-१५४, वाटप करण्यात आलेल्या ८ अ ची संख्या-८५, वितरित करण्यात आलेल्या प्रमाणपत्राची संख्या-७४, एक खिडकी अंतर्गत निकाली काढण्यात आलेल्या अर्जाची संख्या-४, आरोग्य तपासणी केलेली नागरिकांची संख्या-८८, पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत कर्ज मंजुरीचे आदेश वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या-२०, नवीन रेशन कार्ड प्राप्त अर्ज-२८, युनिट वाढ कमी करण्यासाठी प्राप्त अर्ज-१४, संजय गांधी अर्ज वाटप केलेले लाभार्थी संख्या-१५, चौकशी करुन उत्पन्न दाखले देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या-४०.

# माझी मुलगी, माझा अभिमान या थीमवर फॅशन शो

## महिला व बालविकास विभागाच्या वतीने महिला दिनोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने महिला दिनोत्सवांतर्गत माझी मुलगी, माझा अभिमान या थीमवर फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा सामाजिक संदेश प्रभावीपणे देण्यात आला. वडील-मुलगी आणि आई-मुलगी या जोड्यांनी केलेल्या सादरीकरणाला उपस्थितांकडून भरभरुन प्रतिसाद मिळाला.



यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांची प्रमुख उपस्थिती होती. बालविकास प्रकल्प अधिकारी आस्मा आत्तार, माळशिरस प्रकल्पातील अंगणवाडी कर्मचारी यांनी सादर केलेल्या बॉलिवूड व साऊथ इंडियन मॅशअप नृत्यसादरीकरणांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

विस्तार अधिकारी ऋषिकेश जाधव यांनी संत तुकाराम महाराज यांच्या वेशभूषेत येऊन अभंगाचे प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या या सादरीकरणामुळे सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. अकलूज प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांनी 'देश रंगीला' या संकल्पनेवर आधारित विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सादरीकरण केले.

महिला व बालविकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पर्यवेक्षिका अश्विनी चटमुटगे, वरिष्ठ सहाय्यक रेणुका प्रथमशेट्टी, विस्तार अधिकारी अनंत शिंदे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी आदर्श अंगणवाडी कर्मचारी महिलांच्या कर्तृत्वाचा पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. बालविकास प्रकल्प अधिकारी किरण सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.

# खोट्या नियुक्तीपत्रावरुन ३३ शिक्षकांना मान्यता?

## विभागीय आयुक्तांकडून चौकशी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

जिल्ह्यात ३३ शिक्षकांना दिलेल्या मान्यतेच्या प्रकरणात मोठा वाद निर्माण झाला. या प्रकरणाची चौकशी करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांकडे सोपवण्यात आले असून त्यांनी लवकरात लवकर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाच्या उपसचिवांनी दिले आहेत.

तक्रारदार प्रियांका परांडे यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार, तत्कालीन प्रभारी माध्यमिक शिक्षणाधिकारी स्मिता पाटील यांनी १५ जून २०१७ च्या पूर्वलक्षी प्रभावाचे कथित खोटे नियुक्तिपत्र दाखवत तब्बल सात वर्षांनंतर ३३ शिक्षकांना मान्यता दिली. अतिरिक्त शिक्षक, पदभरतीची परवानगी आणि बिंदू नामावली यांची खातरजमा न करता शासनाची दिशाभूल करून या मान्यता देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणात यापूर्वी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून समिती नेमून काही त्रुटी दूर करण्यात आल्या होत्या. या प्रकरणाला १ वर्ष ११ महिने उलटूनही दोषींवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे तक्रारदारांनी दिलेल्या सादर केलेली कागदपत्रे तपासून सविस्तर अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, विद्यमान शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना या प्रकरणाचा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र त्यांनी अद्याप कोणताही अहवाल सादर केलेला नसल्याचे समोर आले आहे.

# निकषांच्या फासात अडकल्या 'लाडक्या बहिणी'

- योजनेत मोठा फेरआढावा १९ हजार कोटींची बचत
- पडताळणीत धक्कादायक आकडे आले समोर
- एक कोटी महिला योजनेतून बाहेर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

राज्यातील महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत निकषांच्या पडताळणीनंतर मोठ्या प्रमाणात लाभार्थी कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सुरुवातीला सुमारे २ कोटी ५३ लाख महिलांना दरमहा १५०० रुपयांचा लाभ देण्यात येत होता.

मात्र, निकषांनुसार झालेल्या पडताळणीत अंदाजे एक कोटी पाच लाख महिला अपात्र ठरू शकतात, अशी माहिती समोर आली आहे.




यापार्श्वभूमीवर चालू आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात १ कोटी ४९ लाख महिलांसाठी २६ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०२४-२५ मधील ४५ हजार कोटींच्या तरतुदीच्या तुलनेत यंदाची तरतूद सुमारे १९ हजार कोटी रुपयांनी कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत लाभ मिळवण्यासाठी काही महत्त्वाचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. लाभार्थी महिलेचे वय २१ ते ६५ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. तसेच ट्रॅक्टर वगळता कुटुंबाकडे चारचाकी वाहन नसावे. एका कुटुंबातील एक विवाहित आणि एक अविवाहित महिलेलाच या योजनेचा लाभ घेता येतो. याशिवाय लाभार्थी महिला केंद्र किंवा राज्य शासनाच्या अन्य वैयक्तिक योजनेची लाभार्थी नसावी, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असावे आणि त्या सरकारी सेवेत नसाव्यात, असेही प्रमुख निकष आहेत.

| लाडकी बहीण योजनेची स्थिती |
| --- |
| २.५३ कोटी सुरुवातीचे एकूण लाभार्थी |
| ४५ हजार कोटी रुपये सुरुवातीची एकूण तरतूद |
| १.४८ कोटी पडताळणीनंतर पात्र लाभार्थी |
| २६ हजार ५०० कोटी रुपये चालू वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूद |
| १.०५ कोटी कमी होणारे अंदाजे लाभार्थी |

### ई-केवायसी अनिवार्य

योजनेच्या सुरुवातीला काही मोजकी कागदपत्रे जोडून मोठ्या प्रमाणात अर्ज स्वीकारण्यात आले होते. लाखो महिलांना काही महिने लाभही मिळाला. मात्र डिसेंबर २०२४ पासून अंगणवाडी सेविकांमार्फत लाभार्थींची पडताळणी सुरू करण्यात आली. सध्या सर्व लाभार्थींना ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले.

### उत्पन्नाचा निकष ठरतोय अडथळा

ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान लाभार्थी महिलांच्या कुटुंबाचे वास्तविक वार्षिक उत्पन्न समोर येत आहे. अनेक महिलांचे उत्पन्न निकषापेक्षा जास्त असल्याचे दिसून आल्याने त्या अपात्र ठरण्याची शक्यता आहे. तसेच काही महिलांनी पुढील कारवाई टाळण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण केलेली नसल्याचेही समोर आले आहे.

### १ एप्रिल पासून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा मिळणार लाभ

''लाडकी बहीण योजनेच्या निकषांनुसार प्रत्येक लाभार्थीची अंगणवाडी सेविकांमार्फत पडताळणी करण्यात आली आहे. सर्व लाभार्थींनी ३१ मार्चपूर्वी ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. १ एप्रिलपासून पात्र लाभार्थींनाच योजनेचा लाभ दिला जाईल, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हास्तरीय प्रदर्शनीत केशवराज विद्यालयाचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लातूर यांनी अटल टिंकरिंग लॅब सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय प्रदर्शनीचे आयोजन केले होते. यात यातील या विषयासाठी श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचे चि. समर्थ अक्षय पोटे (९ वी ड ) व चि. नरसिंग तुकाराम नारायणपुरे (९ वी ड) या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले असून त्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना अटल टिंकरिंग लॅबचे प्रमुख लक्ष्मीकांत बुगदे व शरद पांचाळ यांनी मार्गदर्शन केले होते. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# विविध वृत्त...

## जागेवरच निवड संधी या मोहिमे अंतर्गत रोजगाराची; आज प्लेसमेंट ड्राईव्ह

**लातूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह)चे मंगळवार, १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी मंगळवार, १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

## कुस्ती मार्गदर्शक नियुक्तीसाठी २० मार्चपर्यंत अर्ज सादर करा

**लातूर :** भारत सरकारच्या क्रीडा विभागाने देशभरातील विविध जिल्ह्यांमध्ये खेळांच्या विकासासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे दर्जेदार खेळाडू घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याच धोरणांतर्गत लातूर येथील खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षण केंद्राला मिळाली आहे. या केंद्रासाठी कुस्ती विषयाचे मानद तत्त्वावर मार्गदर्शक (कोच) नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याकरिता २० मार्च २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मार्गदर्शक पदासाठी १८ ते ४५ वर्षे वयोगटातील ऑलिंपिक, आशियाई खेळ, जागतिक अजिंक्यपद, किंवा संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व पदक प्राप्त केलेले खेळाडू (प्रशिक्षण अनुभवासह), राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्रशिक्षक (प्रशिक्षण अनुभवासह), एन.आय.एस. (छ्खड) पदविका धारक किंवा संबंधित खेळाचे अधिकृत लेव्हल कोर्स पूर्ण केलेले, राष्ट्रीय स्पर्धा/राष्ट्रीय खेळांमध्ये पदक प्राप्त केलेले खेळाडू (प्रशिक्षण अनुभवासह), राज्यस्तरीय खेळाडू, बी.पी.एड./एम.पी.एड. पदवीधर, किमान दहा वर्षांचा कुस्ती प्रशिक्षणाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.पात्र उमेदवारांनी आपले शैक्षणिक प्रमाणपत्रे, खेळाचे प्रमाणपत्रे, प्रशिक्षण अनुभवाचे दाखले यांसह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे दिनांक २० मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## रेनबो प्रि इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण संपन्न

**लातूर :** मोती नगर भागातील रेनबो इंग्लिश स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कोरे गार्डन येथे संपन्न झाले कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगरसेविका सौ सुनीता चाळक यांच्या हस्ते सरस्वती दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था उपाध्यक्ष ज्ञानदेवराव तेलंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन नगरसेवक गणेश गवारे,नगरसेवक उद्धव तेलंगे, शिरुर अनंतपाळ पंचायत समिती सदस्य संजय सूर्यवंशी आदीची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रास्ताविक संस्था अध्यक्ष प्रा. गिरीधर तेलंगे यांनी सादर केले. व्यासपीठावर यशवंत विद्यालयाचे सहशिक्षक विवेकानंद चिंचोले, नूतन प्राथमिक विद्यालयाचे सहशिक्षक संतोष केंद्रे,स्कूलच्या प्राचार्या सौ आश्विनी तेलंगे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे सौ सुनीता चाळक,उद्धव तेलंगे, गणेश गवारे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या,यामध्ये जवळपास ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा चे सूत्रसंचालन सौ खुशी तिवारी आभार सौ मोहिनी धुमाळ यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैशाली सोमवंशी, सौ. अनिता चिंताले, आदींनी परिश्रम घेतले.

## प्रत्येक शनिवारी होणाऱ्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेवर शिक्षकांचा बहिष्कार

**लातूर :** निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्रत्येक शनिवारी आयोजित केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेसंदर्भातील पत्राच्या अनुषंगाने बहिष्कार टाकल्याची बाब शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीने सीईओंना निवेदन देऊन स्पष्ट केली.निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत चालू शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत प्रत्येक शनिवारी शालेय कामकाजानंतर केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. निपुण महाराष्ट्र अभियानचे उद्दिष्ट तसेच विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान वृद्धिंगत करण्याचा हेतू शिक्षकांना मान्य आहे. शिक्षक त्या दृष्टीने प्रामाणिक कार्य करीत आहेत. प्रत्येक शनिवारी प्रत्यक्ष उपस्थित राहून परिषदेस येणे, ही बाब अडचणी निर्माण करणारी ठरत आहे.

# लातूर परिमंडळात फेब्रुवारी महिन्यात तब्बल २८ लाख ७७ हजारांचे ‘चेक बाऊन्स’




### महावितरण करणार फौजदारी कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** थकीत वीजबिलाची वसुली टाळण्यासाठी किंवा वेळ मारून नेण्यासाठी जाणीवपूर्वक न वटणारे (बाऊन्स होणारे) धनादेश देणाऱ्या वीज ग्राहकांसाठी आता महावितरणने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. लातूर परिमंडलात फेब्रुवारी महिन्यात तब्बल २८ लाख ७७ हजार ९१९ रुपयांचे ९८ धनादेश तांत्रिक किंवा आर्थिक कारणांमुळे अनादरीत (बाऊन्स) झाल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. या प्रकारामुळे वीज बिलांची वसुली रखडून थकबाकीचा डोंगर वाढत असल्याने, महावितरण प्रशासनाने आता अशा ग्राहकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता केवळ प्रशासकीय दंडच नव्हे, तर कायद्याचा कडक कारवाईला वीजग्राहकांना सामोरे जावे लागणार आहे.

महावितरणने या गंभीर प्रकरणांची दखल घेत 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट, १८८१ च्या कलम १३८ अन्वये कायदेशीर कारवाईची मालिका सुरू केली आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार, कोणत्याही बँक खात्यातून जारी केलेला धनादेश अपुऱ्या निधीअभावी किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे न वटल्यास, महावितरणकडून संबंधित ग्राहकाला ३० दिवसांच्या आत रितसर नोटीस बजावण्यात येईल. या नोटीसची मुदत संपल्यानंतरही १५ दिवसांच्या आत जर संबंधित ग्राहकाने रकमेचा भरणा केला नाही, तर ३० दिवसांच्या आत त्या ग्राहकाविरोधात थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. या कायद्यानुसार दोषी ठरल्यास ग्राहकास दोन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंडाची, अथवा दोन्ही शिक्षा होण्याचे कायदेशीर प्रावधान आहे.

या कठोर कायदेशीर प्रक्रियेसोबतच महावितरणने आपल्या अंतर्गत नियमावलीतही कडक बदल केले आहेत. ज्या ग्राहकांचे धनादेश बाऊन्स होतील, त्यांची पुढील सहा महिन्यांसाठी धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा पूर्णपणे निलंबित केली जाणार आहे. याशिवाय, प्रत्येक वीज बिलासाठी विलंब शुल्क आणि जीएसटीसह ८८५ रुपयांचा दंड थेट पुढील बिलात 'इतर आकार' या सदराखाली समाविष्ट केला जाणार आहे. विशेष बाब म्हणजे, जर एकाच धनादेशाद्वारे अनेक बिलांची रक्कम भरली गेली असेल, तर प्रत्येक बिलासाठी स्वतंत्र दंडाची आकारणी केली जाणार आहे, ज्याचा मोठा आर्थिक भुर्दंड ग्राहकांना सोसावा लागू शकतो.

सद्यस्थितीत अनेक ग्राहकांकडून चुकीची तारीख टाकणे, स्वाक्षरीमध्ये तफावत असणे, खाडाखोड करणे किंवा बँक खात्यात पुरेशी रक्कम नसतानाही धनादेश देणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. या सर्व त्रुटी आता महावितरणच्या रडारवर आल्या आहेत. महावितरणने सर्व वीज ग्राहकांना आवाहन केले आहे की, धनादेश देताना तारीख, अचूक रक्कम, स्पष्ट स्वाक्षरी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बँक खात्यात पुरेशी शिल्लक असल्याची ग्राहकांनी पूर्ण खात्री करावी. महावितरणच्या या कठोर धोरणामुळे आता केवळ थकीत वसुलीच वेळेवर होणार नाही, तर वीज ग्राहकांमध्ये आर्थिक शिस्तही पाळली जाईल. त्यामुळे आता वीज ग्राहकांनी अधिक सावध राहणे आणि बिलाचा भरणा वेळेवर व अचूक पद्धतीने करणे, हेच त्यांच्या हिताचे ठरणार आहे. लातूर परिमंडळाअंतर्गत लातूर , बीड व धाराशी असे तीन जिल्हे येतात. जिल्हानिहाय हे प्रमाण बीड ३८ धनादेश ११ लाख ६२ हजार १३० रुपये, धाराशिव १७ धनादेश ३ लाख ३८ हजार ८८९ व लातूर ४३ धनादेश १३ लाख ७६ हजार ९०० रुपये असे आहे.

## जागृती शुगर कारखान्याची वजन काटे भरारी पथकाकडून तपासणी

### शासनाकडून अचूक काटे असल्याचे प्रमाणपत्र



*तभा वृत्तसेवा*

*लातूर, दि. ०९ मार्च : राज्यातील खाजगी साखर कारखानदारीत एफ. आर.पी पेक्षा अधिक भाव ऊस पुरवठा शेतकऱ्यांना देणाऱ्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईंड इंडस्ट्रीजला साईटवर वजन काटे यांची शासकीय अधिकारी यांच्यासह शेतकरी प्रतिनिधींनी संयुक्त पथकाद्वारे पाहणी केली तपासणी केल्यानंतर कारखान्यावर काटा योग्य व अचूक असल्याचा निष्कर्ष समितीने दिला आहे त्यामुळे जागृति शुगर ला अचूक काटे असल्याचे प्रशस्तीपत्र बहाल करण्यात आले आहे.*

*भरारी पथकाची अचानक भेट व तपासणी*

*सध्या जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्याकडे वजन काटे तपासणीसाठी भरारी पथकाची नियुक्ती केल्याने आज शुक्रवारी अचानक वजन करून व गव्हाणीकडेगे लेल्या वाहनांना परत बोलवून काट्याची तपासणी केली भरलेली व रिकामे केलेली वजन घेण्यात आले ते अचून असल्याचे त्यांनी सांगितले त्यानुसार जागृती शुगर म्हणजे प्रगती या ब्रीदवाक्य प्रमाणे उस उत्पादक शेतकऱ्यांचा विकास, विश्वास या साखर कारखान्याने आपले वेगळेपण जपले आहे ते पुन्हा अधोरेखित झाले आहे राज्याचे माजी मंत्री जागृति शुगरचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेब, जागृति शुगर च्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालक आदरणीय सौ गौरवी ताई अतुलबाबा भोसले देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांच्या सूचनेनुसार कारखाना व्यवस्थापन नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.*

*भरारी पथकात देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर वैद्यमापनशास्त्र निरीक्षक कांबळे एम आर, लेखा परीक्षक श्रेणी २ आर बी पवार, पोलीस उपनिरीक्षक एस जी कोंडामंगले, कारखान्याचे सरव्यवस्थापक गणेश येवले, उपअभियंता अक्षय सूर्यवंशी ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी धनाजी जाधव, ऊस उत्पादक शेतकरी विष्णू निडवंचे, विजेंद्र कोटे राहणार तळेगाव, सहाय्यक केनयार्ड सुपर वायझर महेश काळे आदी उपस्तीत होते.*

## अटल टिंकरींग लॅब असलेल्या २२ शाळांतील १७० विद्यार्थ्यांचे ८८ प्रकल्प सादर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** राज्य शैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद पुणे, महाराष्ट्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, दयानंद कला महाविद्यालय, लातूर व रोटरी क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प २०२५-२६ चे प्रदर्शनाचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मारुती सलगर होते, या प्रदर्शनाचे उद्घाटन सहाय्यक शिक्षण संचालक संजय पंचगल्ले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, रोटरी अध्यक्ष श्री जकी खान कायमखानी यांची उपस्थिती होती. यावेळी पंचगल्ले म्हणाले, विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारावा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नवनिर्मिती करावी, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, रोटरी अध्यक्ष जकी खान कायमखानी यांचे मनोगत झाले.

## रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने कारागृहातील महिलांना साड्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त रविवारी येथील जिल्हा कारागृहात बंदी असलेल्या महिलांसाठी साडी वाटप व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. उमा देशपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे , सुदर्शन कांबळे, प्रकाश राठोड, सौ. सुनंदा जगताप, लातूर जिल्हा कारागृहाचे अधीक्षक मुलाणी , उपअधीक्षक लटपटे, सुभेदार मुंडे आदी मान्यवरांची उपस्थित होते. कारागृहातील महिला बंदींना साड्यांचे वाटप केले गेले.



यावेळी त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. उमा देशपांडे महिलांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवत आत्मविश्र्वासाने नव्याने उभे राहण्याचा संदेश दिला. जीवनात प्रत्येकाला अडचणींचा सामना करावाच लागत असतो. त्यावर मात करत जीवनाची वाटचाल चालू ठेवणे आवश्यक असते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी संयमाने त्यावर मार्ग, योग्य तोडगा काढणे शक्य होते. कोणत्याही अडचणींवर मार्ग काढण्यासाठी उचित व्यक्तींच्या सल्ल्याचीही गरज असते. त्यादृष्टीने वागण्याचा, चालण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे, असेही डॉ. देशपांडे म्हणाल्या. रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे यांनी आपले विचार व्यक्त करताना आयुष्यातील अडचणींवर मात करून नव्या उमेदीनं पुढे जाण्याचा संदेश दिला. जीवनाच्या खडतर प्रवासात खाचखळगे येतच असतात. त्यावर प्रसंगानुरूप मात करून ते अडथळे दूर करण्याचा प्रयत्न पावलोपावली केला पाहिजे,असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने कारागृहातील अधिकारी व महिला कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात आला.

### विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत यांच्या तर्फे

# आज रामेश्वर येथे राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती महावीर कुस्ती स्पर्धा ; अनेक मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक-दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी होणार आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.





माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे. समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै. नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच, हिंद केसरी पै. जगदीश कालीरमण हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र श्री पै. विजय उर्फ विकी बनकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील महावीर केसरी गटातील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/- , तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, मेडल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंच्चाहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना स्मृती सुवर्ण, रौप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल.

या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर कुस्ती स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड, महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. महेश थोरवे आणि क्रीडा विभागाचे संचालक डॉ. वैभव वाघ यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## ना. बाबासाहेब पाटील यांनी केले डॉ.रेड्डी कुटुंबियांचे सांत्वन

**अहमदपूर :** येथील स्वातंत्र्य सैनिक तथा माजी आमदार निवृत्तीराव रेड्डी यांचे सुपुत्र, यशवंत विद्यालयाचे विज्ञान विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक विजय दादा निवृत्तीराव रेड्डी यांचे दि.६ रोज राहत्या घरी वयाच्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. रेड्डी कॉलनीच्या शेजारी, रेड्डी फार्म हाऊस मध्ये शनिवारी त्यांचेवर अंतिम संस्कार करण्यात आले. अहमदपूर पंचक्रोशीतील प्रतिष्ठित व नागरीक यावेळी उपस्थित होते. या अंत्यविधीस राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे उपस्थित होते. त्यांनी विजय रेड्डी यांच्या प्रति शोक भावना व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली. तसेच त्यांनी डॉ. वैभव रेड्डी परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन मुली, सुन, नातवंडे परतवंडे असा परिवार असून प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. वैभव रेड्डी यांचे ते वडील होते. त्यांच्या दुखद निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे..



## काल्याच्या कीर्तनाने हरिनाम सप्ताहाची सांगता

**निलंगा :** निलंगा तालुक्यातील खडक उमरगा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हभप संजय महाराज खडक उमरगेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी संत तुकाराम बीजेला होणारी ४४ वर्षांची सप्ताहाची परंपरा, हभप सतीश महाराज यांच्या अधिपत्याखाली पारंपरिक पालखी नगर प्रदक्षिणेने भाविकांचे लक्ष वेधले आपल्या कीर्तनात संजय महाराज यांनी ईश्र्वराच्या जवळ जायचे असेल तर भक्तांनी अहंकार सोडावा. विद्वत्ता, सेवा, भक्ती हे जसे ईश्र्वराजवळ नेणारे गुण, तसे विनम्रताही आवश्यक असल्याचे सांगितले. कीर्तनात त्यांनी, एकटे असाल तर मनाला सांभाळा, कुटुंबात असाल तर भावनेला सांभाळा, मित्रांमध्ये असाल तर शब्दाला सांभाळा आणि देवभक्ती करत असाल तर अहंकार सांभाळा, असे सांगून संयम, नम्रता आणि माणुसकी जपण्याचा संदेश दिला. 'कान्हया रे जगजेठी, विठ्ठल नाम घेती, भक्तांच्या प्रेमासाठी, उभा राहिला पंढरीनाथा... यासह काल्याच्या कीर्तनातील अभंगांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. येथील श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान पंचक्रोशीत प्रसिद्ध असून, येथील मंदिराला पावणेदोनशे वर्षाचा इतिहास लाभलेला आहे. दरवर्षी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी लातूरसह मुंबई, हैदराबाद, पुणे येथूनही भाविक उपस्थित राहतात. यंदाच्या सप्ताहात ४५ गावांतील भजनी मंडळांनी सहभाग नोंदवत हरिनामाचा अखंड गजर केला. पालखी प्रदक्षिणेमध्ये संपूर्ण गाव सहभागी झाला होता. गावातील प्रत्येक घरासमोर रांगोळ्या काढून भाविकांनी पालखीचे स्वागत केले. टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या घोषात निघालेली ही पालखी सुमारे तीन तास चालली. यावेळी विविध गावांतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कॅप्टन डॉ. अनिता शिंदे यांची एनसीसी मेजर रँकपदी निवड, त्या ठरल्या महाराष्ट्रातील एकमेव महिला



**अहमदपूर :** महात्मा गांधी महाविद्यालयातील एन.सी.सी. प्रमुख कॅप्टन डॉ. अनिता एम. शिंदे यांची राष्ट्रीय कॅडेट कोर महानिदेशालय, नवी दिल्ली यांच्या वतीने सन २०२५-२६ मधील एन.सी.सी.ची सर्वोच्च रँक अर्थात *मेजर* म्हणून निवड करण्यात आली आहे. यावर्षीची महाराष्ट्रातील ही एकमेव महिलेची निवड असून, या निवडीबद्दल विचार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी. कदम, उपाध्यक्ष अँड विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष, मा. युवराज पाटील, सहसचिव, अँड वसंतराव फड, सहसचिव, मा. सुरेशराव देशमुख, कोषाध्यक्ष, मा. रामचंद्रराव शेळके तसेच विचार विकास मंडळाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, संस्थेचे प्राध्यापक प्रतिनिधी प्रा. हेमंत पाटील, पर्यवेक्षक प्रा. एस के. गायकवाड, डॉ. एच. एम. खिंडीवारे, ७ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन छत्रपती संभाजीनगरचे कमांडिंग ऑफिसर एम. सी. आयप्पा, ५३ बटालियन लातूरचे कमांडिंग ऑफिसर महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच इतर विविधस्तरातून डॉ. अनिता शिंदे यांचे अभिनंदन होत आहे

## अभ्यासिका सुरु करण्याची मागणी

**निलंगा :** निलंगा शहरात शिक्षणाचे जाळे मोठ्या प्रमाणात वाढले आहे मात्र विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता शांत वातावरण उपलब्ध होत नसल्याने नगरपालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांकरिता मोफत अभ्यासिका सुरू करण्याची मागणी नगरसेवक डॉ. गजेंद्र तरंगे यांनी नगराध्यक्षाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निलंगा शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत व योग्य वातावरण उपलब्ध होत नाही. विशेषतः ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्याथ्याना अभ्यासासाठी स्वतंत्र अडचण जागेची भासत आहे. म्हणून निलंगा नगर पालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शहरात मोफत अभ्यासिका सुरू करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक डॉ गजेंद्र तरंगे यांनी नगराध्यक्ष संजय हलगरकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नगराध्यक्षांनी या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्र्वासन दिले आहे.

# औसा पंचायत समितीवर भाजपचा ऐतिहासिक विजय

## सभापतीपदी गंगाबाई कोदळीकर तर उपसभापतीपदी अमोल पाटील सभापती, उपसभापतीचे आ.आभिमन्यू पवार यांच्याकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ९ मार्च :** औसा पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदासाठी सोमवार दि. ९ रोजी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने काँग्रेसचा ६मतांनी पराभव करीत दणदणीत विजय मिळवत पंचायत समितीवर ऐतिहासिक झेंडा फडकावला आहे.आजपर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच सभापती आणि उपसभापती पदे भाजपाकडे गेल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा होत आहे.

सभापती पदासाठी एकूण दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवार श्रीमती कोदळीकर गंगाबाई माणिकराव (थोरात) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवार पंचफुलाबाई सुधाकरराव घोडके यांच्यात थेट लढत झाली. मतदान प्रक्रियेनंतर गंगाबाई कोदळीकर यांना एकूण १२ मते मिळाली, तर



पंचफुलाबाई घोडके यांना ६ मते मिळाली. त्यामुळे पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसिलदार घनशाम अडसुळ , गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे यांनी गंगाबाई माणिकराव कोदळीकर (थोरात) यांची औसा पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली.

तर उपसभापती पदासाठी देखील दोन उमेदवार रिंगणात होते. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अमोल साहेबराव पाटील आणि इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार किशोर देविदास जवंजाळे यांच्यात सामना झाला. या निवडणुकीत अमोल पाटील यांना १२ मते मिळाली, तर किशोर जवंजाळे यांना ६ मते मिळाली. त्यानुसार अमोल साहेबराव पाटील यांची औसा पंचायत समितीच्या उपसभापतीपदी निवड जाहीर करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी नवनिर्वाचित सभापती आणि उपसभापती यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी त्यांनी औसा पंचायत समितीच्या माध्यमातून विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.

औसा पंचायत समितीवर भाजपचा पहिल्यांदाच ताबा मिळाल्यामुळे स्थानिक राजकारणात मोठा बदल झाल्याचे मानले जात असून, आगामी काळात पंचायत समितीच्या माध्यमातून विविध विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.भाजपाचे जेष्ठ नेते सुशीलदादा बाजपाई, ड मुक्तेश्र्वर वागदरे,ड. अरविंद कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष किरण उटगे, भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, जिल्हा सरचिटणीस सुभाष जाधव, बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षीत पवार, सरपंच संघटनेचे अध्यक्ष विष्णू कोळी, काकासाहेब मोरे, प्रवीण कोपरकर,रवी चिलमे,कल्पना डांगे, सुनिता सूर्यवंशी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# निलंगा पंचायत समितीमध्ये महिलाराज

## सभापतीपदी सुनीता संतोष वाघमारे तर उपसभापतीपदी अश्विनी बालाजी माने यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०९ मार्च :**निलंगा पंचायत समिती भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आल्यामुळे येथे सभापती व उपसभापती या दोन्ही पदावर महिलांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे पंचायत समितीमध्ये महिलाराज आली असून नगरपालिकेतील विषय समित्यामध्ये महिलाराजप्रमाणे भारतीय जनता पक्षाने पंचायत समितीमध्येही महिलांना संधी दिली आहे.





येथील निलंगा पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीच्या निवडीसाठी सोमवारी दि. ९ मार्च रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी शरद झाडके हे उपस्थित होते. येथील पंचायत समितीचे सभापती पदे हे अनुसूचित जाती महिलेसाठी राखीव होते त्यामुळे या पदावर सभापतीपदी सुनीता संतोष वाघमारे यांची तर उपसभापतीपदी अश्र्विनी बालाजी माने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सुरवातीला काँग्रेस कडून पंचायत समितीचे सदस्य किरण सुधाकर पाटील यांनी उपसभापती पदासाठी अर्ज दाखल केले होता मात्र त्यांनी अर्ज मागे घेतल्याने सभापती व उपसभापतीची निवड बिनविरोध झाली.

नुकत्याच झालेल्या निलंगा नगरपालिकेच्या निवडणुकीत ही भारतीय जनता पक्षाची सत्ता आली असून येथील विषय समित्यांमध्ये सर्वच सभापती पदे महिलांसाठी देण्यात आले आहेत त्यामुळे नगरपालिकेप्रमाणे पंचायत समिती मध्येही महिला झाली आहे. पंचायत समितीच्या एकूण २० जागापैकी १३ जागा भारतीय जनता पक्षाकडे तर सात जागा काँग्रेसच्या निवडून आले आहेत त्यामुळे या निवडी बिनविरोध झाल्या नूतन पदाधिकाऱ्याचे पंचायत समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# सात वर्षांच्या साद शेखचा रमजान रोजा पूर्ण; वलांडी गावात सर्वत्र कौतुक

## श्रद्धा, संयम आणि धार्मिक संस्कारांचे प्रेरणादायी उदाहरण

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. ९ मार्च :** देवणी तालुक्यातील वलांडी येथील सात वर्षांच्या साद शेख या चिमुकल्याने रमजान महिन्यातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. एवढ्या लहान वयात दिवसभर उपवास पाळत त्याने धार्मिक परंपरेप्रती असलेली निष्ठा आणि संयम दाखवला असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुस्लिम समाजात रमजान महिना अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा मानला जातो. या महिन्यात रोजा ठेवणे, नमाज अदा करणे तसेच गरीब व गरजूंची मदत करणे याला विशेष महत्त्व असते. दिवसभर काहीही न खातापिता उपवास धरणे, मनातील वाईट भावना दूर ठेवणे आणि संयम राखणे हा रमजान महिन्याचा मुख्य संदेश मानला जातो. रोजा पाळताना सूर्योदयापूर्वी सहरी करून दिवसाची सुरुवात केली जाते, तर सूर्यास्तानंतर इफ्तार करून उपवास सोडला जातो.

या पार्श्र्वभूमीवर वलांडी येथील शायक शेख यांच्या मुलगा साद शेख याने कडक उन्हाची पर्वा न करता आपला पहिला रोजा पूर्ण केला. लहान वय असूनही त्याने दाखवलेल्या जिद्दीचे आणि श्रद्धेचे गावकऱ्यांमध्ये कौतुक होत आहे. कुटुंबीयांनीही त्याचे विशेष अभिनंदन करत त्याला प्रोत्साहन दिले.

सादच्या या कृतीमुळे रमजान महिन्यातील



संयम, श्रद्धा आणि मानवतेचा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. तसेच लहान वयातच धार्मिक संस्कार आणि सकारात्मक मूल्ये मुलांमध्ये रुजत असल्याचे प्रेरणादायी चित्र या निमित्ताने पाहायला मिळत आहे.

# पंचायत समिती चाकूरच्या सभापती पदी जयश्री नागरगोजे तर उपसभापती पदी भुजंग शिंदे यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०९ मार्च :** पंचायत समिती चाकूरच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आठ जागांवर विजय मिळवत सत्ता स्थापन केली असून सभापतीपदी रोहिणा गणातील जयश्री मच्छींद्र नागरगोजे व उपसभापती सुगाव गणातील भूजंग शिंदे यांची बिनविरोध निवड सोमवार दि.०९ मार्च रोजी करण्यात आली आहे. निवडीनंतर नुतन सभापती व उपसभापतीचा सत्कार करण्यात आला.पंचायत समिती कार्यालयात तहसीलदार तथा पिठासीन अधिकारी नरसिंग जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नुतन सदस्यांची बैठक घेण्यात आली. सभापती पदासाठी जयश्री नागरगोजे व उपसभापती पदासाठी भूजंग शिंदे यांचे एकमेव अर्ज





दाखल झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड घोषीत करण्यात आली.

यावेळी तहसीलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे, महिला बालविकास प्रकल्पाधिकारी विदया लोमटे, नायब तहसीलदार शैलेश निकम यांनी नुतन सभापती व उपसभापतींचा सत्कार केला. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालूक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जिल्हा परिषदेच्या चार व पंचायत समितीच्या आठ जागेवर विजय मिळवला आहे.

सभापतीपद हे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलेसाठी आरक्षीत असल्यामुळे जयश्री नागरगोजे यांना संधी देण्यात आली असून त्यांचे पती मच्छींद्र नागरगोजे यांना ग्रामपंचायतीच्या कारभाराचा अनुभव आहे.याचा त्यांना फायदा होणार आहे.त्याचबरोबर भूजंग शिंदे हे गांजूर गावाचे माजी सरपंच राहिले आहेत.दरम्यान,मागील चार वर्षांपासून पंचायत समितीवर प्रशासक राजवट असल्यामुळे अनेक विकासकामे रखडली असून पंचायत समितीचा कारभार अधिक सक्षम आणि पारदर्शक पद्धतीने चालवण्यासाठी अनुभवी नेतृत्वाची गरज होती.

रोहिणा जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेल्या विजयामध्ये मच्छींद्र नागरगोजे यांच्या प्रयत्नांचा मोठा वाटा असल्यामुळे त्यांना ही संधी देण्यात आली आहे. यावेळी पंचायत समितीचे सर्वच सदस्य उपस्थित होते.या बिनविरोध निवडीबद्दल सभापती व उपसभापती यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# रेणापूर पंचायत समिती सभापती मोनिका सुर्यवंशी तर उपसभापती शरद दरेकर

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०९ मार्च :** जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुले यांच्या सुचने नुसार सोमवारी (दिनांक ९ मार्च २०२६) रेणापूर पंचायत समितीच्या सभापती उपसभापदाची निवड प्रक्रिया संपन्न झाली या निवडीची सर्व प्रक्रिया संपन्न झाल्यास दुपारी २ नंतर सभापदी पदासाठी मनसेच्या मोनिका रवी सुर्यवंशी तर भाजपाचे उपसभापती पदासाठी शरद माणिकराव दरेकर आणि कॉग्रेसचे बालाजी गोटके या दोघाचे अर्ज प्राप्त झाले होते. या दोघांत उपसभापती पदासाठी हात उंचावून मतदान प्रक्रिया घेण्यात आली त्यात





बालाजी गोटके यांना तीन तर शरद दरेकर यांना पाच मते पडल्याचे पिठासिन अधिकारी थोरात यांनी सांगीतले

या नंतर सभापती पदी मनेसे च्या मोनिका रवी सुर्यवंशी तर उपसभापदी भाजप चे शरद माणिकराव दरेकर यांची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# देवणी पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपच्या अंकीता पाटील तर उपसभापतीपदी बाळासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. ०९ मार्च :** पंचायत समितीच्या सभापतीपदी अंकीता पाटील यांची तर उपसभापतीपदी बाळासाहेब पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. दि. ९ मार्च रोजी देवणी पंचायत समितीच्या सभागृहात ही निवड करण्यात आली.देवणी पंचायत समिती सभापतीचे आरक्षण सर्वसाधारण संवर्गासाठी आरक्षित होते मात्र भाजपने जातीय समीकरणाचा विचार करीत अनपेक्षितपणे अंकीता पाटील यांची सभापतीपदी बिनविरोध निवड करीत धक्कातंत्राचा वापर केला. त्यामुळे अनेकांनी आश्र्चर्य व्यक्त केले.सोमवारी सकाळी १० ते १२ या अर्ज भरण्याच्या वेळेत सभापती व उपसभापती पदासाठी प्रत्येकी एक अर्ज दाखल झाल्याने दुपारी अडीच वाजता ही निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले.निवडीचे वृत्त कळताच दवणहिप्परगातील चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा केला.यावेळी पिठासीन अधिकारी म्हणून तहसीलदार सोमनाथ माळी यांनी काम पाहिले तर त्यांना गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांनी सहकार्य केले.या निवड प्रक्रियेवेळी देवणी पंचायत समितीचे सदस्य गजानन भोपणीकर, नागनाथ सगर, अश्र्विनी हंचनाळे, महादेवी पाटोळे उपस्थित होते.यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक भिमराव गायकवाड यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. या निवडीमुळे महायुतीचे शंकरराव पाटील तळेगावकर, यशवंतराव पाटील,नागेश आण्णा जिवणे, अनिल इंगोले, मनोज कन्नाडे, मनोहर पटणे, बालाजी सुर्यवंशी, अनिल कांबळे, राजकुमार पाटील , प्रशांत पाटील, राजकुमार गुनाले, यशवंत ठाकरे, सत्यदेव गरड सह अदिंने अभिनंदन केले.

भाजपकडून चार सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट एक, काँग्रेस पक्ष एक असा संख्या बळ होता.



# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजापूरमध्ये दुकानातून ५५ हजारांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

तुळजापूर शहरातील भवानी रोड परिसरात एका दुकानातून हळद, कुंकू व साखरेचा माल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रफीक इसाक सय्यद (वय ४०, रा. विश्वासनगर हाडको, ता. तुळजापूर जि. धाराशिव) यांचे भवानी रोडवरील वजे बिल्डिंगसमोर दुकान आहे.



दि.७ मार्च रोजी रात्री ११ ते दि.८ मार्च रोजी पहाटे ५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने दुकानाला पडदा लावलेला असताना हळद, कुंकू व साखरेचा सुमारे ५०० किलो माल चोरी करून नेला. चोरीस गेलेल्या मालाची किंमत सुमारे ५५ हजार १०० रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी रफीक इसाक सय्यद यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...



### कास्ती खुर्द शाळेतील चिमुकल्यांनी अनुभवला रंगोत्सव

**लोहारा, दि.९ मार्च -**

निसर्गातील सर्वच रंग आपलेसे करून प्रत्येकांच्या सुख सहभागी होऊन मानवता व माणुसकी जपणारा सण रंगपंचमीच्या निमित्तांने समाजातील विविध घटकांत समता, समानता, समन्वय व सहकार्य भावना वाढवून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी कास्ती खुर्द शाळेतील चिमुकल्यांनी रंगोत्सव साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी पाण्याचा अपव्यय टाळला. त्यासाठी मुलांनी निसर्गपुरक रंग व फुलांचा वापर केला. विद्यार्थ्यांनी एकमेकांना रंग लावत रंगपंचमीच्या शुभेच्छा दिल्या. रंगोत्सव साजरा करताना विद्यार्थ्यांनी हलगीच्या तालावर नृत्य सादर करत झेलीम, कविता, शेतकरी गीत शिक्षकांसह समुहनृत्य करत रंगोत्सवाचा आनंद घेतला. यावेळी शाळेतील शिक्षकांनीही बालपणाची अनुभुती घेतली.



### पुजारी नगरमध्ये महिलांची रंगपंचमी साजरी

**तुळजापूर, दि.९ मार्च -**

शहरातील पुजारी नगर सोसायटी परिसरात शेकडो महिलांनी एकत्र येत नैसर्गिक रंगांची उधळण करत रंगपंचमी उत्साहात साजरी केली. एकमेकांना कोरडे रंग लावत शुभेच्छा देत महिलांनी सणाचा मनमुराद आनंद घेतला. यावेळी रासायनिक रंगांना फाटा देत नैसर्गिक व सुरक्षित रंगांचा वापर करण्यात आला. लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे आयोजन पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने शुभांगी पुजारी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. सोसायटी परिसरातील महिला, कुटुंबीय व लहान मुले उपस्थित होते. नैसर्गिक रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.



### प्राजक्ता पवारचा रुईभर विद्यालयात सत्कार

**धाराशिव, दि.९ मार्च -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील माजी विद्यार्थिनी प्राजक्ता नंदकुमार पवार यांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत स्थापत्य अभियंता पदावर निवड झाल्याबद्दल विद्यालयात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू करावी, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे होते. त्यांच्या हस्ते प्राजक्ता पवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्राजक्ता पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या यशाचा प्रवास सांगितला. आत्मविश्वास, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे यश मिळते, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे, राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, नंदकुमार पवार, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश शेटे यांनी केले तर आभार काकासाहेब डोंगरे यांनी मानले.

## धाराशिवात जुगार अड्ड्यावर कारवाई; २.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

धाराशिव शहरातील सोलापूर रोडवरील पाथरुड गल्ली परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने मध्यरात्री धडक कारवाई केली. या कारवाईत ९ जणांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल आणि दुचाकी वाहनांसह २ लाख ५६ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरातील अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत आणि धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांना गुप्त बातमीदारामार्फत पाथरुड गल्लीतील एका घरात 'तिरट' नावाचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे दि.९ मार्च रोजी मध्यरात्री १२.१० वाजता पोलिसांनी विजय मुकिंदा मुद्दे यांच्या घरावर अचानक छापा टाकला. त्यावेळी घराच्या मागील खोलीत दोन वर्तुळांमध्ये बसून काही जण पैशांवर तिरट जुगार खेळताना पोलिसांना आढळून आले. पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत विजय मुकिंदा मुद्दे (पाथरुड गल्ली, धाराशिव), रफिक लाला शेख (खाजानगर, धाराशिव), अमीर सत्तार डांगे (साईराम नगर, धाराशिव) अन्वर कबूला नाईकवाडी (रसूलपुरा, धाराशिव) चंद्रकांत मुकिंदा मुद्दे (झोरे गल्ली, धाराशिव), विजय श्रीमंत गायकवाड (क्रांती चौक, धाराशिव),



राजू चंद्रकांत मुद्दे (झोरे गल्ली, धाराशिव) राजू बाबुराव कवळीकर (एस.टी. कॉलनी, धाराशिव) बलभीम जगन्नाथ जाधव (दारफळ, ता. जि. धाराशिव) शस सर्व आरोपींना ताब्यात घेतले.

छाप्यादरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य (पत्ते), रोख रक्कम, विविध कंपन्यांचे मोबाईल तसेच होंडा युनिकॉर्न (एमएच २५ बीडी ४७०७), बजाज डिस्कव्हर (एमएच १३ व्ही११८९) आणि टीव्हीएस ज्युपिटर (एमएच २५ बीसी १४५१) या तीन दुचाकी वाहनांसह एकूण २,५६,७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल हुसेन सय्यद यांच्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार शेंडगे करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत व पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.

## कॉलेज ऑफ डी. फार्मसीत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

व्ही.व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कॉलेज ऑफ डी. फार्मसीमध्ये सर्व विभागातील शिक्षकांसाठी एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात पार पडला. कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमासाठी डॉ. सुबोध कांबळे यांनी MSBTE CIN Norms Various Formats for cademic Monitoring या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनाचे महत्त्व, NB मानांकनासाठी आवश्यक बाबी तसेच CIN २०२३ मधील बदलांबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमात ५० पेक्षा अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल माने यांनी तर आभार प्रा. पवार यांनी मानले. यावेळी शारदा देवी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आर.पी. कॉलेजचे प्रा. माने, भैरवनाथ निसर्ग मंडळ कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे यांच्यासह शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## दुचाकी अपघातात तिघांचा मृत्यु; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

येडशी पुलालगत सर्विस रोडवर झालेल्या दुचाकी अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोरख केरबा राउत (रा. जवळा निजाम, ता. परंडा), ऋषीकेश कोकाटे (रा. पिंपळगाव धस, ता. बार्शी, जि. सोलापूर) आणि केशव बाप्पा बावकर (रा. देवग्रां, ता. भूम) हे २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी एमएच १३ ईवाय ८०२३ या क्रमांकाच्या मोटरसायकलवरून जात होते.

बार्शी जाणाऱ्या सर्विस रोडवर रामलिंग मंदिराकडे वळण घेताना गोरख राउत यांनी दुचाकी हायगयीने व निष्काळजीपणे चालवल्याने अपघात झाला. या अपघातात तिघेही गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडले. अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले.

## धाराशिव जिल्हा स्त्री रुग्णालयात 'जागतिक महिला दिन' उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त धाराशिव येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात सोमवार (दि. ९) रोजी विशेष कार्यक्रम व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी रुग्णालयातील डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी तसेच महिला रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हा कार्यक्रम धाराशिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. तानाजी लाकाळ व डॉ. शिवाजी फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल वाघमारे होते. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्मिता गवळी-सरोदे, डॉ. मधुकर सूर्यवंशी, डॉ. शैलजा मिटकरी, डॉ. रेखा टिके, डॉ. रामढवे, मेट्रन गोरे मॅडम व पी. जी. सानप यांच्या हस्ते उत्कृष्ट सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

महिला दिनानिमित्त रुग्णालयात गरजू महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये रक्तदाब, रक्ताक्षय (ॲनिमिया), गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तसेच स्तन कर्करोग याबाबत तपासणी व जनजागृती करण्यात आली. महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासणी करून योग्य आहार घ्यावा, असे आवाहन तज्ज्ञांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिबेका भंडारे यांनी केले, तर आभार मंगेश सुरवसे यांनी मानले. कार्यक्रमास रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महान महिलांचे अनुकरण केल्यास आदर्श समाजाची निर्मिती शक्य : सुनंदा अहिरे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ मार्च -**

भारतीय समाजात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आणि थोरामोठ्यांच्या प्रेरणेने उंच शिखर गाठले आहे. मासाहेब जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी यांसारख्या महान महिलांनी आपल्या कार्यातून कर्तृत्व सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करून जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच आदर्श व कर्तृत्ववान समाजाची निर्मिती होऊ शकते, असे प्रतिपादन मुख्याध्यापिका सुनंदा अहिरे यांनी केले.



महिला दिनानिमित्त श्री ज्ञानेश्वर विद्यालय, तुरुरी येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक तुकाराम माणिकवार होते. यावेळी स्वामी भाग्यशाली, जाधव आकाशवाणी, प्रतीक्षा मुरमे, सुनंदा शिंदे, सुवर्णा सर्जे, सुचिता तीर्थकर, संध्याराणी पाटील, बबीता येवते, मनीषा जाधव आदी महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस तसेच तुरुरी येथील महिला शिक्षिका, अंगणवाडी व बालवाडी सेविकांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षिका प्रतीक्षा मुरमे यांनी केले.

प्रास्ताविक प्रतिभा बिराजदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुचिता तीर्थकर यांनी मानले. यावेळी शाळेतील विद्यार्थिनी, गावातील प्रतिष्ठित महिला व पालक उपस्थित होते.

## गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

नळदुर्ग शहरातील कुरेशी गल्ली परिसरात गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या बांधून ठेवलेल्या प्रकरणी तिघांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुबीन अजीज कुरेशी, अब्दुल अलीम अब्दुल रशीद कुरेशी (दोघे रा. कुरेशी गल्ली, नळदुर्ग) आणि अहमद इनामदार (रा. काझी गल्ली, नळदुर्ग) यांनी दि.८ मार्च रोजी कुरेशी गल्ली येथील मोकळ्या जागेत झाडाझुडपांमध्ये गोवंशीय जातीची सात जनावरे (एकूण किंमत सुमारे ७२ हजार रुपये) कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या बाभळीच्या झाडाला बांधून ठेवली होती.


**जाहीर प्रगटन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**तुळजापुर यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र.८४०/२०२५**

**प्रकरण :- जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **भागाबाई/भागिरथी नारायण शिंदे रा. येवती ता. तुळजापूर जि.धाराशिव** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांचा स्वःता नामे **भागाबाई/भागिरथी नारायण शिंदे** यांचा जन्म दिनांक **०२.०१.१९६५** रोजी येवती येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २३.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

स्वाक्षरित/-
(प्रियंका लोखंडे)
नायब तहसिलदार (महसुल)
तहसिल कार्याल, तुळजापुर


## २ ते ७ एप्रिल दरम्यान येरमाळ्याच्या श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा

### प्रशासकीय नियोजन बैठक संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.९ मार्च -**

येरमाळा येथील प्रसिद्ध आराध्य दैवत श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा यावर्षी २ एप्रिल ते ७ एप्रिल दरम्यान होणार असून यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने व्यापक नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. यात्रेसंदर्भात शहीद जवान शंकर बारकुल सभागृहात प्रशासकीय नियोजन बैठक घेण्यात आली. या बैठकीत यात्रेच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली असून यात्रेचे सुयोग्य नियोजन करण्यात येईल, असे उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांनी स्पष्ट केले.



या बैठकीस तहसीलदार हेमंत ढोकले, उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी मनीषा सुकाळे, ट्रॅफिक पोलीस निरीक्षक निशीकांत शिंदे, सपोनि. तात्याराव भालेराव, वैद्यकीय अधिकारी डॉ. बिरादार, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता जयंत लाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.जे.एम. सय्यद, बांधकाम अभियंता ए.व्ही. काळे, पशुधन विकास अधिकारी डॉ. जी.बी. पवार, डॉ. महेश मोरे, वाहतूक विभागाचे सुरज पायाळ, अभिजीत धाकतोडे, मंडळ अधिकारी एन.डी. नागटिळक, एमआरजीएसचे अभियंता संजय विभुते, देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त समाधान बेदरे, पंचायत समिती सदस्या वृषाली पाटील, विकास बारकुल, प्रशासकीय सरपंच प्रिया बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पुजारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

यात्रेदरम्यान भाविकांच्या सोयीसुविधा, सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था आणि विविध विभागांच्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आरोग्य विभागाकडून मंदिर परिसर, आमराई परिसर आणि आरोग्य केंद्र येथे आरोग्य बूथ उभारण्यात येणार असून १९ वैद्यकीय अधिकारी, १० पर्यवेक्षक, २० आरोग्य सेवक, १० सेविका आणि १० परिचर यांसह अतिरिक्त कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आली असल्याची माहिती डॉ. बिरादार यांनी दिली.

महावितरणकडून यात्रेदरम्यान २४ तास थ्री-फेज वीजपुरवठा सुरू ठेवण्यात येणार असून आपत्कालीन परिस्थितीसाठी कळंब व येडशी येथे स्वतंत्र स्टँडबाय व्यवस्था ठेवण्यात येणार आहे.

तसेच गावातील डीटीसीचे देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात येईल, असे उपकार्यकारी अभियंता जयंत लाडे यांनी सांगितले.



परिवहन विभागाकडून यात्रेसाठी धाराशिव विभागातून २०० तर लातूर व बीड विभागातून १५० विशेष एसटी बसेस चालविण्याची मागणी करण्यात आली असल्याचे कळंब आगार प्रमुखांनी सांगितले.

यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १ उपविभागीय अधिकारी, १५ सपोनि, ५० पोउपनि, ४०० पुरुष पोलिस, २०० महिला पोलिस, ३५० होमगार्ड व १५० महिला होमगार्ड असा मोठा पोलिस बंदोबस्त मागविण्यात आला असल्याची माहिती सपोनि तात्याराव भालेराव यांनी दिली.

तसेच अवैध दारू विक्री रोखण्यासाठी स्वतंत्र पथक व दरोडा प्रतिबंधक पथकही तैनात करण्यात येणार आहे. यावेळी ग्रामस्थ व राजकीय पदाधिकाऱ्यांनी यात्रेसंदर्भात विविध सूचना मांडल्या.

या सर्व सूचनांवर योग्य उपाययोजना करून यात्रा सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गोवंशीय मांसासह एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**
आंबी पोलीस ठाणे हद्दीत गोवंशीय जनावराची बेकायदेशीर कत्तल करून मांसाची वाहतूक केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सलीम गफार कुरेशी (रा. कुह्राड गल्ली, परंडा ता. परंडा जि. धाराशिव) यांनी दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.४५ ते रात्री ९ वाजण्याच्या सुमारास शेळगाव ते पांढरेवाडी रोडवरील रेवण दत्तोबा गांगुर्डे यांच्या शेताजवळ गोवंशीय जनावराची निर्दयपणे कत्तल करून सुमारे १२ किलो गोवंशीय मांस (किंमत सुमारे २७ हजार ५०० रुपये) बेकायदेशीररीत्या जवळ बाळगले व वाहतूक केल्याचे निदर्शनास आले.



या प्रकरणाची माहिती मिळताच आंबी पोलिसांनी कारवाई करत आरोपीसह मांस जप्त केले. यावरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास आंबी पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रा. सोमनाथ लांडगे यांचा गौरव

**नळदुर्ग, दि.९ मार्च -**
शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री साई श्रद्धा एज्युकेशनचे संचालक प्रा. सोमनाथ लांडगे यांना Swiftnlift संस्थेच्या वतीने 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. औंध येथील भारतरत्न भीमसेन जोशी कला मंदिर येथे झालेल्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक गौरविण्यात आले. प्रा. लांडगे हे अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. नीट (NEET) ऑनलाइन टेस्ट सिरीज, प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन व करिअर काउन्सेलिंगद्वारे अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मार्गदर्शन केले आहे. या कार्यक्रमाला कंपनीचे सीईओ निलेश साबे, येवले ग्रुपचे डायरेक्टर नवनाथ येवले, पुणे भाजपाच्या सरचिटणीस प्रियांका शेंडगे-शिंदे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुरस्काराबद्दल प्रा. लांडगे यांनी विद्यार्थ्यां व सहकाऱ्यांचे आभार मानले.

### श्रीक्षेत्र हिंगळजवाडी येथे हिंगलाज उत्सव उत्साहात

**धाराशिव, दि.९ मार्च -**
भावसार क्षत्रिय समाजाच्या वतीने श्रीक्षेत्र हिंगळजवाडी येथे आयोजित श्री हिंगलाज उत्सव भक्तिमय व उत्साहपूर्ण



वातावरणात साजरा करण्यात आला. समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीमुळे उत्सवाला विशेष मंगलमय वातावरण लाभले. उत्सवाच्या प्रारंभी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी उपस्थित राहून हिंगलाज माताचे दर्शन घेत समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी दत्तात्रय व देवी मठ संस्थानचे अध्यक्ष उत्तमराव गोरे, नेताजी पाटील, गोपाळ कदम, नेताजी जाधव, मधुकर शेळके, सुरेश पाटील, सतीश अंबुरे, संजय खुरुद यांच्यासह महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशसह विविध भागांतून भावसार समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### नळदुर्ग येथे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तबगार महिलांचा सत्कार

**नळदुर्ग, दि.९ मार्च -**
नळदुर्ग येथील शहर भाजप कार्यालयात भाजप कार्यकर्ते बबन चौधरी यांच्या पुढाकाराने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. स्वाती पाटील, डॉ. माधुरी बाबरे, यास्मिन शेख, धानम्मा कट्टे, अंजुम शेख, अनुषा चव्हाण आणि कोमल देवकर यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. स्वाती पाटील व डॉ. माधुरी बाबरे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, भाजपचे माजी शहराध्यक्ष पद्माकर घोडके, अबुअलहसन रजवी, प्रमोद जाधव आदी उपस्थित होते.

### सुलाबाई बायस यांचे निधन

**लोहारा, दि.९ मार्च -**
लोहारा तालुक्यातील अचलेर येथील विद्या विकास हायस्कूलचे संस्थापक अध्यक्ष तथा स्वातंत्र्यसेनानी कै.



खुशालसिंह बायस यांच्या धर्मपत्नी कै. सुलाबाई खुशालसिंह बायस (वय १०३) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी (दि.९) निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि.१०) सकाळी १० वाजता अचलेर येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात ३ मुली, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### राहिबाई रणदिवे यांचे निधन

**धाराशिव, दि.९ मार्च -**
तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथील रहिवासी राहिबाई भिवाजी रणदिवे (वय ८७) रविवार ८ मार्च रोजी सकाळी अल्प आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ७ वाजता बारूळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. जिल्हा परिषद शाळा चिखली येथील शिक्षक गौतम रणदिवे यांच्या आई होत्या.

# जिल्हा वार्षिक योजनेसाठी ४०५ कोटींचा निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**
जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची मानली जाणारी जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठी धाराशिव जिल्हा नियोजन समितीला ४०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मागील आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३७८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यामुळे यंदा २७ कोटी रुपयांची वाढ झाल्याने जिल्ह्यातील विविध विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद केली जाते. जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करताना त्या जिल्ह्याची लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, आदिवासी क्षेत्र, मागासलेपणा तसेच इतर विकासात्मक निकषांचा विचार करून निधीचे नियोजन करण्यात येते. या माध्यमातून जिल्हास्तरावर आवश्यक असलेल्या विकासकामांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला जातो.

जिल्ह्यातील विविध विभागांकडून प्रस्ताव मागवून त्यावर आधारित विकास आराखडा तयार केला जातो. त्यानंतर हा आराखडा पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीसमोर मंजुरीसाठी सादर केला जातो. समितीकडून मंजुरी मिळाल्यानंतर तो राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडे पाठविण्यात येतो. नियोजन विभागाने निश्चित केलेल्या सूत्रानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी निधीचे अंतिम वाटप केले जाते.

दरम्यान, राज्य शासनाने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील जिल्हा वार्षिक योजनांसाठी एकूण २१ हजार ८६७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या निधीतून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पायाभूत सुविधा, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते व सामाजिक सुविधा या क्षेत्रांतील विकासकामे राबविण्यात येणार आहेत.

धाराशिव जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या ४०५ कोटी रुपयांच्या निधीतून ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा सुधारण्यास मदत होणार आहे. विशेषतः रस्ते, पाणीपुरवठा योजना, शैक्षणिक सुविधा, आरोग्य केंद्रांची उभारणी व दुरुस्ती, अंगणवाडी व ग्रामविकास या कामांना प्राधान्य देण्यात येण्याची शक्यता आहे.

यंदा निधीत झालेल्या वाढीमुळे जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे मार्गी लागण्यास मदत होणार असून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या वृक्ष लागवड योजनेत भ्रष्टाचाराचा आरोप

### चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ मार्च -**
हरीत धाराशिव अभियान २०२५ अंतर्गत नळदुर्ग नगरपालिकेने राबविलेल्या वृक्षलागवड योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याचा आरोप काँग्रेसच्या नगरसेवकांनी केला आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधितांचे निलंबन व गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.



नगरपालिकेतील काँग्रेस गटनेते मारुती खारवे, नगरसेवक आकाश कुलकर्णी व सुधीर पोतदार यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले की, सर्वे नं. २३६/७ क्षेत्रात सुमारे २३ लाख १८ हजार ९८० रुपये खर्च करून ३० हजार वृक्षांची लागवड केल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र या कामासाठी ऑनलाईन टेंडर न काढता ऑफलाईन प्रक्रिया करण्यात आली असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचा स्पष्ट उल्लेख नाही. तसेच टेंडर एकाच कुटुंबातील तिघांनी भरल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

वृक्षलागवडीसाठी रोपे शासकीय नर्सरीतून मोफत मिळू शकत असताना ती खरेदी करण्यात आल्याचे, मजुरांची यादी बोगस असल्याचे तसेच ट्रॅक्टर, ट्रॉली व साहित्याच्या खर्चाबाबतही अनेक शंकास्पद बाबी असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या सर्व बाबींची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली असून आता जिल्हाधिकारी या प्रकरणात काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

## युद्धाचा वाशी तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना फटका

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.९ मार्च -**
अमेरिका-इजरायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीचे परिणाम आता भारतातही जाणवू लागले असून त्याचा फटका धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. तालुक्यातील तेरखेडा, सटवाईवाडी तसेच इतर गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर केळी, टरबूज आणि खरबूज पिकांची लागवड करण्यात आली आहे.



वाशी तालुक्यात बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने येथील केळीचे उत्पादन विविध देशांमध्ये निर्यात केले जाते. मात्र सध्या आंतरराष्ट्रीय तणावामुळे व्यापारी शेतात खरेदीसाठी येत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

तालुक्यातील शेकडो एकर क्षेत्रावर केळीची लागवड करण्यात आली असून, खरेदीदार नसल्यामुळे अनेक ठिकाणी केळीची घड शेतातच सडू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोठा खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. काही शेतकऱ्यांनी तर निराश होऊन उभ्या केळीच्या पिकात नांगर फिरवण्याची वेळ आल्याचे सांगितले जात आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने तात्काळ नुकसानग्रस्त केळी पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

* **धाराशिव, दि.९ मार्च -** वाहतूक शाखेच्या वतीने ८ मार्च रोजी मोहीम राबविण्यात आली. मोहिमेत १२८ कारवाया करण्यात येऊन १ लाख ८ हजार ७५० रुपये शुल्क वसूल करण्यात आले.

## महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या पगार व पीएफ कपातीची चौकशी करा



### ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ मार्च -**
उमरगा नगर परिषदेत काम करणाऱ्या महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या पगार व भविष्यनिर्वाह निधी कपातीमध्ये अनियमितता होत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांना न्याय द्यावा, अशी मागणी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन सोमवारी (दि.९) मुख्याधिकारी यांना देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मेहनत करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना महिन्याकाठी केवळ ६,२९० रुपये पगार दिला जात असून तोही बँक खात्यात न देता रोखीने दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच पगारातून दरमहा १,४०० ते १,७०० रुपये पीएफ कपात केली जात असली तरी ती रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा होते की नाही, याबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे.

महिला कर्मचाऱ्यांची बँक खाती उघडूनही पासबुक त्यांच्या ताब्यात देण्यात आलेली नाहीत. काही ठिकाणी पे-स्लिपवर सह्या घेऊन त्रयस्थ व्यक्ती पगार उचलत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तक्रार केल्यास नोकरीवरून काढून टाकण्याची भीती दाखवली जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून पगार थेट बँक खात्यात जमा करण्याची व्यवस्था करावी, पीएफ रक्कम खात्यावर जमा झाली आहे का याची माहिती द्यावी आणि अनियमितता आढळल्यास जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## सारथी शिष्यवृत्ती योजना तात्काळ सुरू करावी : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**
महाराष्ट्र शासनामार्फत छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिली जाणारी सारथी शिष्यवृत्ती योजना अचानक बंद करण्यात आल्याने राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी नाराजी व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही योजना तात्काळ पुन्हा सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे.

यासंदर्भात डॉ. पाटील यांच्या वतीने जिल्हाधिकारी धाराशिव यांना लेखी निवेदन देण्यात आले. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सारथी शिष्यवृत्ती योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी मोठा आधार मिळत होता. अनेक विद्यार्थी या शिष्यवृत्तीच्या मदतीने विविध स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पुढे येत होते. मात्र शासनाने ही योजना अचानक बंद केल्याने हजारो विद्यार्थ्यांपुढे आर्थिक अडचणी उभ्या राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी पुढे सांगितले की, शिष्यवृत्ती बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नियोजन विस्कळीत होत असून अनेकांना शिक्षणाचा खर्च भागवणे कठीण जात आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची होती. त्यामुळे शासनाने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

## लोहारा तालुक्यास बस डेपो व २५ एसटी बस देण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.९ मार्च -**
नुकताच नवनिर्वाचित तालुका म्हणून ओळख मिळालेल्या लोहारा तालुक्याला अद्यापही मूलभूत सोयीसुविधांचा अभाव भेडसावत आहे. विशेषतः लोहारा येथे राज्य परिवहन महामंडळाचा बस डेपो नसल्यामुळे तालुक्यातील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी लोहारा तालुक्यासाठी स्वतंत्र बस डेपो मंजूर करून किमान २० ते २५ नवीन एसटी बस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघ एकच असला तरी लोहारा तालुक्याला वाहतुकीच्या सुविधांचा अभाव जाणवत आहे. येथे बसस्थानक असले तरी नियमित बससेवा नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. इतर डेपोच्या मोजक्याच बस येथे येत असून त्या देखील वेळेवर येत नसल्याने प्रवाशांना अनेकदा खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो.

तालुक्याचा दर्जा मिळूनही वाहतुकीच्या सोयीसुविधांची उभारणी न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रोजंदारी कामगार, शेतकरी, विद्यार्थी तसेच महिला वर्ग यांना बससाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असून, बस उपलब्ध न झाल्यास त्यांना खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागतो. त्यामुळे आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे.

लोहारा येथे बस डेपो नसल्यामुळे बसफेऱ्यांचे नियोजन विस्कळीत होते व प्रवाशांची गैरसोय होते. तालुक्याचा दर्जा देताना वाहतूक सुविधा सक्षम करण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र त्याची अंमलबजावणी झालेली दिसत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे लोहारा तालुक्याच्या विकासासाठी बस डेपोची उभारणी अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## एअर गनचा धाक दाखवून पेट्रोल पंपावरून इंधन घेऊन पसार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**
वाशी फाटा ते सरमकुंडी मार्गावरील प्रताप पेट्रोलपंपावर एअर गनचा धाक दाखवून पेट्रोल भरून पैसे न देता पसार झाल्याची घटना घडली असून याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.७ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता प्रताप पेट्रोलपंप येथे दिनेश भगवान चव्हाण (रा. कोपरा ता. अंबेजोगाई जि. बीड, सध्या रा. पारगाव ता. वाशी जि. धाराशिव) यांनी वाहनात ९.१५ लिटर पेट्रोल भरून घेतले. त्याची किंमत ९६४ रुपये होत असताना त्यांनी पैसे न देता पिस्टलसारखी दिसणारी एअर गन दाखवून धमकी देत तेथून पळ काढला.

याप्रकरणी पेट्रोलपंपावरील कर्मचारी तानाजी विष्णू भोरे (वय २४, रा. दहीफळ ता. वाशी जि. धाराशिव) यांनी दि.८ मार्च २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.